(124)

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# नाशिक जिल्ह्यातील करंजवण व हरणबारी सिंचन प्रकल्पान्तर्गत विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन - मूल्यमापन अभ्यास अहवाल.


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे – ४११ ००१.


१९९५

# प्रस्तावना

-----

केंद्र शासनाच्या "20 कलमी" विकास कार्यक्रमामध्ये कोणत्याही प्रकल्पातंर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबांच्या पुनर्वसन कार्यक्रमास अग्रक्रम देण्यात आलेला होता. त्याच अनुषंगाने राज्य शासनाने देखील प्रकल्प बाधितांच्या/विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी नियोजनबध्द कार्यक्रमा बरोबरच स्वतंत्र अधिनियम प्रसृत केले आहेत. सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापितांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये विविध उपाययोजना व सवलती मंजूर करण्यात आलेल्या आहेत. असे असून देखील प्रकल्प बाधित/विस्थापित आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन ही एक जटील समस्या, न सुटलेले कोडे या स्वरुपात अस्तित्वात राहिलेली आहे. आपली असे की, प्रकल्प पूर्ण होऊनही प्रकल्प विस्थापितांच्या पुनर्वसन समस्येची समाधानकारक सोडवणूक झालेली दिसून येत नाही. या पार्श्वभूमीवर सिंचन प्रकल्प विस्थापित आदिवासींच्या पुनर्वसन कार्यक्रमाबाबत अभ्यास करणे गरजेचे वाटते.

सदर मूल्यमापन अभ्यास अहवालासाठी नाशिक जिल्हयातील करंजवण व हरणबारी या दोन प्रकल्पांची निवड करण्यात आली. सदर सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी पुनर्वसन विषयक स्थिती कशा प्रकारची आहे. तसेच पुनर्वसन कार्यक्रम संबंधित प्रकल्प बाधित/विस्थापितांचे समाधाना इतपत राबविण्यात आला आहे किंवा कसे अशा अनुषंगिक बाबींचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेने हाती घेतले.

सदर अभ्यास अहवाल तयार करण्याचे काम श्री.सी.रा.शेवकरी, संशोधन सहाय्यक यांचेकडे सोपविण्यात आले. त्यांनी श्री.आर.आर.साबळे, वरिष्ठ लिपीक व श्री.एस.व्ही.लडकत, वरिष्ठ लिपीक यांचे सहकार्याने क्षेत्रीय पहणीचे काम पूर्ण केले. सदर अभ्यास अहवाल लेखनाचे काम श्री.सी.रा.शेवकरी, संशोधन सहाय्यक यांनी श्री.जी.पी.रामटेके, उपसंचालक (मूल्यमापन) यांचे देखरेखीखाली व माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

सदर मूल्यमापन अभ्यास अहवालासाठी संबंधित करंजवण सिंचन प्रकल्प व हरणबारी सिंचन प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच नाशिक जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनीही संबंधित सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापितांसंबंधी आवश्यक ती माहिती पुरवून अभ्यास अहवालाच्या पूर्ततेसाठी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. या संस्थेतील टंकलेखन कक्षाने तत्परतेने काम हाती घेऊन पूर्ण केल्याबद्दल त्यांनाही धन्यवाद.

मला खात्री वाटते की, सिंचन प्रकल्पामुळे बाधित व विस्थापितांचे पुनर्वसनाचे काम सोपविलेल्या अधिका-यांना सदर मूल्यमापन अभ्यास अहवाल उपयुक्त ठरेल. आपणासी असे की, भविष्यकाळामध्ये पुनर्वसन कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने या अभ्यास अहवालात केलेल्या सूचना/शिफारसी स्विकारल्या व राबविल्या तर प्रकल्प बाधितांना/विस्थापितांना सार्वजनिक सेवाद्वारे "आधी पुनर्वसन मगच धरण" असे म्हणायची पाळी येणार नाही. विस्थापितांचे पुनर्वसन कार्यक्रमाविषयी स्वारस्य असलेल्या अभ्यासकांना व संशोधकांना हा अहवाल मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल असे मला वाटते.

(डॉ. नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-1.

पुणे
दिनांक : 14 - 8 -95

## अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पाने पासून | पाने पर्यंत |
|---|---|---|---|
| 1. | प्रस्ताविक - पर्श्वभूमी | 1 | 8 |
| 2. | मूल्यमापन अभ्यास अहवालाची उद्दिष्टे व क्षेत्रीय पहणीसाठी नमुना निवड पद्धती | 9 | 10 |
| 3. | नाशिक जिल्हयाची सर्वसाधारण माहिती तसेच क्षेत्रीय पहणीसाठी निवडलेल्या सिंचन प्रकल्पांची ठळक वैशिष्टये | 11 | 21 |
| 4. | पुनर्वसनासंबंधी शासन विभागांची मार्गदर्शक तत्वे तसेच राज्य शासनाचे धोरण अधिनियम 1976 तसेच 1986 मधील ठळक तरतुदी. | 22 | 48 |
| 5. | करंजवण मोठया सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांचे क्षेत्रीय पहणीतील माहितीचे पृथःक्करण. | 49 | 60 |
| 6. | हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांचे क्षेत्रीय पहणीतील माहितीचे पृथःक्करण. | 61 | 77 |
| 7. | पुनर्वसित गावासंबंधी गाव पत्रकात गोळा केलेल्या माहितीचे पृथःक्करण. | 78 | 89 |
| 8. | क्षेत्रीय पहणीतील निरीक्षण व निष्कर्ष | 90 | 95 |
| 9. | पुनर्वसन कार्यक्रमासंबंधी सूचना तथा शिफारशी | 96 | 105 |
| 10. | आदर्श पुनर्वसन संकल्पना/योजना कार्य नियोजन | 106 | 111 |
| | संदर्भ ग्रंथ सूची | 112 | 112 |
| | क्षेत्रीय पहणीसाठी वापरलेली पत्रके : | | |
| | 1. कुटुंबपत्रक (प्रपत्र 1) | 113 | 116 |
| | 2. योजना राबविणा-या अधिका-यांसाठी पत्रक (प्रपत्र 2) | 117 | 118 |

# प्रकरण 1 ले

---------

## प्रास्ताविक माहिती

--------------

**नियोजनात्मक विकासासाठी प्रकल्पाची निकड**

देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जनतेचे कल्याण विशेषतः समाजातील अनुसूचित जाती, जमाती व आर्थिक दुर्बल घटकांचे कल्याण हाच राष्ट्रीय विकासाचा एक प्रमुख प्रश्न दृष्टीसमोर होता. म्हणूनच देशाच्या संविधाना मध्ये त्यादृष्टीने काही तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुलक्षून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासास गती देण्यासाठी निरनिराळ्या विकास प्रकल्पांची उभारणी करण्यात आली. मागास भागाचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी राष्ट्रीय नियोजनामध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचा सुयोग्य वापर करण्याच्या हेतूने नवीन कारखाने विकसित करण्यात आले. परिणामतः विकासाचे विविध प्रकल्प राबविण्याची संधी उपलब्ध झाली. त्यामध्ये सिंचन प्रकल्प (मोठे व मध्यम), उर्जा निर्मिती प्रकल्प, बांधकाम, दळणवळण तसेच औद्योगिक उत्पादन वाढीसंबंधीचे प्रकल्प यांचा अंतर्भाव करण्यात आला. कारण प्रादेशिक विकासातील समतोल राखण्यामध्ये सदर प्रकल्पांचा सिंहाचा वाटा असतो. हे नियोजनाच्या सुरुवातीपासूनच ओळखण्यात आले आहे. मागास व अविकसित अनुसूचित क्षेत्राच्या विकासासाठी व तेथील लोकांच्या आर्थिक अभ्युदयासाठी अशा प्रकल्पांचे योगदान महत्वाची भूमिका बजावते असे निदर्शनास आले आहे.

**विविध प्रकल्पातंर्गत आदिवासींचे विस्थापन**

सदर प्रकल्पांच्या अंमलबजावणीमुळे समाजातील विशेषतः अनुसूचित जाती जमाती तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील लोकसंख्येचे विस्थापन मोठया प्रमाणावर होत असते. ही एक वस्तुस्थिती आहे. उदाहरणादाखल काही प्रकल्प सांगता येतील. सरदार सरोवर प्रकल्पाखाली विस्थापित होणा-या 70 हजारापैकी 60 हजार लोक आदिवासी आहेत (बावा 1987) प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी एकटया मध्य प्रदेशामध्येच 36,200 हेक्टर जमीन आदिवासीकडून काढून घेण्यात आली. एवढेच नव्हे तर यापेक्षा कितीतरी जमीन पाण्याखाली बुडाली आहे. जवळजवळ 1162 गांवे खाली

करण्यात आली आहेत. §माहेश्वरी 1987-4§ आपसी असे की, आंध्र प्रदेशातील पूर्व किनारपट्ठीवरील "रॉकेट लॉचिंग सेशन" उभारणीमुळे सुमारे 10 हजार लोकांचे विस्थापन झाले. त्यामध्ये बहुतेक येनाडी आदिवासी जमातीचे होते. §रेड्डी आणि रेड्डी 1985-19§, अनुसूचित जाती-जमातीचे आयोगाच्या ताज्या अहवालानुसार देशातील निरनिराळया भागात राबविलेल्या 119 सिंचन व वीज प्रकल्पामुळे सुमारे 16.94 लाख लोक विस्थापित झाले. त्यापैकी निम्मे म्हणजे 8.14 लाख आदिवासी आहेत. §राय 1987§ याशिवाय देशातील विविध भागातील 36 नवीन प्रकल्पाबाबत गोळा केलेल्या माहितीवरुन असे निदर्शनास येते की, प्रकल्पांतर्गत 5.4 लाख आदिवासी विस्थापित/बाधित झालेले आहेत. §आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे 1987-21§ "आदिवासींचा विकास" संबंधीच्या अभ्यासगटाने असा अंदाज केला आहे की, सर्वसाधारणपणे जवळजवळ प्रत्येक प्रकल्पाखाली आदिवासींचे विस्थापन झाले असून त्यांच्या विस्थापनाचे प्रमाण हे 52 टक्क्यापासून 100 टक्क्यापर्यंत आढळून येते. ही सर्व आकडेवारी हे स्पष्ट करते की, हे सर्व प्रकल्प आदिवासींच्या जीवनावर मोठया प्रमाणावर परिणाम करतात व प्रभाव पडतात.

वरील देश पातळीवरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील काही मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत जनजाती क्षेत्रास मिळणा-या फायद्याची टक्केवारी जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते.

महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत मध्यम सिंचन प्रकल्प व त्यांची अंतिम सिंचन क्षमता व जनजाती क्षेत्रास मिळणा-या लाभांची टक्केवारी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे

तक्ता क्र•1

जिल्हानिहाय सिंचन प्रकल्प व जनजाती क्षेत्रास मिळणारा लाभ

| अ•क्र• | जिल्हा | प्रकल्प संख्या | प्रकल्पाचे नांव | अंतिम सिंचन क्षमता {हे•} | जनजाती क्षेत्रास मिळणा-या फायद्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1• | ठाणे | 1 | 1• वांद्री | 3066 | 100•00 |
| 2• | नाशिक | 3 | 1• हरणबारी | 9726 | 10•87 |
| | | | 2• केळझर | 3520 | 10•87 |
| | | | 3• आळंदी | 6296 | 44•05 |
| | | | 4• करंजवण | 1554 | 10•04 |
| 3• | धुळे | 3 | 1• अनेर | 8170 | 21•05 |
| | | | 2• रंगावली | 3990 | 100•00 |
| | | | 3• देहाली | 3165 | 100•00 |
| 4• | नांदेड | 3 | 1• नागझरी | 1259 | 10•00 |
| | | | 2• लोणी | 1790 | 90•00 |
| | | | 3• डोंगरगांव | 1250 | 22•00 |
| 5• | यवतमाळ | 2 | 1• बोरगांव | 2614 | 25•10 |
| | | | 2• अंतरगांव | 1672 | 66•75 |
| 6• | गडचिरोली | 1 | 1• दोनानदी | 11356 | 31•43 |
| 7• | चंद्रपूर | 4 | 1• चारगांव | 2120 | 100•00 |
| | | | 2• चंदाईनाला | 2290 | 100•00 |
| | | | 3• अंधलनाला | 3900 | 100•00 |
| | | | 4• लवानसरार | 2000 | 32•60 |

आधार : कार्यक्रम अंदाजपत्रक 1993-94 {आदिवासी विकास विभाग}


वरील तक्त्यावरुन माहितीचे परीक्षण करता असे दिसून येते की, ठाणे, नाशिक, धुळे, चंद्रपूर या जिल्हयातील सिंचन प्रकल्पामुळे आदिवासी क्षेत्रास 100 टक्के फायदा मिळू शकतो, तर नांदेड, यवतमाळ, गडचिरोली जिल्हयातील सिंचन प्रकल्पामुळे आदिवासी क्षेत्रास लक्षणीय प्रमाणात फायदा मिळू शकत नाही. नियोजनातील विकासामध्ये मोठया प्रकल्पांची आखणी व उभारणी करणे अत्यंत गरजेचे आहे, असे गृहित धरले तर सदर प्रकल्पांची झळ मात्र आदिवासी कुटुंबांना मोठया प्रमाणात सहन करावी लागते, ही एक वस्तुस्थिती आहे. सदर प्रकल्पामध्ये आदिवासींची शेतीवाडी व घरे बाधित व विस्थापित होतात, मग त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उभा राहतो.

विविध प्रकल्पांतर्गत विस्थापित/बाधित झालेल्या सर्व घटकांचे व आदिवासींचे योग्य रितीने पुनर्वसन करण्याची जबाबदारी संबंधित सिंचन/उर्जा/औद्योगिक प्रकल्प व महसूल विभाग यांच्या सहकार्याने व समन्वयाने पार पाडण्यात येते. तथापि, आदिवासींचे पुनर्वसन योग्य रितीने पार पडतेच असे नाही. कारण विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. मानवतावादी दृष्टिकोनातून त्या प्रश्नाकडे पहाणे गरजेचे आहे. जेणेकरुन पुनर्वसनाची प्रक्रिया बाधित घटकांच्या समाधाना इतपत पूर्ण करता येईल. परंतु प्रत्यक्षात विस्थापितांच्या प्रश्नांकडे अंशात्मक व तुटकपणाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. परिणामतः विस्थापितांचे पुनर्वसनाची समस्या व तिची समाधानकारकरित्या सोडवणूक करणे ही एक गंभीर बाब होऊन बसते. अशा परिस्थितीत प्रकल्प बाधित आदिवासी या समाजातील अत्यंत दुर्बल घटकांचे विस्थापनातून पुनर्वसन कशाप्रकारे करण्यात आले आहे, याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. विस्थापितांच्या प्रश्नाचे स्वरुप व त्यावरील उपाययोजना व त्यातील त्रुटी/विसंगती यांचा मूल्यमापनात्मक अभ्यास करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने प्रकल्पांतर्गत विस्थापित/बाधित झालेल्या निरनिराळया आदिवासींच्या प्रश्नांचे स्वरुप अभ्यासले आहे व त्यासंबंधीचे मूल्यामापन अभ्यास अहवाल शासनास वेळोवेळी सादर केले आहेत.


राज्यातील नाशिक जिल्हयातील निवडक सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसनाची स्थिती व त्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी मूल्यमापन अभ्यास हाती घेण्याचे ठरले.


विस्थापन व पुनर्वसन या दोन प्रक्रियाविषयी आकृति स्वरुपातील माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे.

विस्थापन कशासाठी ?




विस्थापन कशामुळे ?


विविध प्रकल्प
सिंचन प्रकल्प
वीज/उर्जा निर्मिती
औद्योगिक
मोठे सिंचन प्रकल्प
मध्यम सिंचन प्रकल्प
संबंधित यंत्रणा
संबंधित यंत्रणा




# विस्थापन प्रक्रियेची सुरुवात
# पुनर्वसन कार्यक्रम





**विस्थापन पुनर्वसन** — **प्रक्रियेतील संबंधित जबाबदार शासन विभाग**



# प्रकरण 2 रे

## मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे व नमुना निवड पद्धती

शासनाने हाती घेतलेल्या सिंचन व इतर प्रकल्पांसाठी जमिनी व घरे जलमय झाल्यामुळे पुष्कळसे लोक बाधित झालेले आहेत, विस्थापित झालेले आहेत. त्यासाठी शासनाने मानवतावादी दृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पहून विस्थापितांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम अंगिकारला आहे. त्या कार्यक्रमांतर्गत विस्थापित कुटुंबांना जमिनीचे वाटप व राहत्या घरासाठी जागा विकसित करुन देण्याचे धोरण ठरविले आहे. तसेच त्या कार्यक्रमांतर्गत निरनिराळया सुविधा म्हणजे नागरी सुविधा/सेवा उपलब्ध करुन देण्याची मान्य केले आहे, जेणेकरुन पुनर्वसनाची प्रक्रिया सुलभ व सहजपणे शांततेने पार पडेल.

प्रकल्प बाधित कुटुंबाचे विशेषतः आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसनासाठी केंद्र शासनाने त्यावेळच्या प्रकल्पांना प्राधिकृत 20 कलमी कार्यक्रमांतर्गत अग्रक्रम दिलेला होता. यासंबंधात केंद्र शासनाच्या उपमंत्री §कल्याण§ यांनी आदिवासी क्षेत्रातील मोठया व मध्यम प्रकल्पच्या उभारणीमुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसन कार्यक्रमाशी निगडीत विविध प्रश्नांची चर्चा करण्यासाठी दि.10-12-1986 रोजी एक बैठक बोलावली होती. या बैठकीत असे ठरविले की, राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील मोठया व मध्य सिंचन प्रकल्पात जमिनी व घरे बाधित/जलमय झाल्यामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसनासंबंधी प्रत्येक राज्य शासनाने सविस्तर सखोल अभ्यास करावा.

त्यानुसार राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने राज्यातील मोठया/मध्यम सिंचन प्रकल्पाखाली विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसन कार्यक्रमाविषयी मूल्यमापन अभ्यास हाती घेण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस वेळोवेळी सांगितले आहे. त्या अनुषंगाने या संस्थेने नाशिक जिल्हयातील आदिवासी क्षेत्रातील मोठे व मध्यम प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसनासंबंधीचा मूल्यमापन अभ्यास करण्याचे ठरविले. नाशिक जिल्हयातील करंजवण मोठा सिंचन प्रकल्प व हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसनासंबंधी मूल्यमापन अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टे डोळयासमोर ठेवण्यात आली आहेत.

### उद्दिष्टे

1. सिंचन प्रकल्पाखाली विस्थापितांच्या प्रश्नाचे स्वरुप जाणून घेणे.
2. पुनर्वसन कार्यक्रमातील अंमलबजावणीमधील त्रुटी.
3. पुनर्वसन कार्यक्रमाबाबत विस्थापितांचा दृष्टीकोन जाणून घेणे.
4. विस्थापितांचे पुनर्वसन करणा-या अंमलबजावणी अधिका-यांना त्यांचे कामात येणा-या अडचणी जाणून घेणे.

5· पुनर्वसन कार्यक्रम प्रभावीपणे व यशस्वीरित्या राबविण्याबाबत विधायक स्वरूपाच्या सूचना व शिफारसी करणे·

प्रकल्पनिवड पद्दती :

नाशिक जिल्हयाच्या आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये मोठे व मध्यम प्रकल्प मिळून एकूण 13 सिंचन प्रकल्प आहेत· त्यातील बहुतेक प्रकल्प पूर्ण झालेले असून काहींच्या अंतर्गत कालव्यांची कामे पूर्ण करण्यात आली, तर काहींच्या बाबतीत ती कार्यान्वित आहेत· काही मोठया व मध्यम प्रकल्पांतर्गतच आदिवासी कुटुंबांचे विस्थापन झालेले आढळून येते· ज्या सिंचन प्रकल्पांतर्गत जास्तीत जास्त आदिवासी कुटुंबे विस्थापित झाली अशाच प्रकल्पांचा विचार करून सदर प्रकल्प मूल्यमापन अभ्यास अहवालासाठी निवडावेत असे ठरविण्यात आले· त्यानुसार नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यातील करंजवण मोठा प्रकल्प व बागलाण तालुक्यातील हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्पांची निवड करण्यात आली·

सदर प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या कुटुंबांची, नवीन पुनर्वसित गावठाणांची माहिती गोळा करण्यासाठी निरनिराळी पत्रके तयार करण्यात आली· त्यामध्ये खालील पत्रकांचा समावेश होतो :

1· पत्रक – 1 – सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित/बाधित झालेली गांवे/कुटुंबे/खातेदार यांची माहिती नोंदविण्यासाठी
2· पत्रक – 2 – पुनर्वसित नवीन गावठाणातील सुविधा-माहिती संकलनासाठी
3· पत्रक – 3 – विस्थापित झालेल्या कुटुंबांची माहिती संकलित करण्यासाठी
4· पत्रक – 4 – पुनर्वसन कार्यक्रम राबविणा-या अधिका-यांचे अभिप्राय नोंदविण्यासाठी

अशा प्रकारे क्षेत्रीय पाहणीद्वारे चारही प्रपत्रामध्ये संबंधित शासकीय विभाग व पुनर्वसित कुटुंबे यांचेकडून माहिती संकलन करण्याचे ठरले·

····

## प्रकरण ३ रे

### नाशिक जिल्हा - सर्वसाधारण भौगोलिक,प्राकृतिक स्थिती, क्षेत्र व लोकसंख्या

नाशिक जिल्हा महाराष्ट्र प्रदेशिक विभाग नाशिकमध्ये मोडतो. नाशिक जिल्हयाचे क्षेत्रफळ 15,530 चौ.कि.मी.असून नाशिक, सिन्नर, निफाड, इगतपुरी, चांदवड, पेठ, सुरगणा, दिंडोरी, मालेगांव, कळवण, बागलाण, येवला व नांदगांव असे तेरा तालुके समाविष्ट आहेत. जिल्हयातील शेतीलायक क्षेत्र 10,54,798 हेक्टर्स (67.92 टक्के) आहे. जिल्हयातील एकूण लोकसंख्या (सन 1991 च्या जनगणनेप्रमाणे) 38.51 लाख इतकी असून त्यात 9.31 लाख आदिवासी आहेत. आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 24.18 टक्के इतके आहे.

नाशिक जिल्हा प्राकृतिक दृष्टया दोन खो-यात विभागला जातो. नाशिक जिल्हयाचा काही भाग तापी नदीच्या खो-यात तर काही भाग गोदावरी नदीच्या खो-यात वसलेला आहे.

| अ.क्र. | खोरे | वसलेले तालुके |
|---|---|---|
| 1. | तापी नदीचे खोरे | पेठ,सुरगणा,कळवण,बागलाण,नांदगांव,मालेगांव |
| 2. | गोदावरी नदीचे खोरे | दिंडोरी,चांदवड,निफाड,सिन्नर,येवला,इगतपुरी,नाशिक |

#### नद्या :

गोदावरी व गिरणा या जिल्हयातील दोन मुख्य नद्या आहेत. दारणा, कादवा, कडवा, मोसम, आरम, मन्याड या उपनद्या आहेत. गोदावरी नदी ब्रम्हगिरी पर्वतात उगम पावून या जिल्हयातील नाशिक व निफाड तालुक्यातून 96 कि.मी. लांब वाहत जाते व पुढे अहमदनगर जिल्हयात वाहत जाते. कडवा, दारणा, कादवा या नद्या गोदावरीस मिळतात.

गिरणा नदी सुरगणा तालुक्यात हातवड या गावाजवळ उगम पावून या जिल्हयातील कळवण व मालेगांव या तालुक्यातून 144 कि.मी. लांब वहात जाते. मोसम, आरम, मन्याड या नद्या गिरणा नदीस मिळतात. या दोन्ही मुख्य नद्या पूर्ववाहिनी आहेत.

वैतरणा नदी ब्रम्हगिरी डोंगरातून उगम पावून पश्चिमेकडे ठाणे जिल्हयातून वाहत जावून अरबी समुद्रास मिळते. भानसा नदी कळसूबाई जवळच्या डोंगरातून उगम पावून ठाणे जिल्हयातील उल्हास नदीस मिळते. तसेच दमन नदी पेठ तालुक्यात उगम पावून पश्चिमेकडे गुजराथ राज्यात वाहत जावून अरबी समुद्राला मिळते. या जिल्हयातील कोणतीही नदी जलवाहतुकीस योग्य नाही.

**पर्जन्यमान :**

नाशिक जिल्हयात जून ते ऑक्टोबर पर्यंत नैऋत्य मान्सून वाऱ्यामुळे पाऊस पडतो. सर्व जिल्हयात पावसाचे प्रमाण सारखे नसते. पश्चिम भागात सह्याद्रीच्या पायथ्याला वसलेल्या सुरगणा, पेठ, इगतपुरी तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त असते. तर चांदवड, निफाड, येवला व सिन्नर या तालुक्यात ते अत्यल्प असते. एकूण पर्जन्यमानाप्रमाणे खालील विभाग पडतात.

| अ.क्र. | पर्जन्यमान | तालुके |
|---|---|---|
| 1. | 2250 ते 3000 मि.मी. | इगतपुरी, नाशिक |
| 2. | 1250 ते 2250 मि.मी. | नाशिक, सुरगणा, पेठ |
| 3. | 700 ते 1250 मि.मी. | नाशिक, कळवण, दिंडोरी |
| 4. | 500 ते 700 मि.मी. | नाशिक, बागलाण, मालेगांव, येवला, चांदवड, निफाड,सिन्नर, नांदगांव |

**पिकपाणी :**

नाशिक जिल्हयाच्या पश्चिम भागात म्हणजे इगतपुरी, नाशिक, पेठ, कळवण, दिंडोरी, बागलाण, सुरगणा या तालुक्यात भात, नागली, मूग, तूर, उडीद इ. पिके खरीप हंगामात घेतात. जेथे पाटबंधारे पाणी उपलब्ध आहे तेथे गहू, हरबरा, ज्वारी, भाजीपाला इ. पिके रब्बी हंगामात घेतात.

नाशिक जिल्हयाचा पूर्वभाग साधारणपणे सपाट व कमी पावसाचा आहे. त्यामध्ये सिन्नर, निफाड, मालेगांव, येवला, कळवण {पूर्वभाग}, बागलाण {पूर्वभाग}, दिंडोरी {पूर्वभाग}, नांदगांव, चांदवड या तालुक्यांचा समावेश होतो. या भागात बाजरी, ज्वारी, तूर, मूग, उडीद, भुईमूग ही पिके काढली जातात. पाटबंधारे पाणी उपलब्ध असलेल्या क्षेत्रात गहू, हरबरा, ज्वारी, कांदा, भाजीपाला ही पिके घेतली जातात याशिवाय ऊस व इतर बारमाही पिकेसुध्दा या भागातील पाटबंधारे पाणी सोयीनुसार व विहिरीतील पाण्यावर घेतली जातात.

**नाशिक जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्र :**

आदिवासी उपयोजनेत नाशिक जिल्हयातील पेठ, सुरगणा, कळवण हे संपूर्ण तालुके व नाशिक, इगतपुरी, दिंडोरी, बागलाण या तालुक्यातील काही भाग येतो. जिल्हयातील एकूण 1,742 खेडयापैकी 775 आदिवासी खेडी आहेत. आदिवासी क्षेत्राची 1991 जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 9.33 असून त्यातील आदिवासींची संख्या 6.02 लाख इतकी आहे. आदिवासी क्षेत्रातील एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 65 टक्के आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाबत सविस्तर माहिती तक्ता क्र.3.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे :

**तक्ता क्र.3.1**

नाशिक जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पनिहाय गांवे एकूण व आदिवासी लोकसंख्या (सन 1991 च्या जनगणनेनुसार)

| अ.क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व त्यातील तालुके | आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट क्षेत्रप्रकार | गांवे/ शहरे | लोकसंख्या एकूण | लोकसंख्या आदिवासी | आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| अ) | कळवण ए.आ.वि.प्र. | - | 419 | 3,85,642 | 2,61,640 | 68 |
| 1. | कळवण | आ.उ.क्षे. | 173 | 1,98,843 | 10,31,181 | 52 |
| 2. | सुरगणा | आ.उ.क्षे. | 176 | 1,09,332 | 1,04,708 | 96 |
| 3. | बागलाण | अआ.उ.क्षे. | 60 | 66,738 | 48,759 | 73 |
| | | आ.उ.क्षे. | 3 | 4,489 | 925 | 21 |
| 4. | चांदवड | मिनी माडा | 7 | 6,247 | 4,067 | 65 |
| ब) | नाशिक,ए.आ.वि.प्र. | - | 472 (2) | 5,48,669 | 3,41,122 | 62 |
| 1. | पेठ | आ.उ.क्षे. | 172 | 1,28,019 | 1,21,552 | 95 |
| 2. | दिंडोरी | आ.उ.क्षे. | 117 | 1,66,379 | 93,308 | 56 |
| 3. | इगतपुरी | आ.उ.क्षे. | 93(1) | 1,42,249 | 62,738 | 44 |
| | | माडा | 9 | 10,951 | 5,043 | 53 |
| 4. | नाशिक | आ.उ.क्षे. | 75(1) | 92,702 | 52,572 | 57 |
| 5. | सिन्नर | मिनीमाडा | 6 | 8,369 | 5,109 | 61 |

खुलासा : 1. आ.उ.क्षे. - आदिवासी उपयोजना क्षेत्र


2. अ.आ.उ.क्षे.- अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र

3. माडा - सुधारित क्षेत्रविकास खंड

4. मिनी माडा - सुधारित लघु क्षेत्र विकास खंड

आधार : सांख्यिकी मालिका क्र.38 ,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे.

Graph showing tahsilwise villages by area type in Nashik District.



## तक्ता क्र.3.2

आदिवासी क्षेत्रातील मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प व त्याअंतर्गत एकूण सिंचन क्षमता व आदिवासी क्षेत्राला मिळणारा लाभ (हेक्टर्स) सद्यःस्थिती.

| अ.क्र. | मोठे व मध्यम | प्रकल्पनिहाय सद्यस्थिती | | एकूण सिंचन क्षमता (हे.) | आदिवासी क्षेत्राला होणारा फायदा (हेक्टर्स) |
|---|---|---|---|---|---|
| | | धरण | कालवा | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | गंगापूर | पूर्ण | पूर्ण | 15,960 | 1,450 |
| 2. | वाघाड | पूर्ण | पूर्ण | 6,750 | 6,600 |
| 3. | पलसेड | पूर्ण | पूर्ण | 22,171 | 646 |
| 4. | करंजवण | पूर्ण | चालू | 1,574 | 1,574 |
| 5. | नांदूरमध्यमेश्वर प्रकल्प | | | | |
| | अ. भावली प्रकल्प | - | - | 3,591 | 2,106 |
| | ब. भाम | - | - | | |
| | क. औंध (मुकणे) | - | - | | |
| | ड. वाकी (कुर्नोली) | - | - | | |
| 6. | पुनद | प्राथमिक अवस्था | | 12,051 | 12,051 |
| 7. | केळझर | पूर्ण | पूर्ण | 3,410 | 3,410 |
| 8. | हरणबारी | पूर्ण | चालू | 8,226 | 980 |
| 9. | पुनेगांव | प्राथमिक अवस्थेत | | 6,984 | 75 |
| 10. | चणकापूर | पूर्ण | पूर्ण | 9,887 | 446 |
| 11. | पंझण डावा कालवा प्रकल्प | | | 3,348 | - |
| 12. | काश्यपी मध्यम प्रकल्प | | | 2,066 | - |
| 13. | आळंदी मध्यम प्रकल्प | | | 6,296 | 2,989 |
| | | एकूण | | 1,20,314 | 32,327 |

आधार : पाटबंधारे योजना विषयक माहिती जि.नाशिक जून,93

या व्यतिरिक्त आदिवासी क्षेत्रात प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेले, अन्वेषणाखालील व भविष्यकाळात हाती घ्यावयाचे मोठे व मध्यम प्रकल्पांची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र.3.3**

अन्वेषणाखाली असलेले व भविष्यकालीन मोठे व मध्यम प्रकल्प अंतर्गत आदिवासी क्षेत्राला होणारा फायदा.

| अ.क्र. | अन्वेषणाखालील व भविष्यातील मोठे व मध्यम प्रकल्प (प्रशासकीय मान्यता मिळालेले) | एकूण सिंचन क्षमता (हे.) | आदिवासी क्षेत्राला होणारा फायदा (हेक्टर्स) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | पार मध्यम प्रकल्प | 2,820 | 2,820 | 100 टक्के |
| 2. | श्रीमंत मध्यम प्रकल्प | 1,450 | 1,450 | 100 टक्के |
| 3. | सासुर प्रकल्प (बहृत्लघु) | 841 | 841 | 100 टक्के |
| 4. | रोशनी प्रकल्प " | 850 | 850 | 100 टक्के |
| 5. | आमदा नदी प्रकल्प | 1,609 | 1,609 | 100 टक्के |
| 6. | अप्पर कडवा प्रकल्प | 1,495 | 1,495 | 100 टक्के |
| 7. | मडकी जाम | 783 | 783 | 100 टक्के |
| 8. | आमदे | 858 | 858 | 100 टक्के |
| | एकूण | 10,706 | 10,706 | 100 टक्के |

आधार : पाटबंधारे योजना विषयक माहिती जि.नाशिक 1993 प्रकाशन

वरील तक्त्यातील माहितीवरून असे दिसते की, भविष्यकाळात पूर्ण करावयाच्या प्रकल्पामुळे आदिवासी क्षेत्राला शंभर टक्के फायदा होणार आहे.

## सिंचन प्रकल्पांचे वर्गीकरण

सर्वसाधारणपणे मोठे सिंचन प्रकल्प व मध्यम सिंचन प्रकल्प अशी प्रकल्पांची वर्गवारी सदर प्रकल्पांच्या संभाव्य सिंचन क्षेत्राच्या क्षमतेवरून करण्यात येते. तेव्हां मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प तसेच लघुसिंचन प्रकल्प यांची सिंचन क्षेत्रानुरुप वर्गवारी येथेप्रमाणे :

अ) मोठे सिंचन प्रकल्प - ज्या सिंचन प्रकल्पांतर्गत 10,000 हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र ओलिताखाली येते अशा प्रकल्पांना मोठे सिंचन प्रकल्प संबोधण्यात येते.

ब) मध्यम सिंचन प्रकल्प - ज्या सिंचन प्रकल्पाखालील ओलित क्षेत्र 10,000 हेक्टरपर्यंत असते अशा प्रकल्पांना मध्यम सिंचन प्रकल्प समजण्यात येते.

क) लघु सिंचन प्रकल्प - ज्या प्रकल्पाखाली किमान 250 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते अशा प्रकल्पांना लघुसिंचन प्रकल्प समजले जाते.

मूल्यमापन अभ्यासासाठी निवडलेल्या सिंचन प्रकल्पांची ठळक वैशिष्ट्ये :

अ) करंजवण मोठा सिंचन प्रकल्प :

हा प्रकल्प नाशिक जिल्हयातील उर्ध्व गोदावरी मोठा सिंचन प्रकल्पाचा एक भाग आहे. कादवा नदीवर मौजे करंजवण ता.दिंडोरी येथे हे धरण बांधण्यात आले आहे. सदर प्रकल्पाच्या धरणाचे काम सन 1994 मध्ये पूर्ण करण्यात आले. या धरणामुळे दिंडोरी तालुक्यातील एकूण 1,574 हेक्टर जमिनीस सिंचनाचा लाभ होतो.

या प्रकल्पांतर्गत बाधित गावांची संख्या 8 (केवळ जमीन गेल्यामुळे) असून बुडीत क्षेत्रामध्ये एक गावाचा समावेश होतो. प्रकल्प बाधित घरांची संख्या 95 इतकी होती तर विस्थापित लोकसंख्या 1600 इतकी होती.

या प्रकल्पांची इतर ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

1. धरणाचे स्थळ - करंजवण, ता.दिंडोरी

2. धरणाची उंची - 42.92 मीटर
   लांबी - 320.00 मीटर

3. प्रकल्पास जलआयोगाची मान्यता - सन 1971

4. प्रकल्पास प्रशासकीय मान्यता
   1. मूळ प्रस्ताव - 19 जुलै 1966
   2. सुधारित प्रस्ताव - 1988-89

5. प्रकल्प सुरु झाल्याचा दिनांक -
   1. धरण - नोव्हेंबर,1969
   2. कालवे - ऑगस्ट,1983

3· कालव्याची लांबी -उच्चस्तर - 6·50 कि·मी·
निम्नस्तर - 17·50 कि·मी·

6· प्रकल्पतंर्गत होणारा पण्याचा उपयुक्त साठा· - 166·22 द·ल·घ·मी·
{5870 द·लक्ष घनफूट}

7· प्रकल्पंतर्गत होणारी सिंचन क्षमता - 1574 हेक्टर्स

8· प्रकल्पंतर्गत बुडित क्षेत्र

| | |
|---|---|
| 1· सरकारी | - 300 हेक्टर्स |
| 2· वनक्षेत्र | - - |
| 3· खाजगी | - 1541 हेक्टर्स |
| एकूण | - 1841 हेक्टर्स |

9· प्रकल्प बाधित गांवे संख्या

1· केवळ जमीन गेल्यामुळे 8
1· करंजवण
2· पिंपरखेड
3· कोकणगांव
4· देवठाण
5· पिंपळगांव
6· धूम
7· वणी
8· नळवाडी

2· बुडणा-या गांवांची संख्या - 1 - नळवाडी

10·प्रकल्पामुळे किती गांवांचे पुनर्वसन करावे लागणार संख्या - 1 - नळवाडी

11·प्रकल्प बाधित घरांची संख्या - 92

12·प्रकल्प विस्थापितांचो लोकसंख्या{एकूण} - 1600

13·प्रकल्पंतर्गत तालुकानिहाय सिंचनक्षेत्र -

| तालुका | गांव | क्षेत्र (हे.) |
|---|---|---|
| 1. दिंडोरी | 1. करंजवण ) | |
| | 2. लखमापूर ) | 1574 |
| | 3. परमोरी ) | |

14. प्रकल्पावरील अद्ययावत खर्च 3/94 अखेर - 734.16 लाख

ब) हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्प :

नाशिक जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अनेक मध्यम सिंचन प्रकल्पापैकी एक सिंचन प्रकल्प आहे. मोसम नदीवर अंबापूर, ता. बागलाण येथे हे धरण बांधण्यात आले आहे. सदर प्रकल्पाच्या धरणाचे कामास ऑक्टोबर 1971 मध्ये सुरूवात झाली व सन 1980 मध्ये हे काम पूर्ण करण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत एकूण 9 गांवे बाधित झाली तर 3 गांवे जलमय झाली. प्रकल्प बाधित घरांची संख्या 1072 इतकी होती तर विस्थापितांची लोकसंख्या 6500 इतकी होती.

या प्रकल्पाची इतर ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| 1. | धरणाचे स्थळ/जागा | - अंबापूर, ता. बागलाण |
| 2. | धरणाची उंची | - 34.02 मीटर |
| 3. | प्रकल्पास जल आयोगाची मान्यता | - 1971 |
| 4. | प्रकल्पास प्रशासकीय मान्यता | |
| | 1. मूळ प्रस्ताव | - एप्रिल 1979 |
| | 2. सुधारित प्रस्ताव | - सप्टेंबर 1982 |
| 5. | प्रकल्प सुरु झाल्याचा दिनांक | |
| | 1. धरण | - ऑक्टोबर 1971 |
| | 2. कालवे | - |
| | 3. कालव्याची लांबी | - |
| 6. | प्रकल्पांतर्गत होणारा पाण्याचा उपयुक्त साठा | - 51.27 द.ल.घ.मी. |
| | | - (1813 द.ल.घ.फूट) |

7. प्रकल्पांतर्गत सिंचन क्षमता

1. जी.सी.ए. - 16.453 हेक्टर
2. सी.सी.ए. - 13,740 हेक्टर
3. आय.सी.ए. - 9,736 हेक्टर

8. प्रकल्पांतर्गत बुडित क्षेत्र

1. सरकारी -
2. वनक्षेत्र -
3. खाजगी - 466 हेक्टर

-------------

एकूण - 466 हेक्टर

-------------

9. प्रकल्पबाधित गांवे

1. केवळ जमीन गेल्यामुळे -9 - 1.
2.
3.
4.
5.
6.
7.
8.
9.

2. बुडणा-या गावांची संख्या 3 - 1. सरड
2. अंबापूर
3. विसापूर

10. प्रकल्पामुळे किती गावांचे पुनर्वसन करावे लागणार - 3 - 1. सरड
2. अंबापूर
3. विसापूर


11. प्रकल्पबाधित घरांची संख्या - 1072


12. विस्थापितांची लोकसंख्या - 6500

13. प्रकल्पांतर्गत तालुकानिहाय सिंचन क्षेत्र - 1. बागलाण - 3740 हे.
2. मालेगांव - 5986 हे.

14. प्रकल्पावरील अद्ययावत खर्च - एन.ए.

नाशिक जिल्हयातील सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या सिंचन प्रकल्पांतर्गत गांवाचे विस्थापनपुनर्वसन- दृष्टीक्षेपात





# प्रकरण 4 थे

## पुनर्वसनासंबंधी मार्गदर्शक तत्वे

विविध विकास प्रकल्पांतर्गत बाधित व विस्थापित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करणे ही एक अवघड समस्या होऊन बसते. अशा जटील समस्येची समाधानकारक सोडवणूक करण्यासाठी राज्यशासन तसेच औद्योगिक आस्थापना यांचेकडे विस्थापितांचे पुनर्वसन करण्यासंबंधात कोणत्याही प्रकारची मार्गदर्शक तत्वे नसतात, म्हणूनच ढेबर आयोगाने सदर प्रश्नांचा अभ्यास करून नमूद केले की, प्रकल्प विस्थापित/बाधीतांना नुकसान भरपाई देणे ही केवळ त्या प्रश्नांचे अंशतः उत्तर आहे. विस्थापितांचे आर्थिक अन् सामाजिक पुनर्वसन करण्यासाठी उपाययोजना करायला हवी.

त्या संदर्भात निरनिराळया केंद्रीय मंत्रालयांनी प्रसृत केलेली काही मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन त्यांचा आढावा घेणे अगत्याचे वाटते. तसेच विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनांनी अवलंबिलेल्या धोरणांचा/कृतींचा/उपाय योजनांचा अभ्यास करणे संयुक्तिक होईल.

भारत सरकारच्या गृह मंत्रालय, जलसाधन संपत्ती मंत्रालय, पर्यावरण व वन मंत्रालय, उद्योग मंत्रालय (सार्वजनिक उपक्रम विभाग) यांनी प्रसृत केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे थोडक्यात विवेचन खालील प्रमाणे केले आहे :-

1)

1. गृह मंत्रालय, नवी दिल्ली

या मंत्रालयामार्फत -

- सन 1982 मध्ये प्रसृत केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विस्थापित आदिवासींना नुकसान भरपाई,
- जमिनीकरिता जमीन (शक्यतो लाभ क्षेत्रातील) वाटप, तसेच
- विस्थापित कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी/रोजगार उपलब्धता याची तरतूद करण्यात आली आहे.
- आदिवासींनी लघु उद्योग उभारणीसाठी प्रशिक्षण व योग्य आर्थिक आधार सहाय्य
- आदिवासींच्या नवीन गावठाणात घरासाठी मोफत जागा, पिण्याचे पाणी,
- इतर मूलभूत शैक्षणिक व वैद्यकीय सुविधा

2. जलसाधन संपत्ती,मंत्रालय, नवी दिल्ली

- सन 1980 मध्ये या मंत्रालयाने लाभ क्षेत्रातील "शासकीय पडीक जमीन" पुनर्वसित आदिवासींना वाटप करण्यात यावी असे तत्व मांडले.
- लाभ क्षेत्रातील जमीन धारकांना विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जमीन देण्याची सक्ती करण्यात यावी.
- विस्थापित आदिवासींचे लाभ क्षेत्रामध्ये पुनर्वसन करण्याचे काम सुलभ व्हावे म्हणून तशा प्रकारचा अधिनियम {कायदा} करण्यास राज्यांना विनंती करण्यात आली आहे.
- अशा प्रकल्पांना मंजुरी देण्यापूर्वी समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्यासंबंधी राज्य शासनास विनंती केली आहे.

3. पर्यावरण व वन मंत्रालय

- उपरोक्त मंत्रालयाच्या पत्रा व्यवहारावरुन राष्ट्रीय नियोजन मंडळाने आता सर्व विभागावर बंधनकारक केले आहे की, राज्य शासनाच्या ज्या प्रकल्पांना हिरवा कंदील मिळवयाला पाहिजे असेल तर सदर प्रकल्पास वन {संरक्षण} अधिनियम 1980 च्या खाली केंद्र शासनाची पूर्व संमती घेणे आवश्यक आहे.

4. उद्योग मंत्रालय {सार्वजनिक उपक्रम विभाग}

- मोठया प्रकल्पांतर्गत विस्थापितांच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र शासनाने जमीन संपादन, संपादित जमिनीसाठी नुकसान भरपाई देणे, विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन इ. बाबत सविस्तर मार्गदर्शक तत्वे/सूचना उद्योग मंत्रालयाचे {सार्वजनिक उपक्रम विभाग} ओ.एम.क्र.15/13/84 बीपीई {सी}, दिनांक 3-2-1986 अन्वये प्रसृत केल्या आहेत.
- या मार्गदर्शक तत्वांचा बारकाईने अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, पूर्वी विस्थापित कुटुंबातील किमान एकास रोजगार देण्याबाबतची गृह मंत्रालयाची तरतूद {सूचना} मागे घेतली आहे. प्रकल्पाखाली कामास योग्य नसलेल्या व्यक्तींच्या जादा भरतीमुळे प्रकल्पाच्या व्यापारी संभाव्यतेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे असे वाटते.
- विस्थापित आदिवासी कुटुंबासाठी शेती, पशु संवर्धन, कुक्कुटपालन यासारखे नवीन उद्योग संघटित करुन आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्प प्राधिका-यांनी राज्य शासनास मदत करण्याची विनंती केली आहे.

पुनर्वसनातंर्गत अत्यावश्यक बाबी

सिंचन तसेच उर्जा प्रकल्पखाली बाधित झालेल्या लोकांचे / कुटुंबांचे पुनर्वसन करण्याच्या कार्यक्रमामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव होतो.

1. गावठाणाकरिता जागेची निवड,
2. पर्यायी शेत जमिनीची निवड,
3. नवीन गावठाणात सार्वजनिक सुविधांची सोय,
4. प्रकल्पबाधित कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी गरज ﴾आवश्यकता﴿ असलेल्या इतर सोयी व सवलती.

2﴿ विविध राज्य शासनांनी पुनर्वसनाबाबत अंगिकारलेले धोरण

पुनर्वसनाबाबत राज्य सरकारे निरनिराळया स्वरूपाची स्वतंत्र धोरणे अवलंबन ती राबवित आहेत.

विस्थापितांना जमीन वाटप

गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक राज्ये जमीन वाटप संबंधात आदिवासी कुटुंबांना प्रथम प्राधान्यक्रम देतात तर आंध्र प्रदेश, ओरिसा आणि पश्चिम बंगाल राज्य शासन मात्र या बाबतीत प्रकल्पाच्या परिसरात वास्तव्य करीत असलेल्या आदिवासींना प्राधान्य देण्यावर भर देतात. बिहार राज्य शासन मात्र आदिवासींना काही प्राधान्य देण्याच्या तत्वाचा स्विकार करते. परंतु त्यांना प्रथम प्राधान्यक्रम देण्याची आवश्यकता नसल्याचे मानते. महाराष्ट्र शासनाने आदिवासींना जमीन वाटप करण्याबाबत पाचवा प्राधान्यक्रम दिला आहे. जर अनुसूचित क्षेत्रामध्ये जमीन उपलब्ध नसेल तरच बिगर अनुसूचित क्षेत्रामधील जमीन वाटप करावी ﴾मुथय्या 1984 पान 19﴿

राज्यातील पुनर्वसन धोरणांची ठळक वैशिष्टये

महाराष्ट्र व ओरिसा राज्यांनी अंगिकारलेल्या पुनर्वसन धोरणांची काही ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे नमूद करता येतील.

महाराष्ट्र :

अ) पुनर्वसनाबाबत सर्वसमावेशक अशी देशातील एकमेव संघटना/संस्था महाराष्ट्र राज्यामध्येच आढळून येते. (गृह मंत्रालय 1984 - 18). महाराष्ट्र प्रकल्प विस्थापित लोकांचे पुनर्वसन अधिनियम 1976 मध्ये (The Maharashtra Resettlement of project displaced persons Act,76 ) प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्यासंबंधात अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्याचा थोडक्यात आढावा येणेप्रमाणे :

1. पुष्कळशा प्रकरणामध्ये प्रकल्पातंर्गत संपादित केलेल्या जमिनीच्या बदल्यात शेतक-याला जमिनीची आवश्यकता नसते. काही वेळेला त्याच क्षेत्रामध्ये त्याची दुसरी जमीन असते म्हणून दुस-या ठिकाणी दुसरीकडे बदली/पर्यायी जमीन कसणे त्याला तितकेसे सोयीचे वाटत नाही. काही वेळेला शेतक-याला पुनर्वसनासाठी मंजूर केलेल्या अनुदानाचे 75 ते 100 पट जादा अनुदान देण्यात यावे.

2. अनुसूचित जाती/जमातीच्या शेतक-यांच्या पुनर्वसनास प्रथम अग्रक्रम देण्यात यावा.

3. प्रकल्पातंर्गत लाभ क्षेत्रामध्ये पुनर्वसन सुलभ होण्यासाठी निरनिराळया प्रकारचे वेगळे निकष लावण्यात यावेत.

4. लाभ क्षेत्रातंर्गत संपादित करावयाची जमीन ही वरकस नाही, पडीक नाही याबाबत काळजी घ्यावी, पर्यायी जमीन म्हणून ही उपयुक्त असावी.

5. पर्यायी जमीन मिळविण्यासाठी प्रकल्प बाधितांनी त्यांना मिळणा-या नुकसान भरपाई रकमेच्या 75 टक्के रक्कम ठेव म्हणून शासनाकडे ठेवणे जरुरीचे आहे.

6. घरबांधणीसाठी प्रकल्प बाधितांना जादा कर्ज रक्कम मंजूर करण्यात यावी.

7. काही विशिष्ट परिस्थितीत प्रकल्प बाधितांना धरणामधून प्राधान्य तत्वावर पाणी वापरण्याची परवानगी देण्यात येईल.

8. प्रकल्प बाधितांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात येईल जेणेकरुन प्रकल्पांतर्गत आस्थापनेमध्ये प्राधान्य तत्वावर त्यांना शक्य तितकी पदे उपलब्ध करुन देण्यात येतील.

9. पुनर्वसित वसाहती या महसूल गांवे म्हणून समजण्यात येतील. अशा प्रकारच्या गावामध्ये विविध कार्यकारी सहकारी संस्था व सहकारी दुग्ध विकास संस्था स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

10. शेवटी शासनाने हाती घेतलेल्या सर्व प्रकल्पांच्या आस्थापनेमध्ये (सिंचन प्रकल्पासह) संवर्ग 3 व 4 ची पदे भरताना प्रकल्प बाधितांना अग्रक्रम देण्यात यावा.

ब) ओरिसा राज्यातील प्रकल्प बाधित/विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन धोरणांची ठळक वैशिष्ट्ये

ओरिसा राज्यमध्ये प्रकल्प बाधित विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन करण्याबाबत अंगिकारलेल्या धोरणांची माहिती करून घेणे तुलनात्मक अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे वाटते.

ओरिसा राज्यामध्ये सिंचन प्रकल्प तसेच औद्योगिक प्रकल्पामुळे स्वातंत्र्य प्राप्तीपासून आदिवासींचे मोठया प्रमाणावर विस्थापन झालेले आहे. सदर राज्याने मानवी प्रश्न दृष्टिकोनातून पुनर्वसनाबाबत खालील प्रकारची उपाय योजना केली आहे. त्याचो ठळक वैशिष्ट्ये खाली नमूद केल्याप्रमाणे : (ओरिसा शासन 1977).

1. आदर्श गांव वसाहतीमध्ये घरासाठी मोफत जागा वाटप सुविधा

जमिनीच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक विस्थापित कुटुंबाला घरवाडीसाठी 0.03 एकरापर्यंत मोफत जमीन देण्यात येईल. सदर घराची जागा व गाव आराखडा विकसित करण्याचा खर्च शासन सोशील.

2. शेतजमीन

ज्या कुटुंबाची जमीन प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे अशा प्रत्येक कुटुंबाला वहितीलायक 3 एकर बागायती किंवा 6 एकर बिगर बागायती जमीन किंवा दोन्हीही देण्यात येईल. त्याचे प्रमाण 1:2 इतके असेल. जमिनीच्या वहितीकरणाचा एकरी रु.600/- पर्यंतचा खर्च शासन करील. सदर जमिनी क्षार विरहित असतील, परंतु वहितीकरणाचा 50 टक्के खर्च जमीन धारकाकडून वसूल करण्यात येईल. तो मात्र एकरी जास्तीत जास्त रु.300/- इतक्या रकमेच्या अधीन असेल.

3. घरबांधणी

नवीन पुनर्वसित वसाहतीमध्ये घर सामान/साहित्य नेण्याचा वाहतुक खर्च विस्थापित कुटुंबाला देण्यात येईल. तसेच घरबांधणी साहित्य सवलतीच्या दराने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

4. सर्वसामान्य सुवियांची व्यवस्था

रस्ते, शाळा, पिण्याचे पाणी, विहिरी,तलाव, समाज मंदिर यासारख्या सर्वसाधारण सुविधांची व्यवस्था प्रकल्प सर्चामधून पुरविण्यात येईल आणखी असे की, ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत वीज पुरवठा करण्यासाठी सदर वसाहतींना अंतर्भूत करण्यात येईल.

5. लघुसिंचन प्रकल्प

शक्य तितक्या प्रमाणात नवीन पुनर्वसन वसाहतीमध्ये लघुसिंचन प्रकल्पांची सुविधा पुरविण्यात येईल.

6. वन विकास प्रतिबंध

पुनर्वसित क्षेत्रामध्ये जंगलवाढ मर्यादित राखण्याचे काम वन विभाग खात्याच्या यंत्रणेमार्फत करण्यात येईल.

7. सर्वसाधारण सुविधा/अंमलबजावणी व्यवस्था

अ) सिंचन प्रकल्पाच्या आयाकटमध्ये विस्थापितांचे पुनर्वसन करण्यासाठी अग्रक्रम देण्यात येईल.

ब) मोठया किंवा मध्यम प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याबरोबर जमिनींचे हस्तांतर, विभाजन व वाटणी यावर बंधने घालण्यात येतील.


क) जमीन वहितीखाली आणण्याच्या बाबतीत प्रकल्प हा एक घटक मानला जाईल तसेच जमीन वहितीचा दर एकरी खर्च जास्तीत जास्त रु.600/- इतका असेल.


ड) सार्वजनिक सुविधा म्हणजे शाळा इमारत, पिण्याचे पाणी, तलाव इ. बाबतची कामे प्रकल्प यंत्रणेमार्फत पार पाडण्यात येतील.

इ) पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा समन्वय साधण्यासाठी "पुनर्वसन सल्ला समिती" प्रत्येक प्रकल्पासाठी स्थापन करण्यात येईल. जर प्रकल्प बाधित क्षेत्र जिल्हयातंर्गत असेल तर जिल्हाधिकारी हे सदर समितीचे अध्यक्ष राहतील. परंतु प्रकल्प बाधित क्षेत्र हे एका जिल्हयापेक्षा अनेक ठिकाणी विभागले असेल तर महसूल खात्याचे विभागीय आयुक्त हे अध्यक्षस्थान ग्रहण करतील.

सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापितांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता यांचे कार्यालयाकडून त्याच्या अंदाजित खर्चासह मा.जिल्हाधिकारी किंवा निवासी जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येईल. त्याची एक प्रत सिंचन विभागाचे मुख्य अभियंता यांना पृष्ठांकित करण्यात येईल. जिल्हाधिकारी किंवा निवासी जिल्हाधिकारी वर नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंदाजित खर्च तपासून पाहतील व तो प्रस्ताव शासनास सादर करतील.

# पुनर्वसनांतर्गत/महत्त्वपूर्ण निकडीच्या बाबी- दृष्टीक्षेपात





## प्रकल्प बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधी राज्य शासनाच्या धोरणातील प्रमुख ठळक वैशिष्ट्ये

### (महाराष्ट्र प्रकल्प बाधित लोकांचे पुनर्वसन अधिनियम 1976 अंतर्गत)

क) पर्यायी शेत जमीन वाटप

अ) खालील चार प्रकारच्या जमिनीमधून प्राधान्यक्रमाने प्रकल्प बाधित व्यक्तींना शेत जमीन वाटप मंजूर करण्यात येते.

1. मोठया व मध्यम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात संपादित केलेल्या जमिनी,
2. कमाल जमीन धारणा कायद्यातंर्गत अधिकांश असलेली जमीन,
3. शासनाच्या पडीक जमिनी,
4. शासनाच्या वन जमिनी,

ब) मोठया व मध्यम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये विस्थापितांच्या/बाधितांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असेल त्या प्रमाणात 15 टक्क्यांपर्यंत जमिनीचे संपादन करण्यात येते. अशाप्रकारे संपादित केलेली जमीन मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापित/बाधित झालेल्या व्यक्तींना वाटण्यात येते.

क) मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पातंर्गत पुनर्वसनासाठी लाभ क्षेत्रातील जमिनीचे संपादन खालील गट श्रेणी पध्दतीने करण्यात येते. त्याचा तपशिल खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे :

| जमीन क्षेत्र (आकारमान) | संपादित करावयाचे क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|
| 1. 4 हे.-4.68 आर(10 एकर) | काही नाही |
| 2. 4 हे.-4.68 आर(10 एकर) - 6 हे.-7.02 आर (15 एकर) | 4 हे.- 4.68 आर (10 एकर) पेक्षा अधिक क्षेत्र परंतु 80.94 आर (2 एकर) पेक्षा अधिक नाही. |
| 3. 6 हे.-7.02 आर (15 एकर) - 12 हे.-14.05 आर (30 एकर)पर्यंत | 5 हे.- 25.09 आर (13 एकर) पेक्षा अधिकांश असलेले क्षेत्र परंतु 2 हे.- 2.34 (5 एकर पेक्षा अधिक नाही. |
| 4. 12 हे.- 14.05 (30 एकर) च्यावर | 10 हे.- 11.71 आर (25 एकर) पेक्षा अधिक क्षेत्र. |

उपरोक्त बाब क्र. 2 मध्ये 4 हे. 68 आर §10 एकर§ पेक्षा कमी जमीन क्षेत्र होत असेल तर संपादित करण्यात येणार नाही.

तथापि शासनास असे आढळून आले की, उपरोक्त गट श्रेणी पध्दतीनुसार प्रकल्प बाधितांना वाटप करण्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध होत नसेल तर खालील गट पध्दतीचा अवलंब करावा.

| जमीन क्षेत्र §आकारमान§ | संपादित करावयाचे क्षेत्र §हेक्टरमध्ये§ |
|---|---|
| 1. 3 हे., 23.75 आर §8 एकर§ | काही नाही |
| 2. 3 हे., 23.75 आर च्यावर §8 एकर§ आणि 4 हे.85.62 आर §12 एकर§ पर्यंत | 3 हे., 23.75 आर §8 एकर§ पेक्षा अधिक असलेले क्षेत्र परंतु 80.94 आर §2 एकर§ पेक्षा अधिक नाही. ज्याठिकाणी 3 हे., 23.75 आर §8 एकर§ पेक्षा क्षेत्र कमी होत असेल तर असे क्षेत्र संपादित करता येणार नाही. |
| 3. 4 हे., 85.62 आर §12 एकर§ च्यावर आणि 6 हे.,47.49 आर §15 एकर§ पर्यंत | 4 हे., 4.68 आर §10 एकर§ पेक्षा अधिक्य क्षेत्र परंतु 1 हे.,25.01 आर §3 एकर§ पेक्षा अधिक नाही असे क्षेत्र. |
| 4. 6 हे.,47.49 आर च्यावर §16 एकर§ आणि 8 हे., 9.37 आर§20 एकर§पर्यंत | 5 हे.,26.09 आर §13 एकर§ पेक्षा अधिक्य क्षेत्र परंतु 1 हे., 61.87 आर §4 एकर§ पेक्षा अधिक नाही इतके क्षेत्र |
| 5. 8 हे.,09.37 आर च्यावर §20 एकर§ आणि 9 हे. 71.24 आर §24 एकर§पर्यंत | 6 हे., 47.48 आर §16 एकर§ पेक्षा अधिक्य क्षेत्र परंतु 2 हे., 02.34 आर §5 एकर§ पेक्षा अधिक नाही. |
| 6. 9 हे.,71.24 आर §24 एकर§ च्यावर | 7 हे., 68.90 आर §19 एकर§ पेक्षा अधिक्य क्षेत्र. |

ड§ प्रकल्प बाधितांना पर्यायी जमिनीचे किमान व कमाल वाटप :

| प्रकल्पांतर्गत प्रकल्प बाधितांचे बाधित क्षेत्र | प्रकल्प बाधितांना लाभ क्षेत्रांतर्गत द्यावयाचे जमीन क्षेत्र |
|---|---|
| 1. 40.47 आर §1 एकर§पेक्षा कमी | 80.94 आर §2 एकर§ |
| 2. 40.47 आर §1 एकर§ पेक्षा अधिक आणि 80.94 आर §2 एकर§ पर्यंत | 80.94 आर §2 एकर§ पर्यंत |
| 3. 80.94 आर §2 एकर§ पेक्षा अधिक आणि 2 हे. 02.34 आर §5 एकर§ पर्यंत | 1 हे., 21.14 आर §3 एकर§ पर्यंत |
| 4. 2 हे.,02.34 आर पेक्षा अधिक §5 एकर§ | जास्तीत जास्त 1 हे.,61.87 आर §4 एकर§ |

टीप : 1. जर कुटुंबातील सभासद संख्या 8 पेक्षा अधिक असेल आणि 40.47 आर §1 एकर§ क्षेत्र प्रत्येक 3 जादा सभासदांसाठी देण्यात आले असेल तर कुटुंबाला एकूण जमीन स7 एकरापेक्षा अधिक होत नाही §या अटीच्या अधीन राहून§

2. 40.47 आर §1 एकर§ जमीन प्रकल्प बाधित भूमीहीन कुटुंबाला वाटपे करण्यात आली आहे परंतु इतर प्रकल्प बाधितांसमवेत जिथे खातेदार पुनर्वसित केले आहेत त्यांचे समवेत गाव सोडले असेल तर.

3. लाभ क्षेत्रासेरीज प्रत्येक प्रकल्प बाधितांना पडीक जिरायत जमीन क्षेत्राचे किमान 1 हे. 61.87 आर §4 एकर§ या राने केले आहे. वाटप करावयाचे जास्तीत जास्त क्षेत्र हे महाराष्ट्र जमीन महसूल §शासकीय जमिनीचे वाटप§ नियम 1971 नुसार ठरविण्यात येईल.

वरील जमीन क्षेत्र वाटपासंबंधीचे आदेश हे 30 नोव्हेंबर 1981 पासून लागू करण्यात आले आहेत.

इ) मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत लाभ क्षेत्रातील पर्यायी जमीन प्रकल्प बाधित कुटुंबांना पुनर्वसनातंर्गत वाटप करण्याची पध्दती शासनाने खालील प्रमाणे ठरवून दिलेली आहे.

---

1. जे प्रकल्प बाधित खातेदार मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये पुनर्वसनातंर्गत पर्यायी जमीन हवी अशी इच्छा करतात त्यांनी त्यांच्या संपादित जमिनीबाबत मिळणा-या नुकसान भरपाई रकमेच्या 75 टक्के इतकी रक्कम शासनाकडे ठेव म्हणून ठेवावयाची आहे, किंवा प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये त्यांना पुरवावयासाठी संपादित जमिनीच्या संभाव्य किंमती इतकी-जी कमी असेल ती रक्कम ठेव म्हणून ठेवायची आहे. प्रकल्पांतर्गत संदापित जमिनीची संभाव्य किंमत ही यासंबंधी प्रसृत केलेल्या आदेशानुसार काढण्यात येईल.

2. ठेव म्हणून घेण्यात आलेली नुकसान भरपाई रक्कम प्रकल्प बाधितांना पर्यायी वाटवयाच्या जमिनीच्या किमतीपेक्षा अधिक असेल तर जादा असलेली रक्कम त्यांना ताबडतोब परत करावयाची आहे.

3. जे प्रकल्प बाधित खातेदार त्यांना मिळणा-या नुकसान भरपाई रकमेच्या 75 टक्के इतकी रक्कम ठेव म्हणून शासनाकडे ठेवण्यास तयार नसतील तर ते (मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पातंर्गत पुनर्वसनासाठी) पर्यायी जमीन मिळण्यास पात्र समजले जाणार नाहीत.

4. जे प्रकल्प बाधित भूमीहीन इतर प्रकल्प बाधित व्यक्तींबरोबर आपले जुने गाव सोडून जाण्यास राजी (तयार) असतील आणि ज्यांना मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पातंर्गत पुनर्वसनासाठी लाभ क्षेत्रामध्ये 1 एकर जमीन वाटप करावयाचे आहे त्यांनी "महसूल ठेव" म्हणून कसलीही रक्कम भरावयाची नाही, कारण त्यांना कोणतीही नुकसान भरपाई मिळालेली नाही.

फ) पर्यायी जमीन तपशिल दर्शक प्रमाणपत्र

---

प्रकल्प बाधितांना पर्यायी शेतजमीन दाखविल्या नंतर आणि त्यांनी संमती दर्शविल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी द्यावयाच्या पर्यायी जमिनीबाबतचा सर्व तपशिल दर्शविणारे प्रमाणपत्र (दाखला) पुनर्वसन प्राधिका-याकडून देण्यात येतो.

ख) प्रकल्प बाधितांसाठी पुनर्वसनातंर्गत नवीन गावठाणाची स्थापना

---

अ) प्रकल्प बाधितांना वाटप करावयाची पर्यायी शेतजमीन निर्धारित, निश्चित केल्यानंतर पुनर्वसन प्राधिकारी अस्तित्वात असलेल्या गावठाणाचे विस्तारीकरण करणे किंवा/आणि प्रकल्प बाधितांसाठी पूर्णपणे

नवीन गावठाण स्थापन करण्याचे ठरविले जाते. हे करीत असताना निश्चित केलेल्या शेतजमिनी सदर विस्तारित गावठाण किंवा नवीन गावठाण जेथे घरासाठी प्लॉट देण्यात आले आहेत तेथून 3 ते 4 मैलापेक्षा अधिक अंतरावर नाहीत याची खात्री करावयाची आहे.

ब) नवीन गावठाणाची जागा निवड केल्यानंतर आणि तसेच जागेचा स्थलदर्शक नकाशा तयार केल्यानंतर प्रकल्प बाधित व्यक्तींना खालील प्रमाणे गावठाणातील प्लॉट वाटप केले जातात.

घर प्लॉटचे किमान व कमाल क्षेत्र

| प्रकल्प बाधित व्यक्तीचा प्रकार | किमान क्षेत्र (चौ.फूट) | कमाल क्षेत्र (चौ.फूट) |
|---|---|---|
| 1. प्रकल्प बाधित शेतकरी (खातेदार) 5 किंवा 5 पेक्षा कमी व्यक्ती असलेले कुटुंब | 4000 चौ.फूट शिवाय कुटुंबातील जादा 3 व्यक्तीकरिता 1000 चौ. फूट परंतु जास्तीत जास्त 6000 चौ.फूट (अधीन राहून) | 6000 चौ.फूट |
| 2. प्रकल्प बाधित बिगर शेतकरी (बिगर खातेदार) ज्याच्या कुटुंबात 5 किंवा 5 पेक्षा कमी व्यक्ती सभासद | 2000 चौ.फूट शिवाय कुटुंबातील जादा 3 व्यक्तींसाठी 500 चौ.फूट परंतु जास्तीत जास्त 3000 चौ.फूट मर्यादेत अधीन. | 3000 चौ.फूट |

क) प्रकल्प बाधित व्यक्तींना वाटप केलेल्या गावठाणातील प्लॉटची वहिवाट किंमत वसुली या संबंधात काढलेल्या आदेशानुसार करण्यात येईल.

ड) प्लॉटच्या सीमादर्शक दगड रोवणे, तेथील दगड माती, कचरा, घाण हटविणे आणि जागा सपाटीकरण कामे प्रकल्प बाधितांनी स्वखर्चाने करावयाची आहेत.

ग) <u>प्रकल्प बाधितांसाठी पुनर्वसित नवीन गावठाणामध्ये नागरी सुविधांची व्यवस्था</u>

मान्यताप्राप्त खालील नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम जिल्हा परिषदेकडे यंत्रणा (एजन्सी) तत्वावर सोपविण्यात आले आहे. नागरी सुविधांवरील खर्च संबंधित प्रकल्प निधीतून मागवावयाचा आहे.

1. पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी

प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनासाठी संपादन केलेल्या जुन्या गावठाणामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी असोत किंवा नसोत, तरी पण प्रकल्प बाधित व्यक्तींकरिता पुनर्वसित प्रत्येक नवीन गावठाणामध्ये पिण्याच्या पाण्याच्या विहिरी खालील प्रमाणात पुरवावयाच्या आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| लोकसंख्या | विहिरींची संख्या व आकार |
|---|---|
| 1. 1000 लोकसंख्येपर्यंत | बोअरवेल (विंधन), एक विहिर आणि 15 फूट व्यासाची एक खुली विहिर. |
| 2. 1001 ते 1500 चे दरम्यान लोकसंख्या | एक बोअरवेल आणि 15 फूट व्यासाच्या 2 खुल्या विहिरी. |
| 3. 1501 ते 2000 दरम्यान लोकसंख्या | एक बोअरवेल आणि 15 फूट व्यासाच्या 3 खुल्या विहिरी. |
| 4. 2001 ते 3000 च्या वर लोकसंख्या | दोन बोअरवेल आणि 15 फूट व्यासाच्या 3 खुल्या विहिरी. |
| 5. 3000 च्या वर लोकसंख्या | दोन बोअरवेल आणि 15 फूट व्यासाच्या 4 खुल्या विहिरी. |

खुल्या विहिरींच्या बाबतीत ज्याठिकाणी पाणी लागणार नाही तेथे ग्रामीण विकास विभागाच्या योजनेखाली नळाने पाणी पुरवठा योजना प्राधान्येकरुन हाती घ्यावयाची आहे. सदर प्रकल्पासाठी 10 टक्के इतकी रक्कम लोकवर्गणी सहभागातून भरावयाची आहे. अशा प्रकारची सर्व नवीन गावठाणे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी "टंचाईग्रस्त गांवे" म्हणून समजण्यात येतील व त्यांना सर्वाधिक प्राधान्य देण्यात येईल.

2. शाळेची इमारत

जुन्या गावठाणामध्ये पूर्वी शालागृह इमारत आहे किंवा कसे ही वस्तुस्थिती न पहता शिक्षण विभागाने अंगिकारलेल्या मानकाप्रमाणे (निकषाप्रमाणे) योग्य तितक्या खोल्या (वर्ग) असलेली शाळेची

इमारत, शाळेत जाणा-या मुलांच्या संख्येवर आधारित प्रकल्प खर्चातून जिल्हा परिषदेने पुरवावयाची आहे. सदर इमारतीची देखभाल मान्य केल्याप्रमाणे करावयाची आहे.

3. चावडी तथा समाजमंदीर

जुन्या गावठाणामध्ये चावडी किंवा समाज मंदीर अस्तित्वात आहे किंवा कसे ही वस्तुस्थिती विचारात न घेता प्रकल्प बाधितांसाठी नवीन गावठाणामध्ये 200 लोकवस्ती असलेल्या ठिकाणी रु.13,000/- पेक्षा अधिक खर्च न करता एक चावडी/समाज मंदीर उभारावयाचे आहे. तसेच 200 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावठाणात रु.8000/- पेक्षा अधिक खर्च नसलेले समाज मंदीर बांधावयाचे आहे.

तथापि पूर्वीच्या गावठाणामध्ये समाज मंदीर/चावडी अस्तित्वात होती व त्यासाठी स्थानिक ग्राम पंचायतीने नुकसान भरपाई रक्कम घेतली असेल तर ग्रामपंचायत, जिल्हा परिषद किंवा इतर कोणत्याही प्रतिनिधीक स्वरुपात नुकसान भरपाई स्विकारलेल्या संस्थेने नवीन गावठाणात समाज मंदीर बांधकामासाठी ती रक्कम उपलब्ध करुन द्यावयाची आहे किंवा जिल्हा परिषदेकडे जमा करावयाची आहे.

सदर बांधकाम खर्च व मिळालेली नुकसान भरपाई यातील फरकातील रकमेच्या 50 टक्क्याइतकी रक्कम प्रकल्पाने सोसावयाची आहे तर 50 टक्के इतकी रक्कम लाभ धारकांनी सोसायची आहे.

4. अंतर्गत व जोड रस्ते

संबंधित प्रकल्प खर्चातून अंतर्गत व जोडरस्ते नवीन गावठाणामध्ये तयार करावयाचे आहेत.

5. काही बाबातीत ज्या ठिकाणी प्रकल्प बाधित व्यक्ती उंचसखल भागात नवीन गावठाणात दळण वळणाच्या सोयीशिवाय अलग अलग ठिकाणी वसलेले असतील त्यासाठी स्थानिक गरजा विचारात घेऊन खालील नागरी सुविधा पुरविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

1. ग्रामरस्त्या सारखा दर्जेदार रस्ता व गटर व्यवस्था दोन्ही वेगवेगळी गावठाण वस्ती एकमेकांना जोडून मुख्य रस्त्यास जोडणे.

2. अशा स्वरुपाचा रस्ता बांधणी खर्च सकृत दर्शनी प्रतिबंधात्मक असेल तेथे 30 उतारु नेण्याची समत्युक्त प्रवासी बोट (लहान) तसेच 10 टन सामान वहन क्षमतेची मालवाहू बोट आवश्यक तेथे पुरविण्यात यावी.

3. अशा प्रकारे ज्या ठिकाणी रस्ते तथा बोर्वेची सुविधा पुरविलेल्या असतील त्यांच्या देखभालीच्या खर्चाची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदांकडे राहील.

6. क्रीडांगणासाठी जागा

---

प्राथमिक शाळेसाठी 1 एकर क्षेत्र असलेले जमीन क्षेत्र, तर माध्यमिक शाळेसाठी 2 एकर क्षेत्राची जागा क्रीडांगणासाठी निर्धारित केली आहे.

7. जनावरांचा तळ

---

जनावरे चरण्यास जाण्यापूर्वी जेथे एकत्र थांबतील त्याकरिता 1 एकर क्षेत्र निर्धारित केले आहे.

8. एस.टी. बसस्थानक जागा

---

प्रकल्प बाधितांसाठी पुनर्वसित केलेल्या गावठाणामध्ये नियमित एस.टी. बस सेवा उपलब्ध रस्त्यापासून 5 ते 6 मैलापर्यंतच्या परिसरात एक एकर जागा बस स्थानकासाठी निर्धारित केली आहे. जेव्हां एस.टी. व्यवस्थापक शासनाने ठरवून दिलेल्या रितीने एस.टी. सेवा नियमित सुरू करील तेव्हां अशी राखून ठेवलेली जागा त्यांना वाटप करता येईल.

9. दहन तसेच दफन भूमीसाठी जागा

---

हिंदूच्या दहन भूमीसाठी तसेच ख्रिश्चन व मुस्लीमांच्या दफन भूमीसाठी 1/2 एकर जागा राखून ठेवण्यात आली आहे.

10. खळवाडी/खळे अंगण

---

प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसित नवीन गावठाणामध्ये खळवाडीसाठी जागा खालील प्रमाणात पुरविण्यात आली आहे.

| अ•क्र• | नवीन गावठाणातील एकूण प्रकल्प बाधित खातेदार संख्या | जेथे आवश्यक असेल तेथे खळवाडीसाठी पुरवावयाचे जमीन क्षेत्र §हेक्टरमध्ये§ |
|---|---|---|
| 1• | 200 पर्यंत | 0 हे• 20•23 आर §20 गुंठे§ |
| 2• | 201 ते 400 | 0 हे• 40•47 आर §1 एकर§ |
| 3• | 401 ते 600 | 0 हे• 60•70 आर §1 एकर, 20 गुंठे§ |
| 4• | 601 ते 800 | 0 हे• 80•94 आर §2 एकर§ |
| 5• | 801 ते 1000 | 1 हे• 01•17 आर §2 एकर, 20 गुंठे§ |
| 6• | 1001 आणि त्यावरील | 1 हे• आणि 21•41 आर §3 एकर§ |

पुनर्वसितांच्या खळवाडीसाठी किमान क्षेत्र 20 गुंठे तर कमाल क्षेत्र 1 हे• 21•41 आर §3 एकर§ इतके दिलेले आहे• खळवाडीसाठी आवश्यक असलेली जमीन ही शक्यतो उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीतून वाटप सकरण्यात आली आहे• जेथे शासनाची जमीन उपलब्ध नसेल तेथे वर निर्दिष्ट केलेल्या प्रमाणात खाजगी जमीन क्षेत्रातून उपलब्ध करून त्याचा खर्च संबंधित प्रकल्पावरील खर्च धरण्यात आला आहे•

11• उघडी गटारे

प्रकल्प बाधितांच्या आरोग्याच्या गरजा विचारात घेऊन नवीन पुनर्वसित गावठाणामध्ये उघडी गटारे पुरविण्यात आली आहेत• त्याचा खर्च मात्र जुन्या गावठाणात अस्तित्वात असलेल्या गटारासाठी दिलेल्या नुकसान भरपाई रकमेतून भागवावयाचा आहे• त्यापेक्षा अधिक खर्च प्रकल्पांतर्गत निधीतून भागविला जावा•

घ§ प्रकल्पग्रस्तांना मंजूर करण्यात आलेल्या विविध सवलती

1• वापरण्यासारखे बांधकाम सामान नेण्यास परवानगी

नवीन गावठाणात घरबांधणीसाठी उपयोगी पडेल व वाहून नेता येईल असे बांधकाम साहित्य म्हणजे दरवाजे, खिडक्या, वासे, बांबू फिटिंग इ• साहित्य जुन्या गावठाणातील घरातून वाहून नेण्याची परवानगी प्रकल्पग्रस्तांना देण्यात आली आहे अशा घरांसाठी नुकसान भरपाई दिलेल्या रकमेपैकी खर्च म्हणून कोणतीही वसुली करण्यात आलेली नाही•

2. वैयक्तिक साजगी ﴾माल﴿ घर सामानासाठी वाहतूक खर्च

सर्वसाधारणपणे प्रकल्पग्रस्तांच्या घर साहित्य जुन्या गावठाणातून नवीन गावठाणात वाहतुकीद्वारे ﴾मालगाडी किंवा ट्रकने﴿ मोफत वाहून नेला जातो. तथापि जर मालवाहक मोटार/ट्रक उपलब्ध नसेल तर प्रकल्पग्रस्तांना त्यासाठी रोख रक्कम सहाय्य खालील प्रमाणे देण्यात येईल.

| | अंतर ﴾कि.मी.﴿ | आर्थिक मदतीचा दर |
|---|---|---|
| 1. | 1.60 कि.मी. अंतराच्या आत | रु. 13/- |
| 2. | 1.60 कि.मी. ते 16 कि.मी.पर्यंत | रु. 20/- |
| 3. | 16 कि.मी. पेक्षा जास्त परंतु 40 कि.मी. पर्यंत | रु. 50/- |
| 4. | 40 कि.मी.पेक्षा जास्त परंतु 80 कि.मी.पर्यंत | रु.100/- |
| 5. | 80 कि.मी. पेक्षा अधिक पण 160 कि.मी. पर्यंत | रु.165/- |
| 6. | 160 कि.मी. पेक्षा जास्त परंतु 240 कि.मी. पर्यंत | रु.250/- |
| 7. | 240 कि.मी. पेक्षा पलीकडे स्थलांतरित होणारी प्रकल्पग्रस्त व्यक्ती. | रु.300/- |

अशाप्रकारे घर सामान गठ्ठे हलविण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबाची व्याख्या घरासाठी नुकसान भरपाई ॲवॉर्डमध्ये दर्शविल्याप्रमाणे गृहीत धरण्यात येईल.

3. मुद्रांक शुल्कातून सूट

प्रकल्पग्रस्तांना नवीन गावठाणात वाटप केलेल्या प्लॉटच्या बाबतीत केलेल्या करारासंबंधी मुद्रांक शुल्क सूट देण्यात आली आहे.

4. बुडणारे जमीन क्षेत्र कसण्याची परवानगी

सिंचन व उर्जा प्रकल्पांच्या उभारणीमुळे ज्यांच्या जमिनी बुडीत होणार आहेत व ज्या शासनाने संपादित केल्या आहेत अशा प्रकल्प बाधितांना त्या जमिनी पूर्णपणे पाण्याखाली जाण्यापूर्वी काही काळ

भाडेपट्टा रक्कम भरून एक साली तत्वावर कसण्यास परवानगी देण्यात येते. तथापि ॲवॉर्ड जाहीर झाल्यानंतर व नुकसान भरपाई रक्कम मिळाल्यानंतर त्यांना खालील प्रकारच्या सवलतींचा फायदा घेता येईल.

अ) शासनास योग्य वाटेल तेव्हां कोणत्याही वेळी ह्या जमिनी देईल, परंतु सदर जमिनीमध्ये जमीन मालकांनी जर काही सुधारणा केल्या तर त्याचा खर्च देणे शासनावर बंधनकारक नाही.

ब) जर अशा जमिनीत पीक उभे असताना जमीन पाण्याखाली गेली, बुडाली तर पिकाच्या नुकसान भरपाईची कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.

क) शासकीय कामाकरिता आवश्यक वाटेल तेव्हां सदर जमिनीत प्रवेश करण्याचा अधिकार सिंचन/महसूल तसेच त्यांनी प्राधिकृत केलेल्या इतर विभागाच्या अधिकाऱ्यांना राहील. त्यांना अशा जमिनीच्या संबंधात त्यांचे कार्यालयीन कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करावी.

ड) अशा जमिनीवरील झाडे तोडण्याचा हक्क शासनाने राखून ठेवला आहे. जमीन मालक किंवा जमीन कसणाऱ्याने या जमिनीवरील झाडांची तोड करता कामा नये.

5. दगडी खाण साहित्याचा वापर

प्रकल्प बाधितांना वन जमिनी तसेच बिगर वन जमिनीतून दगड, माती, मुरुम तसेच गौण खनिजे वनखात्याच्या ताब्यातील वन जमिनीतून वन अधिकारी यांच्या परवानगीने, तर मुलकी अधिकाऱ्यांच्या ताब्यातील बिगर वन क्षेत्रातून त्यांचे परवानगीने मोफत नेण्यास परवानगी देण्यात आली आहे.

सदर साहित्य त्याचे घरबांधणीसाठी किंवा शेत वापरासाठी प्रत्यक्ष आवश्यक असलेल्या प्रमाणातच नेता येईल. त्याबाबत संबंधित वन अधिकारी किंवा स्थानिक महसूल अधिकारी तसे प्रमाणित करतील.

6. घरबांधणीसाठी दगड, वाळू इ.ची उपलब्धी

प्रकल्प बाधितांना शासकीय पडीक जमिनी किंवा वन जमिनीमधून दगड, वाळू, माती, मुरुम इ. साहित्य स्वतःच्या प्रत्यक्ष घरबांधणीसाठी लागते तितक्या प्रमाणात मोफत घेऊन जाण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसे स्थानिक महसूल अधिकारी किंवा शासकीय अधिकारी यांनी प्रमाणित करावयाचे आहे.

7. नोकरो विषयक प्राधान्यक्रम

प्रकल्प बाधित व्यक्ती व त्याचेवर अवलंबून असलेल्या व्यक्तींना राज्य लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षे बाहेरील शासकीय कार्यालयातील जागावर नेमणूक करण्याकरिता प्राधान्यक्रम देण्यात आला आहे. त्यासाठी

1. सदर जागांकरिता आवश्यक असलेल्या अटी पूर्ण करीत असतील,
2. सेवायोजन कार्यालयामध्ये त्यांची नांव नोंदणी झालेली आहे

सिंचन प्रकल्पातंर्गत आस्थापनेवरील जागेसंबंधात प्रकल्पग्रस्तांना सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. त्यासाठी त्यांनी सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी करण्याची गरज नाही.

8. प्रकल्पग्रस्त असल्याचा दाखला

प्रकल्पग्रस्त असल्याची खात्री पटविण्याकरिता प्रकल्प बाधितांना व त्यांचेवर अवलंबून असलेल्यांना विहित प्रपत्रामध्ये प्रमाणपत्र देण्यात येते.

9. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश अग्रक्रम :

पात्र प्रकल्पग्रस्तांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जेथे शक्य आहे तेथे प्राधान्य क्रमाने (विद्यार्थ्यांना) प्रवेश मिळविण्यासाठी मदत केली जाते.

10. नवीन किंवा विस्तारित गावठाणांत घरबांधणीसाठी कर्ज पुरवठा :

नवीन किंवा विस्तारित गावठाणांत ज्या खातेदारांना आणि बिगर खातेदारांना घर बांधणीसाठी प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे त्यांना घरासाठी प्रत्येकी अनुक्रमे रु.2000/- व रु.500/- कर्ज मंजूर करण्यात येते. सदर रक्कम घर बांधकामाची प्रगती पाहून तीन हप्त्यामध्ये दिली जाते. कर्जाचा पहिला हप्ता कर्ज मंजूर झाल्या तारखेपासून 3 वर्षानंतर वसूल करण्यात येतो. सदर कर्ज रकमेवर कर्ज मंजूर झाल्यापासून पहिल्या वर्षापासून रु.6.25 दराने सरळ व्याज आकारण्यात येते.

11. नवीन गावठाणांत घर बांधणीसाठी इमारत साहित्य (बांधकाम साहित्य) पुरवठा :

प्रकल्प बाधितांना नवीन गावठाणांमध्ये घर बांधणीसाठी लोखंडी पत्रे, सिमेंट इ. साहित्य, त्याची उपलब्धता असेल त्याप्रमाणे पैसे घेऊन पुरविण्यात येते. संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पुनर्वसन विभागाचे उपसंचालक (विकास) यांचेमार्फत ते पुरविण्यात येईल.

12. सिंचनासाठी पाणी उचलण्याची परवानगी :

जलाशयाच्या लगत पुनर्वसन केलेल्या कुटुंबांना जलाशय साठयाच्या क्षेत्रापैकी जास्तीत जास्त एक टक्क्याइतके क्षेत्र भिजविण्यासाठी पाणी उचलण्याची परवानगी देण्यात आली आहे.

13. संकीर्ण :

प्रकल्पाखाली संपादित करण्यात आलेल्या जुन्या गावठाणामध्ये अस्तित्वात असलेली देवळे व प्रार्थना मंदीरे पडली गेली असतील तर जुन्या बांधकामाबद्दल देय असलेल्या नुकसान भरपाई रकमेतून ती पुन्हा नवीन गावठाणांत बांधण्यात येतील

14. 1. जर प्रकल्पाकरिता गावठाणांतील घरापैकी 75 टक्क्यापेक्षा अधिक घरे संपादित केली आहेत तसेच,

2. गावातील शेत जमिनीपैकी 75 टक्क्यापेक्षा जास्त जमीन क्षेत्र संपादित केले आहे आणि गावठाणातील घरे संपादित केली गेली नसली तरी उर्वरीत जमीन प्रत्येक वर्षाच्या 15 डिसेंबरला गाळपेरीसाठी गावच्या लागवडी खालील क्षेत्रापैकी 50 टक्क्यापेक्षा कमी असेल तर तसे बाधित गावठाण प्रकल्प बाधितांच्या लेखी संमतीने प्रकल्पासाठी संपादित केले जाते.

15. नवीन गावठाणांत पुनर्वसित केलेल्या प्रकल्पग्रस्तांसाठी पुरवावयाच्या अतिरिक्त नागरी सुविधा:

शासनाने दिनांक 30-11-1977 व दिनांक 7-12-1977 रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे तसेच शासन निर्णय अर्थ विभाग क्र.आरपीए-1/76/आर-1, दिनांक 27-4-1978 नुसार नवीन वसविलेल्या गावठाणांत पुरवावयाच्या अतिरिक्त नागरी सुविधा संबंधी सदर अतिरिक्त नागरी सुविधा खालील प्रमाणे :

अ) सार्वजनिक शौचालयासाठी जागा :

प्रकल्प बाधितांच्या नवीन गावठाणांमध्ये योग्य जागी सार्वजनिक शौचालयासाठी 1/2 एकर जागा राखून ठेवणे.

ब) जनावरांसाठी चराऊ कुरण :

जेथे शासनाची पुरेशी जागा उपलब्ध असेल तेथे जनावरांचे चराऊ रानासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या तरतुदीप्रमाणे (नियमाप्रमाणे) जनावरांसाठी चराऊ कुरण पुरविण्यात यावे. यासाठी कोणतीही खाजगी जमीन संपादित करावयाची नाही.

क) अंतर्गत व जोड रस्ते खडीचे :

पुनर्वसित गावठाणांतील अंतर्गत व जोड रस्ते खडीचे तयार करणे.

ड) बाजारासाठी जागा :

नवीन गावठाणांत एकूण क्षेत्रापैकी 1/5 क्षेत्र बाजारपेठ तसेच भविष्यकालीन विकासासाठी मोकळी जागा राखून ठेवण्यात यावी.

इ) पुनर्वसित गावठाणाचे विद्युतीकरण :

पुनर्वसित गावठाणांतील सर्व प्रकल्प बाधितांना प्रकल्प खर्चातून वीज पुरवठा करण्यात यावा मग जुन्या गावठाणांचे विद्युतीकरण झालेले असो किंवा नसो.

फ) नळाने पाणी पुरवठा :

ग्रामीण विकास विभागाच्या वैयक्तिक किंवा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेखाली नवीन पुनर्वसित गावठाणासाठी नळाने पाणी पुरवठा करणे.

2) महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1986

---

मधील तरतुदींचे थोडक्यात विवेचन :

---

संज्ञा - व्याख्या

---

सदर अधिनियमाच्या प्रकरण 1 मध्ये कलम (2) खाली निरनिराळया संज्ञाबाबत व्याख्या नमूद केल्या आहेत.

1. बाधित क्षेत्र किंवा पट्टा :

---

प्रकल्पाशी संबंधित बाधित क्षेत्र पट्टा म्हणजे कलम 13 खाली प्रकल्पाखाली बाधित क्षेत्र म्हणून जाहीर केलेले क्षेत्र.

2. बाधित व्यक्ती

---

अ) बाधित क्षेत्रामधील वहिवाटदार ज्याची जमीन (गावठाणामधील जमीन धरून) प्रकल्पासाठी आवश्यक म्हणून कलम 14 खाली संपादित केली आहे. खुलासा - या उप कलमासाठी जर संबंधित गावच्या दप्तरामध्ये अनेक भावापैकी एका भावाच्या नावावर कर्ता किंवा संयुक्त कुटुंबाचा व्यवस्थापक म्हणून शेत जमीन नोंदविली असेल तर प्रत्येक भावाला (किंवा मृत भावाचा मुलगा अथवा मुले सर्व मिळून एक घटक) ज्याचा जमिनीमध्ये हिस्सा आहे, मग त्याचे नांव गांव नोंदीमध्ये नोंदविलेले असो किंवा नसो त्याला बाधित व्यक्ती म्हणून मानण्यात येईल.

ब) प्रकल्प बाधित क्षेत्रामध्ये जमीन संपादनाच्या वेळी कूळ कायद्याखाली कूळ म्हणून प्रत्यक्ष जमिनीचा ताबा धारण करीत असेल अशी व्यक्ती,

क) लाभ क्षेत्रामधील वहिवाटदार ज्याची जमीन मोठया व मध्यम प्रकल्पाच्या बांधकामासाठी, विस्तारासाठी, सुधारणेसाठी किंवा कालव्याच्या विकासाकरिता संपादित केली आहे किंवा बाधित क्षेत्रातील नवीन गावठाणाच्या पुनर्वसनासाठी स्थापनेसाठी संपादित केली आहे आणि

1. संपादनानंतर ज्याचे उर्वरित लागवडी लायक क्षेत्र 1 हेक्टरपेक्षा कमी आहे, किंवा
2. उर्वरित क्षेत्र हे तुकडेवजा तुटक राहिले असून लागवडीसाठी फायदेशीर नाही, किंवा
3. उर्वरित जमीन क्षेत्र लागवडीलायक राहिलेले नाही

सुलासा {विश्लेषण} : या उप कलमांरिता वहिवाटवादामध्ये म्हणजे संबंधित कूळ कायद्याखाली लाभक्षेत्रातील जमीन प्रत्यक्ष ताब्यात असलेले कूळ, {जमीन संपादन करतेवेळी}

ड} शेतमजूर असलेली व्यक्ती,

इ} जी व्यक्ती वहिवाटदार किंवा उपरोक्त उप कलम अ,ब,क,ड मध्ये नमूद केलेल्या भूमि संपादन अधिनियम 1894 खाली कलम 4 अन्वये प्रसिध्द केलेल्या ×× 5 वर्षाहून कमी कालावधीसाठी सर्वसाधारण रहिवासी आहे किंवा बाधित क्षेत्रातील गावठाणामध्ये व्यापार, धंदा किंवा फायद्याकरिता काम करीत असेल तर,

3. शेतमजूर :

------

अशी व्यक्ती की ज्याची बाधित क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारची जमीन नाही आणि जो सदर कलम 13 खाली बाधित क्षेत्र जाहीर होण्यापूर्वी शारिरीक श्रमाने शेतजमिनीवर काम करून आपली उपजीविका करते किंवा प्रामुख्याने शारिरीक श्रमाने उपजीविका करण्यापासून वंचित केली गेली आहे.

4. शेतजमीन :

-------

शेत जमिनीमध्ये फळबागासाठी वापरात असलेली किंवा वापरता येईल अशी जमीन
- पिकासाठी, गवत किंवा बाग उत्पादन,
- डेअरी फार्म, कुक्कुटपालन, जनावरांचे प्रजोत्पादन,
- रोपवाटिका, औषधी वनस्पतींचे संगोपन/वाढ,
- जनावरांचे चराऊ रान परंतु त्यामध्ये लाकूड कापणीसाठी वापरल्या जाणा-या जमिनीचा समावेश होत नाही.

5. लाभक्षेत्र :

-----

प्रकल्पाच्या संदर्भात "लाभक्षेत्र" म्हणजे सदर प्रकल्पाखाली कलम 13 खाली लाभदेय म्हणून जाहीर केलेले क्षेत्र.

6. संहिता :

-----

म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1866.

7. कसणे :

----

म्हणजे शेतीविषयक कोणतीही कृती करणे,मशागत करणे, संज्ञेचा त्याप्रमाणे अर्थ लावला जाईल.

8. जमीनक्षेत्र :

-------

वहिवाटदार किंवा कूळ म्हणून किंवा दोन्ही धरून व्यक्तीने धारण केलेली सर्व जमीन क्षेत्र.

9. एकत्रित जमीन :

-----------

बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कलम 14 खालील उपबंध §1§ व §4§ खाली उल्लेखिलेली जमीन.

10. प्रकल्प :

अ§ सिंचन प्रकल्प म्हणजे सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्याकरिता बांधकाम, विस्तार सुधारणा किंवा विकासात्मक स्वरुपाचे कोणतेही काम.

ब§ वीज प्रकल्प/उर्जा प्रकल्प म्हणजे वीज उत्पादनासाठी वीज पुरवठयासाठी किंवा वीज विकासाला पूरक असे कोणतेही कामासाठी बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकासात्मक स्वरुपाचे कोणतेही काम.

क§ सार्वजनिक उपयोगाचा प्रकल्प म्हणजे सिंचन प्रकल्प आणि उर्जा निर्मिती प्रकल्प सोडून सार्वजनिक उपयोगासाठी बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा सार्वजनिक उपयोगाचे विकासात्मक काम.

ड§ अशा प्रकारच्या दोन किंवा अधिक प्रकल्पांचे संमिश्र/संयुक्त प्रकल्प आणि त्यामध्ये प्रकल्पासाठी प्रसंगावशात किंवा पूरक असे कोणतेही बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकासात्मक कामाचा अंतर्भाव होतो. ज्यामुळे जमीन वहिवाटदार किंवा धारक प्रकल्पासाठी वापरल्यामुळे बाधित व्यक्ती झाली आहे व ज्याचे बाबतीत कलम 11 खाली जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे.

11. प्रकल्प प्राधिकारी - म्हणजे प्रकल्पाचे कामाचे कार्यवाहीसंबंधी नियंत्रण व देखरेख ज्यांचेवर सोपविले आहे असा अधिकारी आणि राज्यशासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्देशित करील असा प्राधिकारी. प्रकल्प प्राधिकारी म्हणून असा अधिकारी.

## महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1986

अ) महत्वपूर्ण तरतुदी :

सदर अधिनियमाच्या तिस-या प्रकरणामध्ये प्रकल्प बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधी कलम 10 खाली तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

1. राज्यशासन या अधिनियमाखालील तरतुदीनुसार आणि या कारणांकरिता पुरेशा उपलब्ध जमिनीच्या मर्यादेत बाधित क्षेत्रामधील सिंचन प्रकल्पाखाली विस्थापित/बाधित व्यक्तींचे पुनर्वसन गावातील जमिनीवर किंवा प्रकल्पाचा फायदा मिळणा-या क्षेत्रावर पुनर्वसन करील.

2. कलम 14 खाली किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीनुसार किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये राज्य शासनास पुनर्वसन करण्यापासून प्रतिबंध करता येणार नाही. या अधिनियमातील तरतुदींच्या बाधित क्षेत्रामधील जास्तीत जास्त लोकांचे पुनर्वसन करण्यात येईल. इतर कोणत्याही सिंचन प्रकल्पाखाली पुनर्वसित व्हायचे राहिले असतील त्यांचेही पुनर्वसन :-

अ)कोणत्याही सिंचन प्रकल्पांतर्गत लाभ क्षेत्रातील जमीन किंवा कलम 14 खालील तरतुदीप्रमाणे या उद्देशाने संपादित केलेल्या कोणत्याही गावात किंवा भागात जशी स्थिती असेल त्याप्रमाणे किंवा

ब)संपादित केलेल्या क्षेत्रामधील कोणत्याही जमिनीवर करण्यात येईल.

ब) नागरी सुविधा - बाबी :

महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1986 कलम क्र. 10 खाली राज्यशासन प्रकल्प बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनांतर्गत नवीन गावठाण किंवा अस्तित्वात गावठाणाच्या विस्तारित गावठाणामध्ये नागरी सुविधा तसेच इतर सुविधा पुरवील त्यामध्ये खालील सुविधांचा अंतर्भाव असेल -

1. पिण्याच्या पाण्यासाठी विहिर किंवा बोअरवेल किंवा नळाने पाणी पुरवठा,
2. क्रीडांगणासह शाळा,
3. चावडी किंवा समाज मंदीर,

4· अंतर्गत रस्ते व जोडरस्ते,
5· वीज पुरवठा,
6· दहनभूमी किंवा दफनभूमी (जसे असेल त्याप्रमाणे),
7· उघडी बांधलेली गटारे,
8· सार्वजनिक शौचालये,
9· जनावरांच्या तळासाठी जमीन,
10· महाराष्ट्र राज्य वाहतूक परिवहन महामंडळाच्या बससेवेसाठी उतारू थांब्यासाठी जागा,
11· सळयासाठी जागा-सळवाडी-जेथे पाहिजे असेल तेथे,
12· चराऊ कुरण (जर शासकीय जमीन उपलब्ध असेल तर),
13· बाजारासाठी जागा तसेच भविष्यात गावठाणाच्या विस्तारासाठी जागा·

या सर्व सुविधांवरील खर्च हा प्रकल्पाच्या खर्चाचा एक भाग धरण्यात येईल·

ठळक तरतुदी :

क) जमीन क्षेत्र वाटप

भाग-3

| बाधित क्षेत्रांतर्गत बाधित झालेल्या व्यक्तींकडून संपादित करावयाचे जमीनक्षेत्र | बाधित व्यक्तीला लाभ क्षेत्रामधील द्यावयाचे जमीन क्षेत्र |
|---|---|
| 1· 80 आर पेक्षा जास्त नाही | 40 आर पेक्षा कमी नाही व 80 आर पेक्षा अधिक नाही· |
| 2· 80 आर पेक्षा जास्त परंतु 2 हेक्टरपेक्षा अधिक नाही· | 80 आर पेक्षा कमी नाही परंतु 1 हेक्टर 20 आर पेक्षा अधिक नाही· |
| 3· 2 हेक्टरपेक्षा जास्त परंतु 3 हेक्टर 20 आर पेक्षा अधिक नाही· | 1 हेक्टर 20 आर पेक्षा कमी नाही परंतु 1 हेक्टर 60 आर पेक्षा अधिक नाही· |
| 4· 3 एकर 20 आर पेक्षा अधिक | 1 हेक्टर 60 आर |

- जर बाधित कुटुंबातील व्यक्ती 5 पेक्षा अधिक असतील तर 40 आर अतिरिक्त क्षेत्र (प्रत्येक 3 अतिरिक्त सभासदाकरिता) मंजूर करण्यात येईल - 2 हेक्टर 80 आर क्षेत्र मर्यादेस अधीन राहून)

- लाभ क्षेत्रा व्यतिरिक्त इतर ठिकाणच्या जिरायत जमिनीचे क्षेत्र 1 हेक्टर 60 आर पेक्षा कमी असणार नाही.

- असे जमीन क्षेत्र वाटपानंतर बाधित व्यक्तीचे जमीन क्षेत्र आर्थिक जमीन धारणे पेक्षा अधिक असणार नाही (अधिनियमाखाली केलेल्या तरतुदीनुसार सांगितल्याप्रमाणे शासकीय जमीन वितरीत करण्यासंबंधी)

ड) घरासाठी प्लॉट वाटप :

भाग-4

| बाधित व्यक्तींचा प्रकार | | गावठाणामध्ये वाटप करावयाच्या प्लॉटचे क्षेत्र |
|---|---|---|
| 1. शेतकरी (जमीनधारक) | अ) कुटुंबातील व्यक्ती 5 पेक्षा अधिक नसतील तर | 370 चौ.मीटर |
| | ब) जर कुटुंबातील व्यक्ती 5 पेक्षा अधिक असतील तर | प्रत्येक 3 सभासदा अतिरिक्त करिता अतिरिक्त 185 चौ.मीटर परंतु एकत्रित 740 चौ.मीटर निर्धारित मर्यादेच्या अधीन राहून. |
| 2. बिगर शेतीधारक | अ) जर कुटुंबातील व्यक्ती 5 पेक्षा जास्त नसतील तर | 185 चौ.मीटर |
| | ब) जर कुटुंबातील व्यक्ती 5 पेक्षा अधिक असतील तर | प्रत्येक 3 व्यक्ती अतिरिक्त सभासदाकरिता 92.5 चौ.मीटर एकत्रित 370 चौ.मीटरच्या निर्धारित मर्यादेस अधीन राहून. |

खुलासा : भाग 3 व 4 करिता "कुटुंब" म्हणजे बाधित पती-पत्नी, मुले, अविवाहित मुलगी किंवा बहिणी आणि आई वडिल आणि जर हे सर्वजण त्या बाधित व्यक्ती बरोबर एकत्र राहात असतील आणि त्याचेवर अवलंबून असतील.

# प्रकरण 5 वे

## करंजवण मोठया सिंचन प्रकल्पातर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबाच्या क्षेत्रीय पाहणीतील माहितीचे पृथःक्करण.

करंजवण मोठया सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी तसेच इतर लोकसंख्या घटकातील कुटुंबांचे पुनर्वसन नळवाडी व नळवाडीपाडा या दोन गावामध्ये करण्यात आले. सदर पुनर्वसित गांवामधील सन 1991 च्या जनगणनेनुसार एकूण कुटुंबे, एकूण व आदिवासी लोकसंख्या तसेच आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी (प्रमाण) खाली दर्शविल्या प्रमाणे आढळले.

तक्ता क्र.5.1

प्रकल्पांतर्गत पुनर्वसित केलेल्या गावातील एकूण कुटुंबे, एकूण व आदिवासी लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण

(सन 1991 च्या जनगणनेप्रमाणे)

| अ.क्र. | गावांचे नांव | जनगणना स्थलांक (1991) | एकूण कुटुंबे | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | आदिवासी | आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | नळवाडी | 36 | 228 | 1271 | 634 | 50 |
| 2. | नळवाडी पाडा | 35 | 358 | 2180 | 1964 | 90 |

आधार : सांख्यिकी मालिका क्र.38 (1994) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण केले असता असे दिसून येते की, सन 1991 च्या जनगणनेनुसार नळवाडी गावामध्ये आदिवासींचे प्रमाण 50 टक्के इतके होते, तर नळवाडी पाडा मध्ये एकूण लोकसंख्येमध्ये आदिवासींचे प्रमाण 90 टक्के इतके होते.

सदर प्रकल्पातर्गत विस्थापित झालेल्या काही आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन दोन गावामध्ये म्हणजे नळवाडी मूळ गावठाणाच्या विस्तारित गावठाणात व नळवाडी पाडा येथे विस्थापितांच्या इच्छेप्रमाणे करण्यात आले. सदर दोन्ही गांवे मूल्यमापन अभ्यास अहवालाकरिता क्षेत्रीय पाहणीसाठी

निवडण्यात आली. सदर गावातील आदिवासी कुटुंबापैकी क्षेत्रीय पहाणीसाठी नळवाडा गावातून 25 आदिवासी कुटुंबे तर नळवाडी पाडा गावातून 19 आदिवासी कुटुंबांची निवड करण्यात आली. सदर कुटुंबाकडून गोळा केलेल्या माहितीचे पृथःक्करण खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

कुटुंबाचे आकारमान :

सर्वेक्षणातंर्गत निवडलेल्या जमाती निहाय कुटुंबाकडून गोळा केलेल्या कुटुंब विषयक माहितीचे पृथःक्करण केले असता कुटुंबाचे आकारमान खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आढळले.

तक्ता क्र.5.2

सर्वेक्षित कुटुंबामध्ये जमाती निहाय कुटुंबाचे आकारमानुसार {व्यक्तीसंख्या} वर्गीकरण

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | कुटुंबांचे आकारमानानुसार वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 ते 3 व्यक्ती | 4 ते 5 व्यक्ती | 6 ते 7 व्यक्ती | 8 ते 10 व्यक्ती |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 4 | 5 | 5 | 11 |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | 1 | 4 | 5 | 1 |
| | | 2.महादेव कोळी | 8 | 2 | 1 | 4 | 1 |
| | | एकूण | 44 | 7 | 10 | 14 | 13 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे आढळून येते की, नळवाडी येथील पुनर्वसित महादेव कोळी जमातीच्या कुटुंबांमध्ये 1 ते 3 व्यक्ती असलेली 4 कुटुंबे, 4 ते 5 व्यक्ती तसेच 6 ते 7 व्यक्ती असलेली प्रत्येकी 5 कुटुंबे तर 8 ते 10 व्यक्ती असलेली 11 कुटुंबे आढळली. दुस-या शब्दात सांगायचे तर कुटुंबाचे आकारमान मोठे असलेल्या कुटुंबांची संख्या अधिक आढळली. त्यांचे प्रमाण 44 टक्के इतके आढळले.

त्याचप्रमाणे नळवाडीपाडा मध्ये पुनर्वसित केलेल्या कोकणा आदिवासी जमातीच्या कुटुंबांमध्ये 1 ते 3 व्यक्ती असलेले एक कुटुंब, 4 ते 5 व्यक्ती असलेली 4 कुटुंबे, 5 ते 7 व्यक्ती असलेली 5

कुटुंबे, तर 8 ते 10 व्यक्ती असलेले एक कुटुंब आढळले. सदर जमातीच्या कुटुंबामध्ये 4 ते 5 व 6 ते 7 व्यक्ती असणारी कुटुंबे अनुक्रमे 36 टक्के व 45 टक्के इतकी आढळली. त्याच गावातील महादेव कोळी आदिवासी कुटुंबामध्ये 6 ते 7 व्यक्ती असलेली 4 (50 टक्के) इतकी कुटुंबे आढळली. तुलनात्मकदृष्ट्या दोन्ही जमातीतील कुटुंबांचे आकारमान पाहता एकंदरीत असे म्हणता येईल की, महादेव कोळी जमातीच्या कुटुंबांचे आकारमान कोकणा जमातीच्या कुटुंबापेक्षा मोठे होते.

एकत्रितरित्या विचार करता सदर प्रकल्पांतर्गत सर्वेक्षित केलेल्या 44 कुटुंबापैकी कुटुंबामध्ये 6 ते 7 व्यक्ती असलेल्यांची संख्या 14 (32 टक्के) तर 8 ते 10 व्यक्ती कुटुंबात असलेल्यांची संख्या 13 (30 टक्के) आढळली. म्हणजेच कुटुंबाचे आकारमान मोठे असलेल्या कुटुंबांची टक्केवारी 61 इतकी आढळली.

शिक्षण :

प्रकल्पांतर्गत विस्थापित तथा पुनर्वसित आदिवासी कुटुंबातील व्यक्तींच्या शैक्षणिक दर्जा-पातळी विषयीच्या माहितीचे पृथःक्करण करता जमाती निहाय साक्षर व निरक्षर व्यक्तींची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आढळली.

तक्ता क्र.5.3

जमाती निहाय कुटुंबातील एकूण व्यक्ती साक्षर/निरक्षर व निरक्षरतेचे प्रमाण

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | कुटुंबातील एकूण व्यक्ती | पैकी साक्षर | निरक्षर | निरक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 162 | 46 | 116 | 71.6 |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | 61 | 20 | 41 | 67.2 |
| | | 2.महादेव कोळी | 8 | 44 | 5 | 39 | 88.6 |
| | | एकूण | 44 | 267 | 71 | 196 | 73.40 |

वरील तक्त्यातील माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, सर्वेक्षित कुटुंबातील एकूण 267 व्यक्तींपैकी 71 व्यक्ती (27 टक्के) साक्षर तर 196 व्यक्ती (73 टक्के) निरक्षर आढळल्या. गावनिहाय निरक्षरतेची स्थिती पाहता नळवाडी येथे निरक्षरतेचे प्रमाण महादेव कोळी जमातीमध्ये 71.6 टक्के इतके आढळून आले तर नळवाडी पाडा गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण 67.2 टक्के इतके आढळून आले तर महादेव कोळी जमातीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण 88.6 इतके दिसून आले. दोन्ही गावातील एकूण सर्वेक्षित कुटुंबामधील पुरुष तसेच स्त्री साक्षर व निरक्षरांची माहिती जमाती निहाय खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे. आदिवासी जमातीमधील स्त्री शिक्षणाचे प्रमाण जाणून घेण्यासाठी सदर माहितीचे पृथःक्करण करणे आवश्यक वाटते. एकूण व्यक्तींमध्ये पुरुष तसेच स्त्री साक्षरांची व निरक्षरांची स्थिती खालील प्रमाणे :

तक्ता क्र.5.4

गांव निहाय व जमाती निहाय पुरुष/स्त्री साक्षर/निरक्षरांची संख्या

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबातील एकूण व्यक्ती | | | साक्षर | | | निरक्षर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 95 | 67 | 162 | 39 | 7 | 46 | 56 | 60 | 116 |
| 2. | नळवाडी | 1.कोकणा | 31 | 30 | 61 | 11 | 9 | 20 | 20 | 21 | 41 |
| | पाडा | 2.महादेव कोळी | 23 | 21 | 44 | 4 | 1 | 5 | 19 | 20 | 39 |
| | | एकूण | 49 | 118 | 267 | 54 | 17 | 71 | 95 | 101 | 196 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, नळवाडी पुनर्वसित गावातील सर्वेक्षित महादेव कोळी जमातीच्या एकूण कुटुंबामध्ये एकूण 67 स्त्रियांपैकी केवळ 7 स्त्रिया साक्षर आढळल्या तर 60 (90 टक्के) स्त्रिया निरक्षर आढळल्या. थोडक्यात, आदिवासी जमातीच्या स्त्रियांमध्यील निरक्षरतेचे प्रमाण अधिक होते.

त्याचप्रमाणे नळवाडी पाडा पुनर्वसित सगावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या कुटुंबामध्ये एकूण 30 स्त्रियांपैकी 9 साक्षर तर 21 स्त्रिया निरक्षर आढळून आल्या. सदर जमातीमधील स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण 70 टक्के इतके आढळले. तसेच सदर गावातील सर्वेक्षित महादेव कोळी जमातीच्या कुटुंबामध्ये 21 स्त्रियांपैकी 1 स्त्री साक्षर आढळली तर उर्वरित 20 स्त्रिया निरक्षर आढळल्या. स्त्रियांमध्यील निरक्षरतेचे प्रमाण 95 टक्के इतके आढळून आले.

दोन्ही गावातील सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रित विचार करता 118 स्त्रियांपैकी 101 स्त्रिया निरक्षर होत्या. त्यांच्या निरक्षरतेचे प्रमाण 86 टक्के इतके होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पुनर्वसित आदिवासी कुटुंबामध्ये स्त्रियांमधील निरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळले.

सर्वेक्षित कुटुंबातील जमाती निहाय साक्षर व्यक्तींची शैक्षणिक पातळी दर्जासंबंधी माहिती खालील तक्त्यामध्ये सादर केली आहे.

तक्ता क्र.5.5

जमाती निहाय कुटुंबातील साक्षर व्यक्तींची शैक्षणिक पात्रता

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षण केलेली कुटुंबे | एकूण साक्षर | शैक्षणिक पात्रता-वर्गवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 ते 4 थी | 5 वी ते 7 वी | 8 वी ते 10 वी | 10वी एसएससी पुढे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 46 | 12 | 19 | 15 | - |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | 20 | 12 | 6 | 2 | - |
| | | 2.महादेव कोळी | 8 | 5 | 2 | 1 | 2 | - |
| | | एकूण | 44 | 71 | 26 | 26 | 19 | - |

वरील तक्त्यातील माहितीवरून असे दिसून येईल की, नळवाडी गावातील क्षेत्रीय पहाणी अंतर्गत समाविष्ट महादेव कोळी कुटुंबामध्ये एकूण 46 व्यक्ती साक्षर आढळल्या. त्यापैकी 12 व्यक्ती §48 टक्के§ 4 थी पर्यंत शिकलेल्या, 19 §76 टक्के§ व्यक्ती 7 वी पर्यंत शिक्षण झालेल्या तर 15 §60 टक्के§ व्यक्ती 10 वी पर्यंत शिकलेल्या आढळून आल्या. मात्र 10 वी §एस.एस.सी.§ च्यापुढे शिक्षण घेतलेली एकही व्यक्ती आढळून आली नाही.

नळवाडी पाडा गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या कुटुंबातील 20 साक्षरांपैकी 12 §60 टक्के§ व्यक्ती 4 थी पर्यंत शिक्षण झालेल्या, 6 §30 टक्के§ व्यक्ती 7 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या तर 2 §10 टक्के§ व्यक्ती 10 वी पर्यंत §एस.एस.सी.§ पर्यंत शिक्षण घेतलेल्या आढळल्या. याही जमातीमध्ये 10 वी §एस.एस.सी.§ च्यापुढे शिक्षण घेतलेली एक व्यक्ती आढळून आली नाही. तसेच सदर गावातील महादेव कोळी जमातीच्या सर्वेक्षित कुटुंबामध्ये 5 साक्षर व्यक्तींमध्ये 4 थी पर्यंत व्यक्तींच्या संख्या 2 §40 टक्के§, 7 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्यांची संख्या 1 §20 टक्के§ तर 10 वी §एस.एस.सी.§ पुढे शिक्षण घेतलेल्यांची संख्या निरंक आढळली.

दोन्ही गावातील सर्वेक्षित एकूण 44 गावामध्ये एकूण 71 व्यक्ती साक्षर आढळल्या त्यामध्ये 26 व्यक्ती §37 टक्के§ 4 थी पर्यंत शिक्षण झालेल्या, 26 व्यक्ती §37 टक्के§ 7 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या तर 19 व्यक्ती §27 टक्के§ 10 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या आढळून आल्या. 10 वी च्या §एस.एस.सी.§ पुढे शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची संख्या निरंक आढळून आली.

जमीन धारणा - व्यवसाय :
------------------

क्षेत्रीय पहाणीसाठी निवडलेली आदिवासी कुटुंबांकडून प्रमुख व दुय्यम व्यवसायासंबंधी माहिती गोळा करण्यात आली. त्यामधील शेतकरी भूमीधारक तसेच भूमीहीन कुटुंबांची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता 5·6

जमाती निहाय शेतकरी व भूमीहीन आदिवासी कुटुंबे वर्गवारी

| अ·क्र· | गावाचे नांव | अनुसूचित जमात | क्षेत्रीय पाहणी झाली निवडलेली कुटुंबे | कुटुंबांची वर्गवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेतकरी भूमीधारक | भूमीहीन | भूमीहीन कुटुंबांची टक्केवारी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1· | नळवाडी | 1·महादेव कोळी | 25 | - | 25 | 100 |
| 2· | नळवाडीपाडा | 1·कोकणा<br>2·महादेव कोळी | 11<br>8 | 6 | 13 | 65 |
| | | एकूण | 44 | 6 | 38 | 86·36 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथ:क्करण करता असे दिसून येते की नळवाडी गावामध्ये पुनर्वसित केलेल्या कुटुंबापैकी क्षेत्रीय पाहणीमध्ये अंतर्भूत केलेली सर्व 25 कुटुंबे महादेव कोळी जमातीची आहेत व ती सर्वच कुटुंबे भूमीहीन आहेत· त्याचप्रमाणे नळवाडी पाडा गावातील सर्वेक्षित 19 कुटुंबामध्ये 11 कुटुंबे कोकणा जमाती तर 8 कुटुंबे महादेव कोळी जमातीची आहेत· 6 कुटुंबे शेतकरी भूमीधारक आहेत तर उर्वरित 13 कुटुंबे भूमीहीन आहेत· सदर गावातील सर्वेक्षित कुटुंबातील भूमीहीन कुटुंबांचे प्रमाण 65 टक्के इतके येते· सदर प्रकल्पांतर्गत सर्वेक्षित एकूण 44 आदिवासी कुटुंबापैकी 38 (86 टक्के) कुटुंबे भूमीहीन आढळली·

व्यवसाय उत्पन्न :

सर्वेक्षित गावातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेतमजुरी व इतर मजुरी असल्याचे आढळून आले· एकूण सर्वेक्षित 44 कुटुंबापैकी 38 कुटुंबे भूमीहीन असल्याचे वर नमूद केले आहे· 6 कुटुंबेच केवळ जमीनधारक आहेत· भूमीहीन आदिवासी कुटुंबांना गावात स्थानिक ठिकाणी शेतमजुरीचे काम मिळतेच असे नाही· परिणामतः ज्या ठिकाणी रोजगारी उपलब्ध होईल अशा ठिकाणी या कुटुंबांना स्थलांतर करावे लागते· विस्थापित भूमीहीन कुटुंबांना

उपजीविकेसाठी भरभक्कम असे कोणतेही साधन नाही. स्थानिक ठिकाणी तसेच दूरच्या ठिकाणी उपलब्ध होणारी मजुरीसुध्दा अनिश्चित स्वरुपाची असल्याचे सांगण्यात आले. पुनर्वसित गावी केवळ निवा-याची सोय उपलब्ध करुन दिल्याने पावसाळ्याच्या हंगामात निवासासाठी येथे परतावे लागते असे बहुतेक कुटुंबांनी सांगितले. एरवी रोजंदारी, मजुरीच्या शोधात नजीकच्या तालुक्यामध्ये स्थानांतर करावे लागते. पुनर्वसित गावाच्या स्थानिक ठिकाणी एक कारखाना उभारण्यात आलेला आहे. तेथे पुनर्वसितांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत, रोजगार मिळत नाही त्यामुळे आर्थिक स्थिती गरीबीची असल्याचे दिसून आले. सर्वेक्षित पुनर्वसित कुटुंबांना रोजंदारीमधून मासिक उत्पन्न तसेच भूमीधारकांना मिळणारे शेती पासूनचे तसेच मजुरीपासूनचे उत्पन्न खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे

तक्ता क्र.5.7

मासिक उत्पन्न गटनुरुप कुटुंबांची जमातीनिहाय वर्गवारी

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | उत्पन्न गटनुरुप वर्गवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु.1000 पर्यंत | 1001 ते 2000 | 2001 ते 3000 | 3001ते 5000 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 7 | 10 | 5 | 3 |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | 1 | 10 | - | - |
| | | 2.महादेव कोळी | 8 | 1 | 4 | 3 | - |
| | | एकूण | 44 | 9 | 24 | 8 | 3 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, पुनर्वसित कुटुंबापैकी नळवाडी गावातील सर्वेक्षित महादेव कोळी जमातीच्या 25 कुटुंबापैकी 7 §28 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.1000/- पर्यंत होते तर 10 §40 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न 2000/- रुपयापर्यंत आढळले तसेच 5 §20 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न 3000 रुपयापर्यंत दिसून आले. फक्त 3 §12 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न 3001 ते 5000 रुपयापर्यंत असल्याचे दिसून येते. थोडक्यात सर्वसाधारणपणे 25 कुटुंबापैकी 17 §68 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2000/- पर्यंत असल्याचे दिसून येईल.

तसेच नळवाडीपाडा गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या 11 कुटुंबापैकी एका कुटुंबाचे मासिक उत्पन्न रु.1000/- पर्यंत होते तर उर्वरित 10 §91 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2000/- पर्यंत होते.

त्याच गावातील महादेव कोळी जमातीच्या सर्वेक्षित 8 कुटुंबापैकी एका कुटुंबाचे मासिक उत्पन्न रु.1000/- पर्यंत होते तर 4 §50 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2000/- पर्यंत आढळून आले. उर्वरित 3 §38 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.3000/- पर्यंत असल्याचे दिसून येते.

सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रितरित्या विचार करता असे दिसून येते की, प्रकल्पांतर्गत सर्वेक्षित 44 आदिवासी कुटुंबापैकी 9 §20 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.1000/- पर्यंत होते तर 24 §55 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2000/- पर्यंत होते आणि 8 §18 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.3000/- पर्यंत तर उर्वरित 3 §7 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.5000/- पर्यंत असल्याचे दिसून येते. यावरुन असे म्हणता येईल सर्वसाधारणपणे मासिक रु.2000/- पर्यंत उत्पन्न असलेली एकूण 33 §75 टक्के§ कुटुंबे होती तर केवळ 8 §18 टक्के§ कुटुंबांचे उत्पन्न रु.2001/- ते 3000 च्या दरम्यान होते.

जुन्या मूळ गावठाणातील घरासाठी नुकसान भरपाई/मोबदला :

दोन्ही गावामध्ये पुनर्वसित केलेल्या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या मूळ गावठाणामध्ये असलेल्या जुन्या घरासंबंधी नुकसान भरपाई/मोबदला रक्कम मिळालेली असल्याचे क्षेत्रीय पाहणीतून आढळले. बुडीत घरांसाठी विस्थापित कुटुंबांना मिळालेल्या मोबदला रकमेचे आकारमानानुसार आदिवासी कुटुंबांचे वर्गीकरण खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.5.8

मूळ गावठाणातील घरासाठी नुकसान भरपाई/मोबदला मिळालेल्या सर्वेक्षित कुटुंबांची वर्गवारी

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | मूळ गावठाणात घरासाठी मोबदला मिळालेल्या रकमेनुसार कुटुंबांची वर्गवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु.500 पर्यंत | रु.501 ते 1000 | रु.1001 2000 | रु.2000 च्या वर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 7 | 6 | 12 | - |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | 7 | 4 | - | - |
| | | 2.महादेव कोळी | 8 | 8 | - | - | - |
| | | एकूण | 44 | 22 (50 टक्के) | 10 (23 टक्के) | 12 (27 टक्के) | - |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, नळवाडी गावातील सर्वेक्षित 25 महादेव कोळी जमातीच्या कुटुंबांपैकी 7 (28 टक्के) कुटुंबांना रु.500/- पर्यंत घरासाठी नुकसान भरपाई/मोबदला मिळाला. 6 (24 टक्के) कुटुंबांना रु.501 ते 1000 पर्यंत तर 12 (48 टक्के) आदिवासी कुटुंबांना 1001 ते 2000 रुपयापर्यंत घरासाठी मोबदला रक्कम मिळाली.

त्याचप्रमाणे नळवाडीपाडा गावातील कोकणा जमातीच्या 11 कुटुंबांपैकी 7 (64 टक्के) कुटुंबांना रु.500 पर्यंत घरासाठी नुकसान भरपाई मिळाली तर 4 कुटुंबांना (36 टक्के) रु.1000 पर्यंत घरासाठी मोबदला मिळाला. त्याच गावातील सर्वेक्षित महादेव कोळी जमातीच्या 8 कुटुंबांना रु.500 पर्यंत घरासाठी नुकसान भरपाई मिळाली. घरासाठी देण्यात आलेली नुकसान भरपाई योग्य नव्हती असे त्यांचेकडून सांगण्यात आले.

प्रकल्पांतर्गत क्षेत्रीय पाहणी केलेल्या आदिवासी कुटुंबांचा घरासाठी मोबदला मिळण्या संबंधात एकत्रित विचार करता असे दिसून येते की एकूण 44 कुटुंबांपैकी 22 (50 टक्के) कुटुंबांना रु.500 पर्यंत घरासाठी नुकसान भरपाई रक्कम मिळाली तर 10 (23 टक्के) कुटुंबांना रु.1000 पर्यंत

आणि 12 कुटुंबांना §27 टक्के§ जुन्या घरासाठी मोबदला रक्कम देण्यात आली. तात्पर्य जुन्या गावठाणात असलेल्या घरासाठी किमान मोबदला मिळालेल्या कुटुंबांची संख्या सर्वाधिक आढळली.

जुन्या गावठाणात असलेल्या गोठयासाठी मोबदला/नुकसान भरपाई :

प्रकल्पतंर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांना त्यांच्या जुन्या गावठाणांमध्ये असलेल्या जनावरांच्या गोठयाबाबत नुकसान भरपाई रक्कम देण्यात आल्याचे समजले. क्षेत्रीय पद्धतीर्तंगत नळवाडी व नळवाडीपाडा येथे पुनर्वसन केलेल्या कुटुंबांना त्यांच्या मूळ गावात जनावरांसाठी असलेल्या गोठयाबाबत नुकसान भरपाई/मोबदला रक्कम मिळाली किंवा कसे याची माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षित गावातील जमाती निहाय सर्वेक्षित कुटुंबे व ज्यांचेकडे जनावरांसाठी गोठे होते व त्याबाबत त्यांना मिळालेली नुकसान भरपाई याची माहिती खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे:

तक्ता क्र.5.9

जमाती निहाय विस्थापित आदिवासी कुटुंबांना गोठयांसाठी मोबदला/नुकसान भरपाई

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | मूळ गावात गोठा असलेली कुटुंबे | जनावरांच्या गोठयासाठी मोबदला मिळालेली कुटुंबे§ रकमेनुसार वर्गवारी§ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रु.500 पर्यंत | 501 ते 1000 | 1000 च्या वर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 3 | - | - | - |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | - | - | - | - |
| | | 2.महादेव कोळी | 8 | - | - | - | - |
| | | एकूण | 44 | 3 | - | - | - |

वरील तक्त्यातील माहितीवरुन असे दिसून येते की, नळवाडी गावामधील 25 सर्वेक्षित

कुटुंबांपैकी केवळ 3 आदिवासी कुटुंबाकडे जनावरांसाठी स्वतंत्र गोठा होता. परंतु त्या बाधित कुटुंबांना जुन्या मूळ गावठाणात असलेल्या गोठयाकरिता नुकसान भरपाई/मोबदला रक्कम देण्यात आलेली नाही. तसेच नळवाडीपाडा येथे पुनर्वसित केलेल्या आदिवासी कुटुंबांकडे मात्र जुन्या मूळ गावठाणात जनावरांसाठी गोठे नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे सदर कुटुंबांना गोठयाबाबत नुकसान भरपाई/मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

नवीन विस्तारित गावठाणात घर बांधकामासाठी प्लॉट मिळालेली कुटुंबे :

सदर सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांचे नळवाडी तसेच नळवाडी पाडा जवळील विस्तारित गावठाणामध्ये पुनर्वसन करण्यात आले असून त्यांना घरासाठी महसूल विभागामार्फत 1 गुंठयाचे प्लॉट वाटप करण्यात आले. सर्वेक्षित कुटुंबांना घरासाठी मिळालेल्या प्लॉट संबंधात जमाती निहाय माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.5.10

नवीन गावठाणात घरासाठी प्लॉट मिळालेली जमाती निहाय सर्वेक्षित कुटुंबे

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | घरासाठी नवीन गावठाणात प्लॉट मिळालेल्या कुटुंबांची प्लॉटच्या क्षेत्राप्रमाणे विभागणी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 गुंठा | 2 गुंठे | 3 गुंठे | 4 गुंठे | 5 गुंठे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | नळवाडी | 1.महादेव कोळी | 25 | 25 | - | - | - | - |
| 2. | नळवाडीपाडा | 1.कोकणा | 11 | 11 | - | - | - | - |
| | | 2.महादेव कोळी | 8 | 8 | - | - | - | - |
| | | एकूण | 44 | 44 | - | - | - | - |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, नळवाडी तसेच नळवाडीपाडा या गावातील पुनर्वसित आदिवासी कुटुंबांना नवीन विस्तारित गावठाणामध्ये घरासाठी 1 गुंठा क्षेत्रफळाचे प्लॉट वाटप करण्यात आले असल्याचे महसूल विभागाकडून समजले. त्याप्रमाणे सर्वेक्षित 44 आदिवासी कुटुंबांना नवीन गावठाणात घरासाठी 1 गुंठयांचे प्लॉट मिळाल्याचे दिसून आले.

....

# प्रकरण 6 वे

## हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांच्या क्षेत्रीय पद्धतीतील माहितीचे पृथःक्करण

हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्पतंर्गत बाधित सरड गावातील आदिवासींचे पुनर्वसन अर्जंदे दिगर येथे तर अंबापूर येथील विस्थापितांचे पुनर्वसन जैतापूर या ठिकाणी करण्यात आले. विसापूर येथील बाधित कुटुंबांचे पुनर्वसन जामोठे येथे करण्यात आले. सदर पुनर्वसन केलेल्या गावातील सन 1991 च्या जनगणनेनुसार एकूण कुटुंबे, एकूण व आदिवासी लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.1

प्रकल्पांतर्गत पुनर्वसन केलेल्या गावातील एकूण कुटुंबे, एकूण व आदिवासी लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण.

{सन 1991 च्या जनगणनेनुसार}

| अ.क्र. | गावाचे नांव | जनगणना स्थलांक 1991 | एकूण कुटुंबे | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | आदिवासी | आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | जैतापूर | 4 | 114 | 721 | 718 | 100 |
| 2. | जामोठे | 22 | 277 | 1532 | 1376 | 87 |
| 3. | अर्जंदे दिगर | 21 | 44 | 327 | 327 | 100 |

आधार : सांख्यिकी मालिका क्र.38 आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे.

वरील तक्त्यातील माहिती पृथःक्करण करता असे दिसून येते की, सन 1991 च्या जनगणनेनुसार जैतापूर व अर्जंदे या पुनर्वसित गावामध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण शंभर टक्के आहे तर जामोठे येथे एकूण लोकसंख्येमध्ये आदिवासींचे प्रमाण 87 टक्के इतके आहे.

हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित बाधित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन या तिन्ही गावांमधील विस्तारित गावठाणामध्ये करण्यात आले आहे. या तीनही गावांची क्षेत्रीय पहाणीसाठी निवड करण्यात आली. सदर गावातील आदिवासी कुटुंबांपैकी क्षेत्रीय पहाणीसाठी जैतापूर मधील 33, जामोठे मधील 14 तर अर्जंदे दिगर मधील 39 आदिवासी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. सदर पुनर्वसित कुटुंबांकडून गोळा केलेल्या माहितीचे पृथःक्करण खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

कुटुंबाचे आकारमान :

क्षेत्रीय पहाणी अंतर्गत निवडलेल्या जमाती निहाय कुटुंबांकडून गोळा केलेल्या कुटुंब विषयक माहितीचे पृथःक्करण केले असता कुटुंबाचे आकारमान खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे:

तक्ता क्र.6.2

जमाती निहाय कुटुंबांचे आकारमानानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | कुटुंबाचे आकारमानानुसार वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 ते 3 व्यक्ती | 4 ते 5 व्यक्ती | 6 ते 7 व्यक्ती | 8 ते 10 व्यक्ती व त्यावरील |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 1 | 10 | 9 | 13 |
| 2. | जामोठे | 1.कोकणा | 13 | - | - | 5 | 8 |
| | | 2.महादेव कोळी | 1 | 1 | - | - | - |
| 3. | अर्जंदे | 1.भिल्ल | 33 | 1 | 1 | 20 | 11 |
| | | 2.कोकणा | 6 | - | - | 2 | 4 |
| | | एकूण | 86 | 3 | 11 | 36 | 36 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, जैतापूर येथे पुनर्वसित

केलेल्या कोकणा जमातीमधील कुटुंबांमध्ये 1 ते 4 व्यक्ती असलेले 1 कुटुंब, 4 ते 5 व्यक्ती असलेली 10 §30 टक्के§ कुटुंबे तर 6 ते 7 व्यक्ती असलेली 9 §27 टक्के§ कुटुंबे आढळली. परंतु कुटुंबामध्ये 8 ते 10 व्यक्ती असलेली 13 §39 टक्के§ कुटुंबे आढळून आली. दुस-या शब्दात मांडायचे झाले तर असे म्हणता येईल की, कुटुंबाचे आकारमान मोठे असलेल्या कुटुंबांची संख्या अधिक आढळली.

जामेठे गावामध्ये सर्वेक्षित कोकणा जमातीच्या 13 कुटुंबापैकी कुटुंबांत 6 ते 7 व्यक्ती असलेली 5 कुटुंबे §38 टक्के§ तर कुटुंबांमध्ये 8 ते 10 व्यक्ती असलेली 8 कुटुंबे §62 टक्के§ आढळली. सर्वेक्षित कुटुंबामध्ये साधारणतः 6 ते 10 व्यक्ती असलेल्या कुटुंबांची संख्या अधिक आढळली.

त्याचप्रमाणे अर्जदे गावामध्ये भिल्ल जमातीमधील कुटुंबामध्ये 6 ते 7 व्यक्ती असलेली 20 §60 टक्के§ कुटुंबे आढळली तर कुटुंबात 8 ते 10 व्यक्ती असलेली 11 §33 टक्के§ कुंबे आढळली. त्याच गावातील कोकणा जमातीमध्ये देखील 6 कुटुंबात 8 ते 10 व्यक्ती असलेली 4 कुटुंबे §67 टक्के§ आढळून आली.

एकत्रितरित्या विचार करता सदर प्रकल्पांतर्गत सर्वेक्षित केलेल्या 86 कुटुंबापैकी 6 ते 7 व्यक्ती असलेल्या कुटुंबांची संख्या 36 §42 टक्के§ दिसून आली तर कुटुंबांत 8 ते 10 व्यक्ती असलेल्यांची संख्या 36 §42 टक्के§ आढळून आली. थोडक्यात, क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेल्या 86 पैकी 72 कुटुंबांमध्ये §84 टक्के§ कुटुंबांचे आकारमान मोठे म्हणजे किमान 6 ते 7 व 8 ते 10 व्यक्ती असलेले होते. कुटुंबामध्ये किमान 4 ते 5 व्यक्ती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण 13 टक्के इतके आढळले.

शिक्षण :
----

प्रकल्पांतर्गत विस्थापित तथा पुनर्वसित आदिवासी कुटुंबांतील व्यक्तींच्या शैक्षणिक दर्जा-पातळी विषयी माहिती गोळा केली. सदर माहितीचे पृथःक्करण करण्यासाठी जमाती निहाय साक्षर व निरक्षर व्यक्तींची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.3

जमातीनिहाय कुटुंबांतील एकूण व्यक्ती,त्यातील साक्षर/निरक्षर व निरक्षरतेचे प्रमाण

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | कुटुंबातील एकूण व्यक्ती | पैकी साक्षर | पैकी निरक्षर | निरक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 227 | 67 | 160 | 70.5 |
| 2. | जामोटे | 1.कोकणा | 13 | 101 | 28 | 73 | 72.3 |
| | | 2.महादेव कोळी | 1 | 1 | - | - | 100.00 |
| 3. | अर्जदे | 1.भिल्ल | 33 | 235 | 69 | 116 | 70.6 |
| | | 2.कोकणा | 6 | 48 | 12 | 36 | 75.00 |
| | | एकूण | 86 | 612 | 176 | 436 | 71.00 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, सर्वेक्षित कुटुंबातील एकूण 612 व्यक्तींपैकी 176 (29 टक्के) व्यक्ती साक्षर तर 436 (71 टक्के) व्यक्ती निरक्षर आढळल्या. जमाती निहाय निरक्षरतेचे प्रमाण पहता असे दिसते की, कोकणा जमातीमध्ये ते 70 ते 75 टक्क्याइतके, भिल्ल जमातीमध्ये 70 टक्के इतके आढळते. थोडक्यात, कोकणा जमातीमधील कुटुंबामध्ये निरक्षरतेचे प्रमाण (तुलनात्मक दृष्टया) अधिक आढळले.

क्षेत्रीय पहणीमधील तीनही गावातील सर्वेक्षित कुटुंबांमधील पुरुष तसेच स्त्रियांमधील साक्षर व निरक्षरांची जमाती निहाय माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे. आदिवासी जमातीमधील स्त्री शिक्षणाचे प्रमाण जाणून घेण्यासाठी सदर माहितीचे पृथःक्करण करणे अगत्याचे वाटते. एकूण व्यक्तींपैकी पु/स्त्री साक्षर व निरक्षरांची स्थिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र•6•4

गावनिहाय-जमातीनिहाय पु/स्त्री साक्षर-निरक्षर

| अ•क्र• | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबा-तील एकूण व्यक्ती | | | साक्षर | | | निरक्षर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पु• | स्त्री | एकूण | पु• | स्त्री | एकूण | पु• | स्त्री | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1• | जैतापूर | 1•कोकणा | 124 | 103 | 227 | 58 | 9 | 67 | 66 | 94 | 160 |
| 2• | जामोटी | 1•कोकणा | 61 | 40 | 101 | 24 | 4 | 28 | 37 | 36 | 73 |
| | | 2•महादेवकोळी | - | 1 | 1 | - | - | - | - | - | 1 |
| 3• | अर्जंदे | 1•भिल्ल | 143 | 92 | 235 | 64 | 5 | 69 | 79 | 87 | 166 |
| | | 2•कोकणा | 30 | 18 | 48 | 12 | - | 12 | 18 | 18 | 36 |
| | | एकूण | 358 | 254 | 612 | 168 | 18 | 176 | 200 | 236 | 436 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे निदर्शनास येते की, जैतापूर येथील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या कुटुंबातील एकूण 103 स्त्रियांपैकी केवळ 9 स्त्रियाच साक्षर होत्या तर उर्वरित 94 स्त्रिया निरक्षर होत्या• त्यांचे निरक्षरतेचे प्रमाण 91 टक्के इतके होते•

त्याचप्रमाणे जामोटी गावातील क्षेत्रीय पहणीमध्ये माहिती गोळा केलेल्या कोकणा जमातीच्या कुटुंबामध्ये 40 स्त्रियांपैकी केवळ 4 स्त्रिया साक्षर आढळल्या तर 36 स्त्रिया निरक्षर आढळल्या त्यांच्यातील निरक्षरतेचे प्रमाण 90 टक्के इतके होते• त्याच गावातील महादेव कोळी जमातीमधील एका कुटुंबांत कोणीही साक्षर नव्हते•

अर्जंदे गावातील भिल्ल जमातीमधील कुटुंबांमध्ये 92 स्त्रियांमध्ये केवळ 5 स्त्रिया साक्षर आढळल्या• उर्वरित 87 स्त्रिया निरक्षर आढळल्या• त्यांच्यातील निरक्षरतेचे प्रमाण 95 टक्के इतके होते• कोकणा जमातीमधील कुटुंबामध्ये सर्वच स्त्रिया निरक्षर आढळल्या•

तिन्ही गावातील सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्र विचार करता असे दिसून येईल की, सर्वेक्षित

एकूण 254 स्त्रियांमध्ये 18 स्त्रिया साक्षर आढळून आल्या. म्हणजे स्त्रियांमधील निरक्षरतेचे प्रमाण 93 टक्के इतके येते. एकंदरीत पहता आदिवासी जमातीमध्ये स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. त्यामध्येही कोकणा जमातीच्या स्त्रियांमध्ये ते अधिक आढळून येते.

सर्वेक्षित कुटुंबातील जमाती निहाय साक्षर व्यक्तींची शैक्षणिक पतळी दर्जासंबंधी माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.5

जमाती निहाय कुटुंबातील साक्षर व्यक्तींची शैक्षणिक पात्रता

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | एकूण साक्षर व्यक्ती | शैक्षणिक पात्रता | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1ली ते 4 थी | 5 वी ते 7 वी | 8वी ते 10 वी | 10 वी एसएससी पुढे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 67 | 43 | 12 | 8 | 4 |
| 2. | जामोठे | 1.कोकणा | 13 | 28 | 18 | 6 | 4 | - |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | - | - | - | - |
| 3. | अजंदे | 1.भिल्ल | 33 | 69 | 58 | 9 | 2 | - |
| | | 2.कोकणा | 6 | 12 | 8 | 4 | - | - |
| | | एकूण | 86 | 176 | 127 | 31 | 14 | 4 |

वरील तक्त्यातील माहितीवरून दिसून येईल की, जैतापूर मधील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या कुटुंबामधील 67 साक्षरामध्ये 43 व्यक्ती (64 टक्के) 4 थी पर्यंत शिकलेल्या आढळल्या, 12 व्यक्ती (18 टक्के) 5 वी ते 7 वी पर्यंत शिकलेल्या तर 8 व्यक्ती (12 टक्के) 8 वी ते 10 वी पर्यंत शिकलेल्या आढळल्या. 10 वी व त्यापुढे शिकलेल्या फक्त 4 व्यक्ती आढळून आल्या. यावरून असे म्हणता येईल की, सदर गावातील प्रकल्प बाधित कोकणा कुटुंबामध्ये अधिक शैक्षणिक पात्रता मिळविणा-या व्यक्तींची संख्या कमी कमी झाल्याचे आढळून आले.

जामोटे गावातील सर्वेक्षित कोकणा जमातींमध्ये 28 साक्षरांमध्ये 18 व्यक्ती §64 टक्के§ 1 ली ते 4 थी शिकलेल्या आढळल्या, 6 व्यक्ती §21 टक्के§ 5 वी ते 7 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या आढळल्या तर 4 व्यक्ती §14 टक्के§ व्यक्ती 8 वी ते 10 वी पर्यंत शिकलेल्या आढळल्या. 10 वी किंवा त्यापेक्षा अधिक शैक्षणिक पात्रता असलेल्या व्यक्ती सदर कुटुंबामध्ये आढळल्या नाहीत.

अजंदे गावातील भिल्ल व कोकणा सर्वेक्षित जमातीच्या कुटुंबामध्ये 81 साक्षरांपैकी 66 व्यक्ती §81 टक्के§ 1 ते 4 थी पर्यंत शिकलेल्या होत्या तर 13 व्यक्ती §16 टक्के§ 5 वी ते 7 वी पर्यंत शिकलेल्या आढळल्या. 8 वी ते 10 वी पर्यंत शिकलेल्या व्यक्तींची संख्या फक्त 2 आढळली. 10 वी व त्यापेक्षा अधिक शिक्षण घेतलेली एकही व्यक्ती सर्वेक्षित कुटुंबात आढळली नाही. थोडक्यात भिल्ल व कोकणा जमातीमध्ये 10 वी व त्यापेक्षा अधिक शैक्षणिक पात्रता असलेल्या व्यक्तींची संख्या नगण्यच आढळली.

एकत्रितरित्या तीनही सर्वेक्षित गावातील कुटुंबातील साक्षरांचा विचार करता व त्यांची शैक्षणिक पात्रता तपासता असे दिसून येईल की, 176 साक्षर व्यक्तींमध्ये 8 वी ते 10 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्यांची संख्या 14 §8 टक्के§ तर 10 वी व त्यापेक्षा अधिक शिक्षण असलेल्यांची संख्या केवळ 4 §2 टक्के§ आढळली.

व्यवसाय :
------

सर्वेक्षित कुटुंबाकडून त्यांच्या प्रमुख व दुय्यम व्यवसायासंबंधी माहिती गोळा करण्यात आली. त्यानुसार गावनिहाय तसेच जमातीनिहाय सर्वेक्षित आदिवासी कुटुंबांचे वर्गीकरण खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.6

जमाती निहाय भूमीधारक व भूमीहीन आदिवासी कुटुंबे वर्गवारी

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | क्षेत्रीय पाहणी-साठी निवडलेली कुटुंबे | कुटुंबांचो वर्गवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेतकरी | भूमीहीन | भूमीहीन कुटुंबांचो टक्केवारी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 24 | 9 | 27.3 |
| 2. | जामोदे | 1.कोकणा | 13 | 11 | 2 | 15.3 |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | 1 | 100.00 |
| 3. | अर्जदे | 1.भिल्ल | 33 | 5 | 28 | 84.8 |
| | | 2.कोकणा | 6 | 5 | 1 | 16.6 |
| | | एकूण | 86 | 45 | 41 | 47.67 |

जमीनधारणा :

प्रकल्पांतर्गत पुनर्वसन करण्यात आलेल्या व क्षेत्रीय पाहणीअंतर्गत निवडलेल्या गावनिहाय कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन कोणते यासंबंधी माहिती गोळा केल्यानंतर असे दिसून आले की, सदर आदिवासी कुटुंबे आपला परंपरागत शेती व्यवसाय करून गुजराण करतात. पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत त्यांचे जवळील देण्यात आलेली शेतजमीन क्षेत्रानुसार त्यांची वर्गवारी करता खालील चित्र आढळले. ते खालील तक्त्यात दिग्दर्शित केले आहे.

तक्ता क्र・6・7

जमाती निहाय क्षेत्र जमीन आकारमानानुसार कुटुंबांची वर्गवारी

| अ・क्र・ | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षण केलेली कुटुंबे | जमीन धारणेनुसार कुटुंबांची वर्गवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 ते 2 एकर | 3 ते 4 एकर | 5 ते 10 एकर | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1・ | जैतापूर | 1・कोकणा | 33 | 5 | 13 | 3 | 21 |
| 2・ | जामोठे | 1・कोकणा | 13 | - | 10 | - | 10 |
| | | 2・महादेव कोळी | 1 | - | - | - | - |
| 3・ | अर्जंदे | 1・भिल्ल | 33 | - | 5 | 1 | 6 |
| | | 2・कोकणा | 6 | - | 5 | - | 5 |
| | | एकूण | 86 | 5 | 33 | 4 | 42 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, जैतापूर येथील कोकणा जमातीच्या सर्वेक्षित कुटुंबापैकी 5 (15 टक्के) कुटुंबाकडे 1 ते 2 एकर जमीन क्षेत्र असल्याचे आढळून आले, तर 13 (39 टक्के) कुटुंबाकडे 3 ते 4 एकर क्षेत्र असल्याचे दिसून आले・ 3 कुटुंबांकडे (9 टक्के) 5 ते 10 एकर जमीन क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले・ पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत सर्वसाधारणपणे कुटुंबाला 4 एकर जमीन क्षेत्र वाटप करण्यात आल्याने 3 ते 4 एकर जमीन क्षेत्र असणा-या कुटुंबांची संख्या 13 (39 टक्के) आढळली・

तसेच जामोठे गावातील कोकणा जमातीच्या सर्वेक्षित 13 कुटुंबापैकी 10 (77 टक्के) कुटुंबाकडे 3 ते 4 एकर जमीन क्षेत्र होते・ त्याचप्रमाणे अर्जंदे गावातील भिल्ल जमातीच्या 33 कुटुंबांमध्ये 3 ते 4 एकर जमीन क्षेत्र असलेली 5 (15 टक्के) कुटुंबे आढळली・ एका कुटुंबाकडे 5 ते 10 एकर दरम्यान जमीन क्षेत्र आढळले・ त्याच गावातील कोकणा जमातीच्या एकूण 6 कुटुंबापैकी 5 (83 टक्के) कुटुंबाकडे 3 ते 4 एकर जमीन क्षेत्र असल्याचे आढळून आले・

प्रकल्पांतर्गत सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रित विचार करता 86 आदिवासी कुटुंबापैकी 3 ते 4 एकर जमीन क्षेत्र मिळालेल्या कुटुंबांची संख्या 33 (38 टक्के) होती・ त्यापेक्षा अधिक जमीन क्षेत्र मिळालेली 4 कुटुंबे आढळून आली・

व्यवसाय उत्पन्न :

सर्वेक्षित गावामधील विस्थापित आदिवासी कुटुंबे परंपरागतरित्या शेती व शेतमजुरी करणारी असल्याचे दिसून येते. गावनिहाय सर्वेक्षित आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न गटनुसार वर्गीकरण म्हणजे रु.1000/- पर्यंत मासिक उत्पन्न असणारी जमात निहाय कुटुंबे रु.1001 ते 2000 पर्यंत उत्पन्न असणारी जमाती निहाय कुटुंबे रु.2001 ते 3000 पर्यंत तसेच रु.3001 ते 5000 पर्यंत उत्पन्न असणारी जमाती निहाय कुटुंबे खालील तक्ता क्र.6.9 मध्ये दर्शविली आहेत. तर उत्पन्न साधनांचा विचार करता विस्थापित कुटुंबांचे वर्गीकरण करणे सयुक्तिक होईल. तेव्हां सर्वेक्षित विस्थापित कुटुंबांच्या उत्पन्न साधनांनुसार गावनिहाय वर्गीकरण खालील तक्ता क्र.6.8 मध्ये दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.8

उत्पन्न साधनानुसार सर्वेक्षित आदिवासी कुटुंबांचे वर्गीकरण

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | उत्पन्न साधनानुसार कुटुंबांचे वर्गीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजुरी | मजुरी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 28 | 2 | 3 |
| 2. | जामोदे | 1.कोकणा | 13 | 11 | 2 | - |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | - | 1 |
| 3. | अजंदे | 1.भिल्ल | 33 | 6 | 2 | 25 |
| | | 2.कोकणा | 6 | 5 | - | 1 |
| | | एकूण | 86 | 50 | 6 | 30 |

तक्ता क्र•6•9

मासिक उत्पन्न गटनुरुप जमाती निहाय कुटुंबांची वर्गवारी

| अ•क्र• | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | उत्पन्न गटनुसार वर्गवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु•1000 पर्यंत | 1001 ते 2000 | 2001ते 3000 | 3001 ते 5000 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1• | जैतापूर | 1•कोकणा | 33 | 7 | 14 | 10 | 2 |
| 2• | जामोटे | 1•कोकणा | 13 | - | 3 | 9 | 1 |
| | | 2•महादेव कोळी | 1 | 1 | - | - | - |
| 3• | अर्जंदे | 1•भिल्ल | 33 | 3 | 12 | 16 | 2 |
| | | 2•कोकणा | 6 | - | - | 6 | - |
| | | एकूण | 86 | 11 | 29 | 41 | 5 |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येईल की, जैतापूर येथील पुनर्वसित कोकणा आदिवासी जमातीमधील सर्वेक्षित 33 कुटुंबांपैकी 7 §21 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•1000 पर्यंत होते, तर 14 §42 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•2000 पर्यंत आढळले• तसेच 10 §30 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•3000 पर्यंत आढळून आले• फक्त 2 कुटुंबांचे उत्पन्न रु•3001 ते 5000 च्या दरम्यान आढळून आले• थोडक्यात, सर्वसाधारणपणे 21 §63 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•2000 पर्यंत असल्याचे दिसून आले•

तसेच जामोटे गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या 13 कुटुंबांपैकी 3 §23 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•2000 पर्यंत आढळून आले, 9 §69 टक्के§ कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•3000 पर्यंत होते• त्याच गावातील महादेव कोळी जमातीच्या कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु•1000 पर्यंत आढळून आले•

त्याचप्रमाणे अर्जंदे पुनर्वसित गावातील सर्वेक्षित भिल्ल जमातीच्या 33 कुटुंबापैकी 2 कुटुंबांचे उत्पन्न रु.1000 पर्यंत आढळले, तर 12 (36 टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2000 पर्यंत आढळून आले. मासिक उत्पन्न रु.2001 ते 3000 मिळविणारी 16 (48 टक्के) कुटुंबे आढळून आली. तद्वत् त्याच गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या 6 कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु. 3000 पर्यंत आढळून आले.

सदर प्रकल्पाखाली पुनर्वसित केलेल्या सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रित विचार करता, असे म्हणता येईल की, एकूण 86 कुटुंबापैकी 10 (12 टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.1000 पर्यंत होते, 29 (34 टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2000 पर्यंत आढळून आले, 41 (48 टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु. 3000 पर्यंत आढळून आले. फक्त 5 (6 टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.3001 ते 5000 च्या दरम्यान आढळून आले. थोडक्यात सर्वेक्षित कुटुंबांमध्ये 50 टक्के कुटुंबांचे मासिक उत्पन्न रु.2002 ते 3000 च्या दरम्यान होते.

बुडीत जमिनीकरिता नुकसान भरपाई/मोबदला :

सदर प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या अंबापूर गावातील आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन जैतापूर येथे तर विसापूर येथील विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन जामोदे या गावी करण्यात आले. तसेच सरड येथील विस्थापित आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन अर्जंदे येथे करण्यात आले. सदर विस्थापित कुटुंबांची शेतजमीन व घरे प्रकल्पांतर्गत जलमय झाली. सदर आदिवासी कुटुंबांच्या मूळ बाधित गावातील शेतजमिनीकरिता शासनाने त्यांना नुकसान भरपाई/मोबदला रक्कम दिली. सदर स्वरूपात जमिनीबाबत मोबदला मिळालेल्या कुटुंबांची विभागणी त्यांना मिळालेल्या मोबदला रकमेच्या आकारमानाप्रमाणे खालील तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता क्र.6.10

गांव तथा जमाती निहाय जमिनीबाबत मोबदला (नुकसान भरपाई) मिळालेल्या कुटुंबांची विभागणी (मोबदला रकमेच्या आकारमानाप्रमाणे)

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | जमिनीच्या मोबदला रकमेच्या आकारमानानुसार कुटुंबांची विभागणी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु.5 हजारापर्यंत | 5 ते 10 हजार | 11 ते 20 हजार | 21 ते 25 हजार | 25 हजारव |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 4 (12.12) | 1 (3.0) | 3 (9.0) | 2 (6.0) | 1 (3.0) |
| 2. | जामोदे | 1.कोकणा | 13 | - | - | - | - | 1 |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | - | - | - | - |
| 3. | अर्जदे | 1.भिल्ल | 33 | - | - | - | - | - |
| | | 2.कोकणा | 6 | - | - | - | - | - |
| | | एकूण | 86 | 4 | 1 | 3 | 2 | 1 |

वरील तक्त्यातील माहितीवरून असे दिसून येते की, जैतापूर येथे पुनर्वसित केलेल्या कोकणा जमातीच्या सर्वेक्षित कुटुंबांमध्ये 4 कुटुंबांना त्यांच्या जुन्या गावठाणातील जलमय झालेल्या जमिनीकरिता रु.5000 पर्यंत नुकसान भरपाई रक्कम मिळाली. एका कुटुंबाला रु. 10 हजारापर्यंत तर 3 कुटुंबांना 10 ते 20 हजारापर्यंत नुकसान भरपाई मिळाली, 2 कुटुंबांना 21 ते 25 हजाराच्या दरम्यान तर 1 कुटुंबाला रु.25 हजारापेक्षा अधिक रक्कम जमिनीचा मोबदला म्हणून मिळाली.

तसेच जामोदे गावातील सर्वेक्षित कुटुंबापैकी कोकणा जमातीच्या एका कुटुंबाला रु.25 हजारापेक्षा अधिक रक्कम बुडीत जमिनीचा मोबदला म्हणून देण्यात आली.

त्याचप्रमाणे अर्जदे गावामध्ये सर्वेक्षित भिल्ल व कोकणा जमातीच्या कुटुंबापैकी जुन्या मूळ गावठाणातील जलमय झालेल्या जमिनीबाबत नुकसान भरपाई देण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या निरंक आढळली.

जुन्या मूळ गावठाणातील घरासाठी नुकसान भरपाई/मोबदला :

जैतापूर, जामोठे व अजंदे या ठिकाणी पुनर्वसित केलेल्या आदिवासी कुटुंबांना त्यांच्या मूळ गावामध्ये (पुनर्वसनापूर्वी) असलेल्या जुन्या जलमय झालेल्या घरासाठी शासनाकडून मोबदला रक्कम/नुकसान भरपाई देण्यात आल्याचे क्षेत्रीय पहाणीतून आढळले. बुडीत घरांसाठी विस्थापित आदिवासी जमातीच्या कुटुंबांना मिळालेल्या मोबदला रकमेच्या आकारमानाप्रमाणे त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. त्याची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.11

जुन्या गावठाणातील घरासाठी नुकसान भरपाई/
मोबदला मिळालेल्या सर्वेक्षित कुटुंबांची वर्गवारी

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | मूळ गावठाणातील घरासाठी मिळालेल्या मोबदला रकमेनुसार कुटुंबांचो वर्गवारी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु.500 पर्यंत | 501 ते 1000 | 1001 ते 2000 | 2001 ते 5000 | 5001 च्यावर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 3 | 19 | 8 | 3 | - |
| 2. | जामोठे | 1.कोकणा | 13 | - | 1 | 11 | 1 | - |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | - | 1 | - | - |
| 3. | अजंदे | 1.भिल्ल | 33 | - | 2 | 31 | - | - |
| | | 2.कोकणा | 6 | - | - | 6 | - | - |
| | | एकूण | 86 (100टक्के) | 3 (3.48) | 22 (25.58) | 57 (66.27) | 4 (4.65) | - |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, जैतापूर येथील विस्थापित कोकणा जमातीच्या सर्वेक्षित 33 कुटुंबांपैकी 3 (9 टक्के) कुटुंबांना रु.500 पर्यंत घरासाठी नुकसान

भरपाई मिळाली, तर 19 §57 टक्के§ कुटुंबांना रु.501 ते 1000 पर्यंत नुकसान भरपाई मिळाली, 8 §24 टक्के§ कुटुंबांना रु.2000 पर्यंत घरासाठी मोबदला रक्कम मिळाली. उर्वरीत 3 §9 टक्के§ कुटुंबांना 5000 रुपयापर्यंत जुन्या घरासाठी मोबदला रक्कम अदा करण्यात आली. थोडक्यात 30 §90 टक्के§ कुटुंबांना रु.2000 पर्यंत जुन्या गावठाणातील जलमय झालेल्या घरासाठी मोबदला मिळाला. घरासाठी मोबदला मिळालेली सर्वाधिक कुटुंबे रु.501 ते 1000 या गटातील आढळली.

तसेच जामोदे गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या 13 कुटुंबापैकी 11 §77 टक्के§ कुटुंबांना जुन्या गावठाणातील घरासाठी रु.2000 पर्यंत नुकसान भरपाई देण्यात आली. त्याच गावातील सर्वेक्षित एका महादेव कोळी कुटुंबाला रु.2000 पर्यंत घरासाठी मोबदला रक्कम मिळाल्याचे आढळून आले.

त्याचप्रमाणे अर्जदे गावातील सर्वेक्षित भिल्ल जमातीच्या 33 कुटुंबापैकी 2 §6 टक्के§ कुटुंबांना रु.501 ते 1000 दरम्यान घरासाठी नुकसान भरपाई रक्कम मिळाली, तर 31 §63 टक्के§ कुटुंबांना रु.1001 ते 2000 पर्यंत नुकसान भरपाई रक्कम मिळाल्याचे आढळून आले. त्याच गावातील सर्वेक्षित कोकणा जमातीच्या 6 कुटुंबापैकी सर्वच्या सर्व कुटुंबांना रु.2000 पर्यंत घराबद्दल मोबदला रक्कम मिळाली. सदर गावातील सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रित विचार करता 39 कुटुंबापैकी 37 §95 टक्के§ कुटुंबांना रु.1001 ते 2000 पर्यंत जुन्या घरासाठी नुकसान भरपाई मिळाली.

तिन्ही गावातील सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रित विचार करता असे दिसून येईल की 86 कुटुंबापैकी 57 §66 टक्के§ कुटुंबांना रु. 1001 ते रु.2000 पर्यंत जुन्या गावठाणातील घरासाठी मोबदला रक्कम मिळाली.

जुन्या गावठाणातील गोठयासाठी नुकसान भरपाई/मोबदला :
---

क्षेत्रीय पाहणी अंतर्गत जैतापूर, जामोदे व अर्जदे येथील पुनर्वसित कुटुंबांना त्यांच्या मूळ बाधित गावामध्ये जनावरांसाठी बांधलेल्या गोठयाबाबत नुकसान भरपाई/मोबदला रक्कम मिळाली किंवा कसे याची माहिती गोळा करण्यात आली. त्यानुसार विस्थापित आदिवासी कुटुंबांना मूळ गावातील जनावरांच्या गोठयासाठी नुकसान भरपाई देण्यात आल्याचे समजले. सर्वेक्षित गावातील जमाती निहाय सर्वेक्षित कुटुंबे व ज्यांचेकडे जनावरांसाठी गोठे होते अशी कुटुंबे व त्याबाबत त्यांना मिळालेली नुकसान भरपाई याची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.12

विस्थापित जमाती निहाय आदिवासी कुटुंबांना गोठयासाठी नुकसान भरपाई/मोबदला

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | मूळ गावात गोठा असलेली कुटुंबे | जनावरांच्या गोठयासाठी मोबदला मिळालेली कुटुंबे रकमेनुसार वर्गवारी: रू.500 पर्यंत | 501 ते 1000 | 1001 ते 2000 | रू.2000 च्यावर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 7 | 4 | - | - | - |
| 2. | जामोदे | 1.कोकणा | 13 | 1 | 1 | - | - | - |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | - | - | - | - |
| 3. | अर्जंदे | 1.भिल्ल | 33 | 4 | - | - | - | - |
| | | 2.कोकणा | 6 | - | - | - | - | - |
| | | एकूण | 86 | 12 | 5 | - | - | - |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःक्करण करता असे दिसून येते की, जैतापूर गावातील क्षेत्रीय पाहणी केलेल्या कोकणा जमातीच्या 33 कुटुंबापैकी फक्त 7 विस्थापित कुटुंबाकडे मूळ गावठाणात गोठे (जनावरांसाठी) होते. त्यापैकी केवळ 4 कुटुंबांना रू.500 पर्यंत नुकसान भरपाई देण्यात आली असल्याचे आढळून आले. उर्वरीत 3 कुटुंबांना जुन्या गावठाणातील जनावरांच्या गोठयासाठी काहीही नुकसान भरपाई रक्कम मिळाली नाही.

तसेच जामोदे गावातील कोकणा जमातीच्या एका कुटुंबाकडेच जुन्या गावठाणात जनावरांसाठी गोठा बांधलेला होता त्याला नुकसान भरपाई रक्कम रू.500 मिळाल्याचे आढळून आले.

अर्जंदे गावातील भिल्ल जमातीच्या 33 कुटुंबापैकी फक्त 4 कुटुंबांकडे जुन्या गावठाणामध्ये (जलमय झालेल्या) जनावरांसाठी स्वतंत्र गोठा बांधले होते असे सांगितले. तथापि त्यापैकी एकाही कुटुंबाला गोठयासाठी मोबदला रक्कम/नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे आढळून आले.

प्रकल्पातील सर्वेक्षित कुटुंबांचा एकत्रित विचार करता असे दिसून येईल की, जुन्या

गावठाणात जनावरांसाठी गोठे असलेल्या 12 कुटुंबापैकी 5 (42 टक्के) कुटुंबांनाच गोठयासाठी नुकसान भरपाई देण्यात आली.

नवीन विस्तारित गावठाणात घर बांधणेसाठी प्लॉट मिळालेली कुटुंबे :

सदर सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या सरड गावातील आदिवासी कुटुंबांना पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत अजंदे दिगर येथे तर अंबापूर येथील आदिवासी कुटुंबांना जैतापूर येथील विस्तारित गावठाणात घरासाठी प्लॉट देण्यात आले. विसापूर येथील बाधित आदिवासी कुटुंबांना जामोठे येथे घरासाठी प्लॉट देण्यात आले. सर्वेक्षित कुटुंबांना घरासाठी मिळालेल्या प्लॉटच्या संबंधात जमाती निहाय माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे :

तक्ता क्र.6.13

नवीन गावठाणात घरासाठी प्लॉट मिळालेली जमाती निहाय कुटुंब वर्गवारी

| अ.क्र. | गावाचे नांव | अनुसूचित जमात | सर्वेक्षित कुटुंबे | नवीन गावठाणात घरासाठी प्लॉट मिळालेल्या कुटुंबांची प्लॉटच्या आकारमानानुसार वर्गवारी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 गुंठा | 2 गुंठे | 3 गुंठे | 4 गुंठे | 5 गुंठे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | जैतापूर | 1.कोकणा | 33 | 5 | 9 | 17 | 2 | - |
| 2. | जामोठे | 1.कोकणा | 13 | - | 13 | - | - | - |
| | | 2.महादेव कोळी | 1 | - | 1 | - | - | - |
| 3. | अजंदे | 1.भिल्ल | 33 | - | 33 | - | - | - |
| | | 2.कोकणा | 6 | - | 6 | - | - | - |
| | | एकूण | 86 | 5 | 62 | 17 | 2 | - |

....

# प्रकरण 7 वे

## करंजवण मोठा सिंचन प्रकल्प

### गाव पत्रकातील माहितीचे पृथ:क्करण

करंजवण सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन नळवाडी व नळवाडीपाडा या दोन {2} गावांमध्ये करण्यात आले. त्या पुनर्वसित गावासंबंधी माहिती गोळा करण्यात आली. सदर माहितीचे पृथ:क्करण केले असता खालील बाबी आढळून आल्या.

गांव निहाय उपलब्ध असलेल्या सुविधा व सदर गावाच्या विशिष्ट समस्या/प्रश्न व त्यासंबंधी पुनर्वसित कुटुंबांनी प्राधान्याने अपेक्षिलेल्या योजनांबाबत विवेचन खालीलप्रमाणे :

**1} नळवाडी :** विस्थापितांचे पुनर्वसन मूळ नळवाडी महसूल गावाच्या विस्तारित गावठाणात केले आहे. नळवाडी व नळवाडीपाडा अशी ग्रुप ग्राम पंचायत आहे. येथे ग्राम पंचायत कार्यालय आहे.

**1. जमाती, लोकसंख्या व त्यांचा व्यवसाय** सन 1991 च्या जनगणनेनुसार गावची लोकसंख्या 1271 इतकी असून त्यामध्ये महादेव कोळी व कोकणा या अनुसूचित जमातींचा समावेश आहे. सदर कुटुंबे भूमीहीन कुटुंबे आहेत. सदर आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेतमजुरी व मजुरी असा आढळून आला. परंतु स्थानिक रोजगार मजुरी पुरेशा स्वरूपात उपलब्ध नसल्याने तेथील कुटुंबांना रोजगाराच्या शोधार्थ तालुक्यात स्थलांतर करावे लागते. पुनर्वसित गावी केवळ निवा-याची {घराची} सोय उपलब्ध असल्याने पावसाळ्यापूर्वी सदर कुटुंबे पुन्हा गावी येतात. इतर हंगामात {रोजगार} मिळेल त्या ठिकाणी वास्तव्य करून गुजराण करतात.

**2. शैक्षणिक सुविधा:** गावामध्ये एक प्राथमिक शाळा असून खाजगी संस्थेचे माध्यमिक विद्यालय आहे.

3· सार्वजनिक सुविधाः

| | |
|---|---|
| अ) पिण्याचे पाणी | पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी शासकीय दोन हातपंप बसविण्यात आले आहेत· पिण्याचे पाणी वर्षभर पुरेसे उपलब्ध होत नाही· उन्हाळ्यात 4 महिने तीव्र टंचाई भासते· पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी केलेली नळयोजना अपु-या स्वरूपात बरेच दिवस पडून आहे असे आढळून आले· |
| ब) वीजपुरवठा | गावात वीज पुरवठा असून वीजेचा वापर घरगुती, रस्त्यावरील दिवे व इतर उद्योगासाठी करण्यात येतो· |
| क) आरोग्य सुविधा | गावामध्ये एक सार्वजनिक (शासकीय) दवाखाना व एक खाजगी दवाखाना आहे· इतर कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नाही· |
| ड) दळणवळण सुविधा | गावात कच्चे जोड रस्ते आहेत· इतर दळणवळण सुविधा अंतर्गत एक पोस्ट ऑफिस आहे· |
| इ) शासकीय कार्यालय | गावामध्ये संयुक्त ग्राम पंचायत नळवाडी/नळवाडीपाडा यासाठी ग्राम सेवकाचे कार्यालय आहे· तसेच तलाठयाचे कार्यालय आहे· |
| फ) इतर सुविधा | गावामध्ये जनावरांचा दवाखाना आहे· किराणा मालाची दोन दुकाने असून पिठाची एक गिरणी आहे· |

4· गावाच्या विशिष्ट समस्या/प्रश्न

1· गावातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी सोय नाही·

2· पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही· नळाने पाणी पुरवठा करण्यासाठी तयार केलेली पाण्याची टाकी अपु-या अवस्थेत बरेच वर्षे पडून आहे·

3· स्थानिक रोजगाराच्या संधी नाहीत·

4· रोजगार मजुरीसाठी मूळ गावापासून बरेच दिवस दूर वास्तव्य करून उपजीविका करावी लागते·

| | |
|---|---|
| 5. गावाच्या विकासासाठी कोणत्या अपेक्षित योजनांची कार्यवाही व्हावी? | 1. गावातील पुनर्वसित आदिवासी कुटुंबे ही भूमीहीन कुटुंबे असल्याने मजुरी शिवाय उपजीविकेचे कोणतेही साधन त्याचेजवळ नाही. स्थानिक ठिकाणची इतर कुटुंबेही भूमीहीन व काही शेतीधारक आहेत. परंतु त्यांची शेतीही जिरायत स्वरुपाची असल्याने त्यांचेकडेही या कुटुंबांना रोजगार मजुरी उपलब्ध होत नाही. स्थानिक ठिकाणी सध्या इंडो फ्रेंच कारखान्यामध्येही त्यांना रोजगार मिळत नाही, त्यामुळे रोजगाराच्या शोधार्थ जवळच्या तालुक्यात या कुटुंबांना हिवाळा व उन्हाळयात स्थलांतर करावे लागते. पावसाळयामध्ये ही कुटुंबे निवा-यासाठी पुनर्वसित गावी परत येतात. अशा परिस्थितीत स्थानिक रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने लघुउद्योग योजना राबविणे अगत्याचे आहे. लघुउद्योग योजना राबविणे अगत्याचे आहे.<br>2. गावातील भूमीधारक (कास्तकार) कुटुंबाकडील शेतीस धरणामधून पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी लिफट इरिगेशन योजना राबवावयास हवी. ग्रामस्थांनी आपली मागणी शासनाकडे सादर केली आहे.<br>3. गावामध्ये उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी उच्च माध्यमिक विद्यालय हवे.<br>4. गावामध्ये शेती पतसंस्था तसेच सहकारी बँकेची शाखा उघडण्यात यावी.<br>5. गावातील कुटुंबांना आठवडे बाजारासाठी सोय नसल्याने गावात आठवडे बाजार हवा.<br>6. पिण्याचे पाणी नळाने पुरविण्यासाठी योजना.<br>7. आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात यावे.<br>8. उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय. |
| 2) नळवाडी पाडा : | दिंडोरी ननाशी या रस्त्यावरील हे गांव. प्रकल्पांतर्गत विस्थापितांचे पुनर्वसन नळवाडीपाडा मधील विस्तारित गावठाणात केले आहे. |
| 1. गावची लोकसंख्या, जमाती व त्यांचा व्यवसाय | नळवाडीपाडा हे नळवाडी ग्रुप ग्राम पंचायतीमध्ये समाविष्ट असून त्याची सन 1991 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 2180 इतकी आहे. गावामध्ये प्रामुख्याने कोकणा व महादेव कोळी या अनुसूचित जमातींची वस्ती आहे. गावातील पुनर्वसित कुटुंबांचा प्रमुख व्यवसाय शेती असून दुय्यम |

व्यवसाय मजुरी आहे.

2. शैक्षणिक सुविधा: गावामध्ये अंगणवाडी (ज.प.), प्राथमिक शाळा व प्राथमिक शाळा आहे.

3. सार्वजनिक सुविधा:

अ) पिण्याचे पाणी — पिण्याच्या पाण्याचा नळाने पुरवठा करण्यात येतो. याशिवाय पुनर्वसित कुटुंबासाठी एक शासकीय हातपंप बसविण्यात आला आहे. पिण्याचे पाणी मात्र पुरेशा स्वरुपात उपलब्ध नाही. उन्हाळयात चार महिने टंचाई असते.

ब) वीजपुरवठा — गावात वीज पुरवठा असून वीजेचा वापर घरगुती कारणासाठी रस्त्यावरील दिव्यासाठी व उद्योगासाठी करण्यात येतो.

क) आरोग्य सुविधा — गावामध्ये एक खाजगी दवाखाना आहे. गावात इतर कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नाही.

ड) दळणवळण सुविधा — सदर गाव दिंडोरी ननाशी डांबरी रस्त्यावर वसले आहे. गावामध्ये जोड रस्ते कच्चे स्वरुपात आहेत. इतर कोणत्याही दळणवळण सुविधा उपलब्ध नाहीत.

इ) शासकीय कार्यालये — नळवाडी व नळवाडीपाडा अशी ग्रुप ग्राम पंचायत असल्याने ग्राम सेवकाचे व तलाठयाचे स्वतंत्र कार्यालय या गावात नाही.

फ) इतर सुविधा — गावामध्ये किराणामालाची 7 दुकाने असून पिठाच्या गिरण्या 2 आहेत.

4. गावाच्या विशिष्ट समस्या/प्रश्न:

1. गावातील विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय नाही.
2. गावातील भूमीधारक कुटुंबांच्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी लिफट इरिगेशन योजना नाही त्यामुळे केवळ पवसाच्या पाण्यावर शेती करावी लागते.
3. गावातील आर्थिक व्यवहार हाताळण्यासाठी बँकेची शाखा नाही.
4. पिण्याचे पाणी मुबलक स्वरुपात उपलब्ध नाही.
5. लोकांना स्थानिक रोजगाराच्या संधी नाहीत.
6. स्थानिक कारखान्यात तरुणांना नोक-या उपलब्ध करुन

दिल्या जात नाहीत.

7. पुनर्वसित कुटुंबांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते.

| | |
|---|---|
| 5. गावाच्या विकासासाठी कोणत्या अपेक्षित योजनांची कार्यवाही व्हावी ? | 1. गावातील मुलांच्या शिक्षणासाठी माध्यमिक शाळा मंजूर व्हावी.<br>2. पिण्याचे पाणी मुबलक स्वरूपात उपलब्ध होण्यासाठी नळयोजना विस्तृत स्वरूपात राबवावी.<br>3. स्थानिक लोकांना रोजगार देण्यासाठी कारखाना उभारणी म्हणजे उपजीविकेसाठी स्थलांतराची पाळी कुटुंबावर येणार नाही.<br>4. कास्तकारांच्या शेतीस पाणी पुरवठा करण्यासाठी लिफट इरिगेशन योजना.<br>5. गावातील कुटुंबांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करावे.<br>6. गाव दिंडोरी नाशी हमरस्त्यावर असल्याने लोकांची वर्दळ अधिक जवळच कारखाना (इंडो फ्रेंच) असल्याने कामगारांची ये जा अधिक त्यासाठी बसस्टॅण्डची सोय व्हावी.<br>7. गावात बँकेची शाखा (सहकारी किंवा इतर) उघडण्यात यावी.<br>8. नळवाडी व नळवाडीपाडा या दोन गावामध्ये 3 ते 4 कि.मी. अंतर असल्याने तलाठी व ग्रामसेवक कार्यालयात जाण्यास येथील लोकांना खूपच त्रास सहन करावा लागतो. तेव्हां या ठिकाणी तलाठी व ग्राम सेवकाचे कार्यालय उघडण्यात यावे.<br>9. तसेच या गावात कास्तकार कुटुंबे अधिक असल्याने त्यांच्या जनावरांच्या देखभालीकरिता जनावरांचा दवाखाना व्हावा. |

## हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्प

### गाव पत्रकातील माहितीचे पृथःक्करण

हरणबारी प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांचे 3 गावामध्ये पुनर्वसन करण्यात आले. त्या पुनर्वसित गावासंबंधी माहिती गोळा करण्यात आली. सदर माहितीचे पृथःक्करण केले असता खालील बाबी आढळून आल्या.

गाव निहाय उपलब्ध सुविधा व गावच्या विशिष्ट समस्या व त्यासंबंधी पुनर्वसितांनी अपेक्षिलेल्या योजना खाली नमूद केल्याप्रमाणे :-

1) जामोटे

| | |
|---|---|
| 1. गावची लोकसंख्या, जमाती व त्यांचा व्यवसाय: | पुनर्वसित जामोटे गावची लोकसंख्या 1532 इतकी असून गावात कोकणा व भिल्ल अनुसूचित जमातीची कुटुंबे रहात असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती व दुय्यम व्यवसाय शेतमजुरी असा आहे. |
| 2. शैक्षणिक सुविधा: | गावामध्ये एक अंगणवाडी व प्राथमिक शाळेचा एक वर्ग आहे. |
| 3. सार्वजनिक सुविधा: | |
| अ) पिण्याचे पाणी | सार्वजनिक विहिर असून पिण्याचे पाणी वर्षभर पुरेसे नाही. उन्हाळयामध्ये 3 महिने टंचाई भासते. |
| ब) वीजपुरवठा | गावामध्ये वीजपुरवठा करण्यात आलेला असून वीजेचा वापर घरगुती कामासाठी व रस्त्यावरील दिव्यांसाठी करण्यात येतो. |
| क) दळणवळण सुविधा | दळणवळण सुविधा अंतर्गत मुख्य रस्ता असून जोडरस्ते (कच्च्या स्वरूपात) आहेत. इतर सुविधांमधील ऑफिस तार ऑफिस, दूरध्वनी यांची सोय नाही. |

ड§ आरोग्य सुविधा कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नाही.

इ§ शासकीयकार्यालय ग्रामसेवकाचे कार्यालय गावात आहे.

फ§ इतर सुविधा गावामध्ये किराणा दुकान, कापड दुकान, पिठाची गिरणी यांची सोय नाही.

4. गावाच्या विशिष्ट समस्या/प्रश्नः
1. गावातील मुलांच्या शिक्षणासाठी प्राथमिक शाळा नाही.
2. तांत्रिक सेवा/कृषि सल्ला केंद्र सोय नाही.
3. नळाने पाणी पुरवठा नाही.
4. रस्ते डांबरीकरण नाही.

5. गावाच्या विकासासाठी कोणत्या अपेक्षित योजनांची कार्यवाही व्हावी ?
1. गावामध्ये प्राथमिक शाळा होणे जरूरीचे.
2. गावामध्ये नळाने पिण्याच्या पाणी पुरवठा होणे अत्यावश्यक
3. गावात किराणा व स्वस्त धान्य दुकान, पिठाची गिरणी इ. सुविधांची नितांत गरज.
4. गावातील समाज बांधवांकरिता मारुती मंदीर बांधून मिळावे.
5. रस्ते डांबरीकरण होणे गरजेचे.

2§ जैतापूर

1. गावाची लोकसंख्या,जमात व त्यांचा व्यवसाय : या गावाची सन 1991 च्या जनगणनेनुसार 721 इतकी लोकसंख्या आहे. त्यामध्ये भिल्ल, कोकणा या अनुसूचित जमातींची वस्ती आहे. सदर लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून दुय्यम व्यवसाय मजुरी/शेतमजुरी आहे.

2. शैक्षणिक सुविधाः गावामध्ये एक अंगणवाडी व एक प्राथमिक शाळा आहे.

3. सार्वजनिक सुविधाः

अ§ पिण्याचे पाणी पिण्याच्या पाण्यासाठी हातपंपाची व्यवस्था आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अपुरा असून उन्हाळयातील दोन महिने पाणी टंचाई भासते.

| | |
|---|---|
| ब) वीजपुरवठा | गावामध्ये वीज पुरवठा करण्यात आला असून वीजेचा वापर घरगुती कारणासाठी तसेच शेती पंपासाठी करण्यात येतो. |
| क) दळणवळण सुविधा | गावामध्ये 2 कि.मी. लांबीचे जोडरस्ते (कच्चे) आहेत. इतर सुविधामध्ये पोस्ट ऑफिस, तार ऑफिस, दूरध्वनी केंद्र इ. उपलब्ध नाहीत. |
| ड) आरोग्य सुविधा | गावामध्ये एक सार्वजनिक दवाखाना आहे. इतर आरोग्य आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत. |
| इ) शासकीय कार्यालय | शासकीय कार्यालयामध्ये तलाठी/ग्रामसेवक यापैकी कोणाचेही कार्यालय नाही. |
| फ) इतर सुविधा | गावात किराणा, कापड, भांडी दुकान, पिठाची गिरणी इ. सुविधा नाहीत. |

4. गावाच्या विशिष्ट समस्या/प्रश्नः

1. गावातील आदिवासी कुटुंबांना धरणग्रस्त म्हणून दाखला मिळत नाही व तो सुध्दा दिला जात नाही.
2. रोजगाराच्या शोधार्थ धुळे जिल्ह्यातील नंदुरबार/साक्री येथे हंगामी स्थलांतर करावे लागते.
3. प्रकल्पग्रस्त म्हणून कसण्यासाठी जिरायत जमिनीचे वाटप केले असल्याने उपजीविके इतपत उत्पन्न मिळविता येत नाही.

5. गावाच्या विकासासाठी कोणत्या अपेक्षित योजनांची कार्यवाही व्हावी ?

1. शेतजमिनीस पाणी पुरवठा करण्यासाठी लिफट इरिगेशन योजनेचा प्रस्ताव दाखल करुनही मंजूर होत नाही. तो मंजूर करावा.
2. जमिनीचे सपाटीकरण.
3. परिसरामध्ये शेतमाल प्रक्रिया उद्योग सुरु करावा.
4. पिण्याचे पाणी नळाने पुरविण्याची योजना व्हावी.
5. गावातील मुख्य व जोड रस्त्यांची दुरुस्ती.
6. आरोग्य सुविधा व इतर सार्वजनिक सुविधा प्राधान्ये करुन पुरवाव्यात.

3) अजंदे

1. गावची लोकसंख्या, जमात व त्यांचा व्यवसाय

सन 1991 च्या जनगणनेनुसार या गावची लोकसंख्या 327 इतकी असून त्यामध्ये भिल्ल व कोकणा या अनुसूचित जमातींचा समावेश होतो. सदर लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून दुय्यम व्यवसाय शेतमजुरी असल्याचे आढळून आले.

2. शैक्षणिक सुविधा:

गावामध्ये एक अंगणवाडी व एक प्राथमिक शाळा आहे.

3. सार्वजनिक सुविधा:

अ) पिण्याचे पाणी

नदीचे पाणी पिण्यासाठी वापरतात त्याशिवाय पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी शासकीय हातपंप बसविण्यात आले आहेत. पिण्याचे पाणी वर्षभर मुबलक स्वरुपात उपलब्ध होते. त्यामुळे उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही.

ब) वीज पुरवठा

गावाला वीज पुरवठा करण्यात आला असून वीजेचा वापर घरगुती कारणासाठी करण्यात येतो.

क) आरोग्य सुविधा

गावामध्ये काहीही आरोग्य सुविधा नाहीत. खाजगी दवाखाना देखील नाही.

ड) दळणवळण सुविधा

गावामध्ये कच्चे जोड रस्ते आहेत. इतर दळणवळण सुविधापैकी दूरध्वनी केंद्र आहे.

इ) शासकीय कार्यालय

गावामध्ये ग्राम सेवकाचे कार्यालय आहे.

फ) इतर सुविधा

गावामध्ये किराणामालाची तीन दुकाने व पिठाची एक गिरणी आहे.

4. गावाच्या विशिष्ट समस्या/प्रश्न:

1. गावात माध्यमिक शिक्षणाची सोय नाही.
2. तांत्रिक शिक्षणाची सोय नाही.
3. गावासाठी नळाने पाणी पुरवठा योजना नाही.
4. आठवडे बाजार सोय नाही.
5. शेती पतसंस्था/सहकारी संस्था/बँक यांची सोय नाही.

| | |
|---|---|
| 5. गावाच्या विकासासाठी कोणत्या अपेक्षित योजनांची कार्यवाही व्हावी असे वाटते : | 1. गावातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी माध्यमिक शाळा.<br>2. तांत्रिक व कृषिसेवा संस्थांची निर्मिती.<br>3. सहकारी कृषि पतसंस्था, सहकारी बँक याची सोय.<br>4. साखर कारखाना किंवा तत्सम औद्योगिक कारखान्याची सोय.<br>5. नळाने पाणी पुरवठा योजना.<br>6. रस्त्यावरील दिव्यांसाठी/शेतीसाठी वीजेच्या वापराची सोय.<br>7. गावातील रस्त्यांचे डांबरीकरण. |

## जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा नाशिक यांचे पुनर्वसनाबाबत अभिप्राय

### 1) करंजवण मोठा सिंचन प्रकल्प :

सदर प्रकल्पासाठी विस्थापित झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन हे पूर्वीच करण्यात आले आहे. त्यांचे पुनर्वसन होऊन बराच कालावधी लोटला आहे.

सदर प्रकल्पाखालील विस्थापितांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र प्रकल्प बाधित विस्थापितांचे (लोकांचे) पुनर्वसन अधिनियम 11 (1) अन्वये आवश्यक असलेली अधिसूचना जारी करण्यात आली नव्हती असे सांगण्यात आले, तेव्हां प्रकल्पातंर्गत विस्थापित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी या कार्यालयाकडे नव्हती. तथापि शासनाच्या आदेशाप्रमाणे नळवाडी गाव व नळवाडी पाडा येथील बाधित कुटुंबांना घरासाठी प्लॉटचे वाटप व नागरी सुविधा सुखसोयी पुरविलेल्या आहेत. वास्तविक पहता सदर बाधित कुटुंबांना सार्वजनिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे होती.

तात्पर्य : जुन्या सिंचन प्रकल्पाखाली बाधित विस्थापित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे काम पूर्वी प्रकल्प प्राधिकारी व जिल्हा परिषद यांचेकडे सोपविले होते. फक्त भूमी संपादन संबंधित कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आली. परंतु विस्थापितांना नागरी सुविधा सुखसोयी पुरविण्याचे काम जिल्हा परिषदेकडे दिलेले होते. दुसरे असे की सदर प्रकल्प अधिसूचित नसल्याने जिल्हा पुनर्वसन अधिकारी नागरी सुविधा पुरविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि त्यांनी ते काम पूर्ण केले आहे.

महसूल दप्तरामधील नोंदीनुसार प्रकल्पबाधित विस्थापितांना नवीन गावठाणामध्ये पुरविलेल्या नागरी सुविधा येणेप्रमाणे :

1. घरासाठी प्लॉट - 95
2. पिण्याचे पाण्यासाठी - 1 विहिर, 2 बोअरवेल
3. शैक्षणिक सुविधा - 6 शाळा
4. समाजमंदीर - 1
5. अंतर्गत रस्ते - 3
6. जोड रस्ते - 3
7. वीज पुरवठा - आहे
8. घरासाठी कर्ज वाटप - 95 लोकांना रु.1,48,950/- घरकर्ज.

सर्वेक्षणानंतर विस्थापितांकडून माहिती घेऊन प्रत्यक्ष स्थितीबाबत थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :

1. विस्थापित कुटुंबांना नळवाडी गाव तथा नळवाडी पाडा येथील विस्तारित गावठाणात घरासाठी 1 गुंठयाचे प्लॉट मंजूर करुन ताब्यात दिलेले हाते त्यावर त्यांनी घरे बांधली आहेत. घरासाठी कर्ज उपलब्ध करण्यात आले होते.

2. नागरी सुविधामध्ये :
 अ) पिण्याचे पाण्यासाठी हातपंप मिळाले.
 ब) गावाला वीज पुरवठा आहे.
 क) समाज मंदीराची जागा प्रत्यक्ष समाजाचे ताब्यात नाही. सदर जागेमध्ये माध्यमिक शाळा भरविण्यात येते.
 ड) अंतर्गत रस्ते व जोड रस्ते कच्च्या स्वरुपातील आहेत.
 इ) घरासाठी दिलेल्या कर्जाची वसुली महसूल विभागामार्फत सुरु केलेली आहे.

2) हरणबारी मध्यम सिंचन प्रकल्प :
---------------------

प्रकल्प बाधित तथा विस्थापितांचे पुनर्वसन अधिनियमातंर्गत कलम 11 (1) अन्वये सदर प्रकल्प अधिसूचित करण्यात आला होता. तेव्हा सदर कायद्याखालील तरतुदीनुसार विस्थापितांच्या पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्यात आले असे सांगण्यात आले. पुनर्वसनासंबंधीची कार्यवाही महसूल विभाग व पाटबंधारे विभाग यांनी संयुक्तरित्या पार पाडलेली आहे.

महसूल दप्तरातील नोंदीनुसार प्रकल्पबाधित विस्थापितांना पुनर्वसनाच्या वेळी पुरविलेल्या सार्वजनिक नागरी सुविधा खालील प्रमाणे :

1. घरासाठी प्लॉट - 75
2. पिण्याचे पणी पुरविण्यासाठी - 4 विहिर, 8 बोअरवेल
3. शैक्षणिक सुविधा - 5 शाळा
4. समाजमंदीर - 3
5. अंतर्गत रस्ते - 6
6. जोड रस्ते - 4
7. वीज पुरवठा - आहे
8. घर कर्जापोटी - 55 {शेतक-यांना खातेदारांना} रु.1,93,400/-चे वाटप.

सर्वेक्षणातंर्गत आढळलेल्या सद्यःस्थितीबाबत विवेचन उपरोक्त नागरी सुविधा/सुखसोयीपैकी जैतापूर व अर्जंदे येथेच पिण्याचे पाण्यासाठी प्रत्येकी एक शासकीय हातपंप पुरविण्यात आले आहेत. जामोठे येथे सार्वजनिक विहिरीतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो.

....

# प्रकरण 8 वे

## निरीक्षण व निष्कर्ष

### प्रास्ताविक

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील करंजवण व बागलाण तालुक्यातील हरणबारी सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांची पाहणी करुन संकलित केलेल्या माहितीचे पृथःक्करण करता खालील बाबी निदर्शनास आल्या. त्या तपशिलामध्ये येथेप्रमाणे :

1. भूमीहीन कुटुंबांचा भरणा अधिक :

करंजवण सिंचन प्रकल्पांतर्गत सर्वेक्षित विस्थापित कुटुंबामध्ये भूमीहीन कुटुंबांची संख्या अधिक असल्याचे आढळून आले. नळवाडी गावामध्ये भूमीहीन विस्थापित आदिवासी कुटुंबांचे प्रमाण शंभर टक्के इतके होते तर नळवाडी पाडा या गावातील विस्थापित आदिवासी भूमीहीनांचे प्रमाणे 65 टक्के इतके दिसून आले. जमाती निहाय विचार करता महादेव कोळी जमातीच्या विस्थापित कुटुंबामध्ये सर्वच कुटुंबे भूमीहीन असल्याचे आढळून आली.

हरणबारी सिंचन प्रकल्पामधील सर्वेक्षित विस्थापित आदिवासी कुटुंबांमध्ये कोकणा जमातीतील भूमीहीन कुटुंबांचे प्रमाण 20 टक्के इतके होते तर भिल्ल जमातीच्या भूमीहीन कुटुंबांचे प्रमाण 85 टक्के इतके आढळून आले. प्रकल्पामध्ये एकूण 86 आदिवासी विस्थापितांमध्ये 41 (48 टक्के) कुटुंबे भूमीहीन असल्याचे दिसून आले. सारांश, करंजवण सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांमध्ये भूधारक कुटुंबे नव्हती म्हणजेच भूमीहीन कुटुंबांचा भरणा अधिक होता, तर हरणबारी सिंचन प्रकल्पामधील विस्थापित आदिवासी कुटुंबात 52 टक्के भूधारक व 48 टक्के भूमीहीन कुटुंबे असल्याचे निदर्शनास आले.

2. रोजगारासाठी दूर अंतरावर स्थलांतर :

सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी भू-धारकांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले. परंतु भूमीहीन शेतमजूर आदिवासी कुटुंबांना मात्र शेतजमिनीचे वाटप करण्यात आलेले नाही. परिणामतः त्यांना उपजीविकेसाठी रोजंदारी हेच एकमेव साधन उरलेले असल्याचे आढळून आले. परंतु ही रोजंदारी देखील स्थानिकरित्या उपलब्ध होऊ शकत नाही. तेव्हां पुनर्वसित ठिकाणापासून दुस-या तालुक्यात खूप दूर अंतरावर रोजगार मिळेल तेथे जावे लागते.

काही आदिवासी कुटुंबे तर जवळच्या तालुक्यात तात्पुरते स्थलांतर करून रोजंदारीवर उदरनिर्वाह करीत असल्याचे निदर्शनास आले. सारांश, विस्थापनामुळे पूर्वी उपलब्ध होणारा स्थानिक रोजगार बुडाला व उपजीविकेसाठी नवीन संघर्ष वाढला असून त्यांचे जीवन पुनर्वसनानंतर स्थिरावलेले नाही.

३. नवीन गावठाणात घरासाठी असरबल भागात अविकसित प्लॉट वाटप :

---

विस्थापितांना पुनर्वसित नवीन गावठाणात घरासाठी देण्यात आलेले प्लॉट पूर्वीच्या गावठाणा लगतच परंतु असरबल व उतारावर देण्यात आले असल्याचे आढळून आले. अशा प्लॉटमध्ये घर बांधण्यापूर्वी त्याचे सपाटीकरण करणे गरजेचे होते. विस्थापित आदिवासी कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी नवीन गावठाणासाठी निवडलेली जागा व्यवस्थित, सुयोग्य नसल्याचे आढळून आले. परिणामतः घरासाठी विस्थापित आदिवासींना देण्यात आलेले अविकसित प्लॉट विकसित करण्यास आदिवासींना खर्च करावा लागल्याचे दिसून आले. गरीबीच्या परिस्थितीमुळे हा खर्च त्यांना परवडला नाही.

4. विस्थापित आदिवासी कुटुंबांची बिकट आर्थिक स्थिती :

---

विस्थापित आदिवासी कुटुंबांमध्ये काही भूधारक तर बरेच भूमीहीन कुटुंबे असल्याचे निदर्शनास आले. भूधारक कुटुंबांनी शेतीला पूरक असा कोणताही व्यवसाय अंगीकारला नसल्याचे आढळून आले. पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असल्याने उन्हाळ्यातील 3/4 महिने कुटुंबाला कसल्याच प्रकारचा कामधंदा उपलब्ध नसल्याचे दिसून आले. स्थानिक ठिकाणी रोजंदारी उपलब्ध करून देण्यासाठी इतर कारखाने वा उद्योगधंदे विकसित झालेले नाहीत. स्थानिकरित्या उपलब्ध होणा-या रोजंदारीचे प्रमाण अत्यल्प. सारांश, सर्वेक्षित आदिवासी कुटुंबांची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे दिसून आले.

5. विस्थापित आदिवासी जमातीतील विविध गट :

---

करंजवण सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबामध्ये महादेव कोळी, कोकणा या आदिवासी जमातींच्या कुटुंबांचा भरणा अधिक होता तर हरणबारी सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित कुटुंबामध्ये कोकणा, भिल्ल, महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या कुटुंबांचे प्रमाण अधिक होते. सर्वेक्षित आदिवासी कुटुंबामध्ये महादेव कोळी (34), कोकणा (63), भिल्ल (33) अशी कुटुंबे आढळून आली. दोन्ही सिंचन प्रकल्पाखाली विस्थापित आदिवासी कुटुंबामध्ये कोकणा जमातीच्या कुटुंबांचे प्रमाण 49 इतके होते. त्या खालोखाल महादेव कोळी जमातीच्या कुटुंबांचा क्रमांक लागतो.

6. विस्थापित आदिवासी कुटुंबांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक :

सर्वेक्षित आदिवासी विस्थापितामध्ये साक्षरतेचे प्रमाण अगदी अल्प आढळून आले. करंजवण सिंचन प्रकल्पातंर्गत सर्वेक्षित महादेव कोळी जमातीच्या कुटुंबामध्ये निरक्षरतेचे प्रमाण 71.6 टक्के इतके आढळले तर कोकणा जमातीमध्ये तेच प्रमाण 67.2 टक्के इतके दिसून आले. सदर प्रकल्पातंर्गत दुस-या गावातील {नळवाडीपाडा} येथील महादेव कोळी जमातीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण तुलनात्मकदृष्टया अधिक आढळले.

तसेच हरणबारी सिंचन प्रकल्पातंर्गत सर्वेक्षण केलेल्या विस्थापित आदिवासी कुटुंबापैकी कोकणा जमातीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण 70.5 टक्के इतके आढळले तर दुस-या सर्वेक्षित गावात त्याच जमातीमधील निरक्षरतेचे प्रमाण 75 टक्के इतके होते. भिल्ल जमातीच्या कुटुंबातील निरक्षरतेचे प्रमाण 70.6 टक्के इतके असल्याचे दिसून आले. सारांश, एकंदरीत पहता विस्थापित आदिवासी कुटुंबामध्ये साक्षरतेचे प्रमाण अल्प व निरक्षरतेचे प्रमाण अधिक निदर्शनास आले. परिणामतः पुनर्वसन कार्यक्रमाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टीकोन प्रगल्भ व विकसित नव्हता असे निदर्शनास आले.

7. विस्थापितांमध्ये स्थानिक नेतृत्वाचा अभाव :

सर्वेक्षित गावामधील विस्थापित आदिवासी कुटुंबामध्ये त्यांचे पुनर्वसन प्रश्नाचे स्वरुप व त्याचे समाधानकारक सोडवणूक करण्याबाबत प्रयत्न याविषयी स्थानिक नेतृत्व उदासीन असल्याचे जाणवले. आदिवासी जमातीतील स्थानिक नेतृत्व करणारी नेतेमंडळी सदर प्रश्नाकडे जाणीवपूर्वक पहायला तयार नसल्याचे चित्र दिसून आले. नेतृत्वामधील पोकळीमुळे आदिवासींच्या विकासावर विपरित परिणाम झालेला दिसतो.

8. विस्थापितांना मूळ गावातील जमीन/घरे यासाठी अत्यल्प मोबदला/नुकसान भरपाई :

करंजवण सिंचन प्रकल्पातंर्गत सर्वेक्षण केलेल्या विस्थापित आदिवासी कुटुंबामध्ये सर्वच भूमीहीन कुटुंबे होती त्यांना त्यांचे मूळ गावातील घरासाठी मोबदला देण्यात आला. 50 टक्के कुटुंबांना रु.500 पर्यंत, 23 टक्के कुटुंबांना रु.501 ते 1000 पर्यंत, व 27 टक्के कुटुंबांना रु.1001 ते 2000 पर्यंत घरासाठी मोबदला {नुकसान भारपाई} रक्कम देण्यात आल्याचे आढळून आले.

हरणबारी सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापित सर्वेक्षित आदिवासी कुटुंबांमध्ये काही भूमीहीन तर काही भूधारक कुटुंबे होती. त्यामधील एका गावातील भूधारक कुटुंबापैकी 12 टक्के कुटुंबांना जमिनीचा मोबदला म्हणून रु.5 हजारापर्यंत, 3 टक्के कुटुंबांना 5 ते 10 हजारापर्यंत, 9 टक्के कुटुंबांना 11 ते 20 हजारापर्यंत, 6 टक्के कुटुंबांना 21 ते 25 हजार रुपयापर्यंत नुकसान भरपाई रक्कम देण्यात

आल्याचे आढळून आले. दुस-या सर्वेक्षित गावातील 13 कुटुंबापैकी एका कुटुंबाला रु.25 हजारापेक्षा अधिक नुकसान भरपाई मिळाल्याचे निदर्शनास आले. उर्वरीत गावामध्ये कोणासही जमिनीसाठी नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

सदर प्रकल्पामध्ये मूळ गावातील घराबाबत नुकसान भरपाई मिळालेल्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी पहता असे दिसून येते की 4 टक्के कुटुंबांना रु.500 पर्यंत, 26 टक्के कुटुंबांना रु.501 ते 1000 पर्यंत, 66 टक्के कुटुंबांना रु.1001 ते 2000 पर्यंत व 5 टक्के कुटुंबांना रु.2001 ते 5000 पर्यंत घरासाठी नुकसान भरपाई देण्यात आली. सारांश, मूळ गावातील घरासाठी रु.1001 ते 2000 पर्यंत नुकसान भरपाई मिळालेल्या आदिवासी विस्थापित कुटुंबांची संख्या अधिक होती. मूळ गावातील जमीन व घर यांच्या नुकसान भरपाई पोटी अगदी कमी मोबदला मिळाल्याचे दिसून येते.

9. पुनर्वसित नवीन गावठाणात मूलभूत सुविधांचा प्रत्यक्षात अभाव :

---

सर्वसाधारणपणे असे दिसून आले की, दोन्ही सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित आदिवासी कुटुंबांना नवीन गावठाणामध्ये घरासाठी प्लॉटचे वाटप करण्यात आले. परंतु सदर नवीन गावठाणात पिण्याचे पाणी, रस्ते, वीज तसेच इतर सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. नवीन गावठाणात विस्थापितांना केवळ घरासाठी भूखंड देण्यात आल्याचे सांगण्यात आले. ते विकसित करण्याची जबाबदारी मात्र पार पाडण्यात आलेली नव्हती असे सांगण्यात आले. शिवाय प्रकल्प होऊनही बराच कालावधी लोटला असला तरी विस्थापित आदिवासी कुटुंबांना पुनर्वसित नवीन गावठाणामध्ये मूलभूत सुविधा अभावी जीवन कंठावे लागत असल्याचे निदर्शनास येते. सारांश, नवीन गावठाणात विस्थापितांना पुरेशा सार्वजनिक मूलभूत सुविधा पुरविलेल्या नाहीत, त्यांची वानवा आहे.

10. आदिवासी विकास विभागाचा सहभाग नाममात्र देखील नाही :

---

सर्वेक्षित सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या कुटुंबामध्ये आदिवासी कुटुंबांचा भरणा अधिक असूनही आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी योजनांची आखणी व अंमलबजावणी करणा-या आदिवासी विकास विभागाला मात्र पुनर्वसन प्रक्रियेत कोठेच विचारात घेतलेले दिसत नाही. आदिवासींच्या सुयोग्य पुनर्वसनासाठी जिल्हा पुनर्वसन सल्ला समिती गठन करण्यात आलेली होती परंतु त्यामध्ये आदिवासी विकास अधिकारी/एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी इ. स्थानिक अधिकारी यांना मात्र कोठेच प्रतिनिधीत्व दिल्याचे दिसून आलेले नाही. सारांश, आदिवासींच्या सुनियोजित व सुयोग्य पुनर्वसनासाठी आदिवासी विकास विभागाचे प्रतिनिधीत्व व सहभाग महत्वपूर्ण होता.

11· पुनर्वसन ठिकाणापासून दूर अंतरावर शेतजमीन वाटप :

हरणबारी सिंचन प्रकल्पातर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी भूमिधारक कुटुंबांना त्यांच्या पुनर्वसित गावापासून दूर अंतरावर {30 कि·मी·} लाभ क्षेत्रामध्ये शेतजमीन प्लॉट वाटप करण्यात आले असल्याचे आढळून आले· त्यामुळे पुनर्वसित गावात असलेली थोडी शेती व पुनर्वसनांतर्गत मिळालेली दूर अंतरावरील शेती याकडे सदर कुटुंबांना लक्ष पुरविणे जिकीरीचे व अडचणीचे जात असल्याचे निदर्शनास आले·

12· धरणग्रस्त असल्याचा दाखला मिळण्यात अडचणी :

सिंचन प्रकल्पातर्गत विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबांना "प्रकल्पग्रस्त" {धरणग्रस्त} असल्याचे प्रमाणपत्र देण्यात महसूल विभागामार्फत आता कार्यवाही होत नसल्याचे आढळून आले· परिणामतः धरणग्रस्तांना नोकरीबाबत दिलेल्या सवलतींमधील प्राधान्यक्रमाचा फायदा घेता येत नाही असे आढळून आले· विस्थापित कुटुंबातील सुशिक्षित तरुणांना धरणग्रस्त म्हणून प्रमाणपत्र मिळण्यासाठी संबंधित विभागाकडे अर्ज विनंत्या केल्याचे निदर्शनास आले· संबंधित विभागाकडे चौकशी करता तसा दाखला/प्रमाणपत्र देता येत नाही असे समजले·

13· प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या इतर विभागात नोकरी विषयक संधीची अनुपलब्धी :

शासनाच्या धोरणाप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना केवळ पाटबंधारे विभागामध्येच नोकरी विषयक संधी उपलब्ध असल्याने समजले· परंतु शासनाच्या इतर विभागामध्ये त्यांना नोकरी रोजगार संधी उपलब्ध नसल्याचे दिसून येते· परिणामतः केवळ एकाच खात्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकरी विषयक संधीची उपलब्धता दुर्मिळ असल्याचे निदर्शनास आले·

14· पाटबंधारे विभाग व शेती विभाग यांचे कार्यक्रमात समन्वयाचा अभाव :

सर्वेक्षित आदिवासी पुनर्वसित कास्तकारांना पाणी वापर व पीक पद्धती या संबंधीचे मार्गदर्शन पाटबंधारे विभाग तसेच शेती विभाग यांचेकडून लाभत नसल्याचे सांगण्यात आले· आदिवासी शेतक-यांना नवीन शेती तंत्र व पीक पद्धती याबाबत मार्गदर्शनाचा अभाव असल्याचे आढळून आले· परिणामतः आदिवासी कास्तकार पूर्व परंपरागत पद्धतीनेच शेती करीत असल्याचे दिसून आले· पाण्याचा काटकसरीने वापर करून पीक उत्पन्न अधिक कसे काढायचे याचे प्रबोधन पाटबंधारे विभागाने केलेले नाही· अधिक पाणी वापर म्हणजे अधिक पीक हे समीकरण बरोबर नसल्याचे ज्ञान व जाणीव नव पुनर्वसित शेतक-यांना करून देण्यात पाटबंधारे विभागाने काहीही न केल्याचे दिसून येते·

15· पुनर्वसन कार्यक्रमात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग शून्यवत :

सर्वेक्षित सिंचन प्रकल्पातंर्गत विस्थापित झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसन कार्यामध्ये शासकीय विभागाबरोबरच इतर स्वयेसेवी संस्थांचा सहभाग सहकार्य घेतले गेल्याचे आढळून आले नाही· पुनर्वसन कार्यक्रम सुयोग्य रीतीने राबवून यशस्वी करण्यासाठी लोकांचा सहभाग नोंदविणे जरुरीचे असते· त्या कामासाठी स्वयंसेवी संस्था महत्वपूर्ण व मोलाची कामगिरी करतात असे अनेक उदाहरणावरुन दिसून येते· परंतु स्वयंसेवी संस्थांची पुनर्वसन कार्यक्रमामध्ये पुनर्वसन निगडीत महसूल विभाग व जिल्हा परिषद यंत्रणा यांनी दखल घेतली गेली नसल्याचे दिसून येते·

16· मनुष्यबळ साधन विकासाकडे संपूर्ण दुर्लक्ष :

मिळालेल्या लाभापेक्षा नुकसानच जास्त झाले आहे अशी विस्थापित कुटुंबांची भावना झाली आहे· मनुष्यबळ विकास हा पुनर्वसन कार्यक्रमात मोठया फल्याची एक महत्वपूर्ण उपाययोजना मानण्यात आल्याचे दिसून येत नाही· विस्थापित झालेल्या व पुनर्वसित करावयाच्या कुटुंबांमध्ये शेतमजूर व भूमीहीन कुटुंबांचा अधिक भरणा असल्याचे दिसून आले· त्यांचेसाठी नवीन बाबी (New valiables ) विचारात घेऊनच पुनर्वसन प्रश्नाचा अभ्यास करायला पाहिजे· सदर कुटुंबांच्या कल्याणासाठी कोणत्याही योजना राबविण्यात आल्याचे आढळून येत नाही· भौतिक निरीक्षणाच्या आधारेच योजनांची आखणी होणे जरुरीचे आहे· त्यामुळेच पुनर्वसन प्रकल्प कार्यक्रम वस्तुनिष्ठ नियोजनाची अपेक्षा करतो·

····

प्रकरण ७ वे

## सूचना तथा शिफारशी

### भूमिहीनांना जमीन वाटप :

1. सिंचन प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या भूमिहीन कुटुंबांना कसण्यासाठी जमीन दिली गेली नसल्याने उपजिविकेसाठी त्यांना मिळेल त्या ठिकाणी जवळच्य ठिकाणावर रोजंदारीसाठी वर्षातून बराच काळ पुनर्वसित गावापासून दूर रहावे लागते. तेंव्हा अशा भूमिहीन कुटुंबांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रांतर्गत जमीन वाटप करणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचे जीवन स्थिरावेल. उपजीविकेचे निश्चित साधन उपलब्ध होऊ शकेल.

### घर प्लॉटचे सपाटीकरण :

2. पुनर्वसित गावठाणांमध्ये घरासाठी देण्यात आलेले प्लॉट सलग/सपाट भागात नसल्याने विस्थापितांना त्यावर घर बांधणीपूर्वी सपाटीकरण करावे लागले तेंव्हा असे सुचवावेसे वाटते की, पुनर्वसित गावठाणामध्ये विस्थापितांना घरासाठी प्लॉट देताना संबंधित शासन विभागाने/प्रकल्प यंत्रणेने घर बांधण्यासाठी सुयोग्य स्थितीत करून देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. गरीब विस्थापितांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यावरील अतिरिक्त खर्च परवडत नाही.

### शेतीपूरक व्यवसायासाठी प्रोत्साहन :

3. पुनर्वसित गावी विस्थापित कुटुंबांना आर्थिक उत्पत्तीचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने काही शेतीपूरक जोडधंदे सुरु करणे व त्यामध्ये विस्थापितांचा सहभाग घेणे सदर कुटुंबांच्या आर्थिक भवितव्याच्या दृष्टीने गरजेचे आहे तेंव्हा शासनाने काही पूरक व्यवसाय त्यांचे सहभागातून उभे करायला हवेत. विस्थापितांना त्यासंबंधी प्रोत्साहित करणे, प्रशिक्षण देणे तितकेच महत्वाचे आहे. प्रकल्प यंत्रणेने यामध्ये पुढाकार घेणे अपेक्षित आहे.

### विशिष्ट जमातीनिहाय पुनर्वसन :

4. विस्थापित कुटुंबामध्ये जमाती/जमातीमध्ये सलोखा व सुयोग्य संबंध राखण्यासाठी विशिष्ट जमातीनिहाय पुनर्वसन कार्यक्रम राबविण्यात यावेत. सर्वसाधारण असे दिसून येते की, निरनिराळया

जातीजमातीमध्ये विशिष्ट अपसमज/गैरसमजुती व पूर्वग्रह असतात. परिणामतः त्यांचेमध्ये सामाजिक दुरावा वसला जातो. हे टाळण्यासाठी असे सुचवावेसे वाटते की, जमाती जमातींचे योग्य असे एकत्रिकरण / संघटन करायला हवे जेणेकरून त्यांच्यामध्ये आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक तंटे उत्पन्न होणार नाहीत. जमातींमधील सांस्कृतिक दुवा-सलोख्याचे संबंध, सौहार्द कायम टिकविण्यासाठी विविध विस्थापित घटकांचे/कुटुंबाचे योग्य रितीने पुनर्वसन करण्याची प्रक्रिया नियोजनबध्द पूर्ण करणे नितांत गरजेचे आहे.

**शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमावर भर :**

5. सर्वेक्षित कुटुंबांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यंत अल्प आढळले. तेंव्हा विस्थापित कुटुंबाच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये शिक्षण तसेच प्रशिक्षण या दोन्ही बाबींवर भर देणे आवश्यक आहे. शिक्षण हे एक विकासाचे प्रभावी व महत्वपूर्ण साधन आहे. विस्थापित कुटुंबाच्या सुयोग्य पुनर्वसनासाठी विविध घटकांचे शिक्षण तसेच कुटुंबाच्या विकासासाठी अंगीकारावयाच्या धंद्यामधील कौशल्यवृध्दीसाठी प्रशिक्षण असा दुहेरी कार्यक्रम त्यांच्या विकास कार्यक्रमामध्ये समाविष्ट असणे महत्वाचे आहे. पुनर्वसन कार्यक्रमांच्या उपाययोजनांमध्ये यास अग्रक्रम देण्यात यावा.

**पुनर्वसन कार्यक्रम सर्व समावेश कार्यक्रम :**

6. पुनर्वसन कार्यक्रम हा एक सर्वसमावेशक कार्यक्रम मानण्यात आला पाहिजे. विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जे कार्यक्रम प्राधान्येवरून राबवावयाचे आहेत त्याबाबत सुयोग्य नियोजन करून अंमलबजावणी (कार्यवाही) आणि पाठपुरवठा (फॉलो अप) याची नितांत गरज असते. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक घटकांना प्रशासकीय घटकांबरोबरच विचारात घेणे तितकेच अगत्याचे आहे. पुनर्वसन कार्यक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने सदर कार्यक्रम-नियोजनामध्ये मानववंशशास्त्रतज्ञांची मदत अर्थपूर्ण भूमिका बजावू शकेल असे वाटते. पुनर्वसन कार्यक्रमांचे स्वरूप त्यासंबंधीच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते तेंव्हा विस्थापितांचे पुनर्वसन शास्त्रीय दृष्टीकोनातून पार पडण्यासाठी त्यांची मदत घ्यायला हवी असे सुचवावेसे वाटते.

**पुनर्वसन कार्यक्रमाकडे पहाण्याचा विस्थापितांचा दृष्टीकोन बदलणे –**

7. सर्वसाधारणपणे असे आढळून येते की चालू/वर्तमान काळातील बदलत्या परिस्थितीप्रमाणे अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी लोक तितकासा प्रतिसाद देत नाहीत हा अनुभव आहे. तथापि उन्नत व उज्वल जीवनमान जगण्यासाठी त्यांच्या अपेक्षा उंचावल्या पाहिजेत अन् त्यासाठी लोकांच्या विचारसरणीमध्ये आवश्यक तो बदल घडविला पाहिजे. त्यांचा आर्थिक अन सांस्कृतिक दर्जा यासंबंधीची पार्श्वभूमि लक्षात घेऊन हळूहळू त्यांच्या जाणिवेत व वृत्तीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची काळजी घ्यायला हवी.

विस्थापितांच्या पुनर्वसन प्रक्रियेमध्ये अनुषंगिक विविध प्रश्न निर्माण होतात. त्यामध्ये खालील प्रश्नांचा अंतर्भाव करता येईल.

1. जीवन पध्दतीमध्ये एकदम बदल.
2. असुरक्षित होण्याची भिती
3. व्यावसायिक शिक्षणाचा अभाव
4. गरिबीची राहणी
5. निराश्रित किंवा असहाय्यतेची जाणीव

उपरोक्त समस्यांपैकी काही समस्या विस्थापित कुटुंबाच्या पुनर्वसन कार्यक्रमाकडे बघण्याच्या दृष्टिकोनामुळे उद्‌भवतात. त्यासाठी विस्थापितांना विश्वासात घेऊन त्यांचे सहकार्य पुनर्वसन कार्यक्रमात मिळविण्यासाठी त्यांच्या दृष्टिकोनात बदल घडविणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी शासन यंत्रणेने लोक-जागृती-जाणीव कार्यक्रमातून लोकांचे प्रबोधन घडवून आणावे. सदर कार्यक्रमावर भर देवून कार्यवाही करावी असे सुचवावेसे वाटते.

**आर्थिक स्थिती सुधारण्याच्या योजनांची आखणी व अंमलबजावणीची निकड :**

8. विस्थापित कुटुंबांची आर्थिक अन सामाजिक स्थिती यांचा अभ्यास करून विस्थापितांचे आर्थिक अन सामाजिक प्रश्नांची पार्श्वभूमि समजावून घेणे आवश्यक आहे. विस्थापितांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढीच्या योजना प्राधान्येकरून राबविल्या पाहिजेत. त्यामध्ये दोन प्रकारच्या योजना असाव्यात.

1. कामातील प्रत्यक्ष कसब व कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण योजना.

2. नवीन निर्माण होणा-या रोजगारासंबंधीचा त्यांना फायदा घेणे सहज शक्य व्हावे म्हणून तसेच कसबी-कामामध्ये त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी भर देणे.

विस्थापित कुटुंबातील व्यक्तीचा ओढा व्यावसायिक शिक्षणाकडे नेण्यासाठी प्रशिक्षण योजनांचा सिंहांचा वाटा रहायला हवा.

परंपरागत जीवन पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी परंपरागत धंद्यातील कारागीरांमधील कौशल्य वाढीसाठी योजनांची आखणी व अमलबजावणी हा पुनर्वसन कार्यक्रमाचा एक अविभाज्य भाग बनला पाहिजे, असे गृहित तत्व स्वीकारले गेले पाहिजे.

**जमाती-निहाय लघुसिंचन प्रकल्प अग्रक्रमाने राबविणे :**

मोठया व मध्यम प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये लघुसिचन योजना म्हणजे पाझर तलाव, लिफट इरिगेशन यांचा अंतर्भाव करणे महत्वपूर्ण वाटते. त्यासाठी पुनर्वसित कुटुंबांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे व त्यांना शेती-पूरक व्यवसायांची माहिती करुन देणे, त्यांना प्रोत्साहित करुन कार्यक्रमांची प्रत्यक्ष प्रभावी उपाय मानण्यात यावा असे सुचवावेसे वाटते.

लघु-सिंचन प्रकल्पामुळे शेती, वन-शेती प्रकल्पाचे महत्व पुनर्वसितांना पटवून देता येईल. शेती-पूरक कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, सेवा उद्योग या व्यवसायातून कुटुंबांच्या उपजीविकेसाठी व इतर आर्थिक समस्यांची पूर्तता करण्यासाठी भरीव उत्पन्न हाती येईल. याची त्यांना खात्री पटेल तेंव्हा असा ठडक कार्यक्रम राबविणे नितांत गरजेचे आहे. विशेषतः जमाती-निहाय लघुसिंचन प्रकल्प योजनांची आखणी व अमंलबजावणी केल्यास गावात सामाजिक तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होणार नाही. उलट जमातीमधील सामंजस्य व सलोखा वृध्दींगत होण्यास मदत होईल.

**शेती-विकास/सुधार कार्यक्रमामध्ये शेती विभागाची भूमिका :**

10. आदिवासींच्या शेती सुधार विकास कार्यक्रमामध्ये शेत जमीनीचे सपाटीकरण व क्षेत्र नाल्यांची व्यवस्था हा एक भाग असू शकेल. आदिवासी क्षेत्रामध्ये शेत जमीनीचे सपाटीकरणाभावी मिळणा-या पाण्याचा अपुरा वापर होत असतो. विकासासाठी असलेले पाणी नाल्या-चा-या अभावी वाया जाते तेंव्हा जमीन सपाटीकरण कार्यक्रमास अग्रक्रम देण्यात यावा असे सुचवावेसे वाटते.

त्याचबरोबर पुनर्वसित आदिवासी शेतक-यांना सुधारित पध्दतीने शेती करण्यास उद्युत करायला हवे. शेतक-यांना सुधारित बी-बीयाणे, खते, शेतीची अवजारे, इ.बाबत भरपूर माहिती देऊन प्रशिक्षण देऊन त्यांचे फायदे पटवून देण्याची गरज आहे. अशा प्रकारे "भेट व प्रशिक्षण कार्यक्रम" आदिवासी शेतक-यांना निश्चितच मार्गदर्शक ठरु शकतील.

त्यासाठी असे सुचवावेसे वाटते की, गाव पातळीवर शेतकरी-संस्था स्थापन करुन कार्यरत करायला हव्यात. यामधून गरीब शेतक-यांचा अधिकाधिक फायदा होऊ शकेल. तेंव्हा शेती-विभागाने सिंचन प्रकल्पाच्या सहभागाने व समन्वयाने "शेती सुधार व पाणी वापर" विकास कार्यक्रम राबविण्याची नितांत गरज असल्याचे सुचवावेसे वाटते.

**विस्थापितांच्या शेत जमीनीचा बाजारभावाप्रमाणे मोबदला/**

**नुकसान भरपाई रक्कम ठरविणे व वितरण करणे -**

11. सिंचन प्रकल्पांतर्गत जलमय होणा-या शेत जमिनींची किंमत शासनाच्या आकारणी पध्दतीनुसार विहित मानकाप्रमाणे महसूल विभागाकडून ठरविण्यात येते. सदरची किंमत ही प्रचलित वेळच्या बाजारभावापेक्षा निश्चितच वेगळी व कमी असते. त्यामुळे विस्थापित कुटुंबांचे अतोनात आर्थिक नुकसान होते. अशा परिस्थितीत असे सुचवावेसे वाटते की विस्थापित आदिवासींना त्यांच्या बुडित {जलमय} होणा-या जमीनीची भरपाई चालू बाजारभावाप्रमाणे ठरविण्यात {निर्धारित} करण्यात यावी व त्याप्रमाणे त्यांना तिचे वितरण करण्यात यावे.

**जनावरांच्या गोठयासाठी मोबदला रक्कम -**

12. क्षेत्रिय पाहणीव्दारे असे आढळून आले की काही विस्थापित कुटुंबांना त्यांच्या मूळ गावातील जनावरांच्या गोठयासाठी नुकसानभरपाई रक्कम अदा करण्यात आलेली नाही. घरासाठी नुकसान भरपाई रक्कम निर्धारित करताना घरालगत असलेल्या जनावरांच्या गोठयांचाही विचार व्हायला हवा. गुरांसाठी स्वतंत्र गोठयाप्रमाणेच घरालगत असलेल्या गोठयांकरिता नुकसान भरपाई रक्कम देण्याबाबत शिफारस करावीशी वाटते.

**विस्थापित कुटुंबाना पुनर्वसन अनुदान करणे -**

13. विस्थापित कुटुंबांना त्यांच्या फळझाडापासून तसेच खाजगी वनापासून वन झाडांपासून थोडेसे उत्पन्न मिळत असते ते उत्पन्न प्रकल्प उभारणीमुळे बुडते. तसेच या कुटुंबांना अनपेक्षित अशा काही समस्यांना सामोरे जावे लागते त्यामुळे नवीन जागी बस्तान बसविण्यामध्ये त्यांना अडचणी येतात. त्यासाठी सदर कुटुबांना पुनर्वसन अनुदान { Rehabilitation grant } देणे गरजेचे होईल. मध्यप्रदेश शासनाने अशा प्रकारे पुनर्वसन अनुदान मंजूर केलेले आहे. नर्मदा सागर धरणाच्या बांधकामामुळे बाधित पुनर्वसित करावयाच्या प्रत्येक कुटुंबाला एका वर्षासाठी रु.6400/- इतकी रक्कम पुनर्वसन अनुदान म्हणून देण्यात येते.

सर्वसाधारणपणे हे मान्य करावयाला हवे की, पुनर्वसनाच्या पहिल्या अवस्थेमध्ये पैशाची गरज अधिक असते आणि जसा जसा काळ जाईल त्याप्रमाणे अनुदानाची गरज कमी कमी होईल. त्यासाठी प्राथमिक अवस्थेत सुरुवातीला सदर अनुदानाची रक्कम अधिक असावी. पुनर्वसन अनुदानाची मोठी रक्कम पुनर्वसित कुटुंबाना एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतरित होण्यासाठी जादा आकर्षण ठरेल. सदर पुनर्वसन

अनुदान हे टप्प्याटप्प्याने देण्यात यावे. पहिल्या तिमाहीकरिता मासिक रु.700 ते 800 तर पुढील तिमाहीकरिता रु.500/- याप्रमाणे किंवा रु.400/- अशा श्रेणीमध्ये वितरित करण्यात यावे असे सुचवावेसे वाटते. पुनर्वसन कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यामध्ये पुनर्वसन अनुदान योजना परिणामकारक भूमिका बजावू शकेल असे खात्रीपूर्वक म्हणावेसे वाटते.

## नुकसान भरपाई रकमेचे नियोजन -

14. सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, नुकसान भरपाई मिळालेली रक्कम विस्थापित आदिवासी कुटुंबे वाटेल तशी खर्च करून टाकतात आणि मग कोणतेही साधन त्यांचेजवळ उरत नाही व थोडयाश्या अवधीतच निराधार होतात. आदिवासी नंतर मद्याचे व जुगाराचे शिकार बनतात. समाजातील धूर्त लोक त्यांचे मित्र बनून त्यांना जाळयात ओढतात. त्यासाठी आदिवासींना त्यांच्या शेत जमिनीसाठी व इतर बाबींसाठी जी रक्कम मोबदला देण्यात येते तिचे योग्य प्रकारे नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

यामध्ये आपसी सुचवावेसे वाटते की, आदिवासींना द्यावयाची नुकसान भरपाई रक्कम रोख रकमेत देण्यात येवू नये तर ती धनादेशाने देण्यात यावी. शासकीय खर्च, थकबाकी देणे, वजावट करून उर्वीरत रक्कम कुटुंब-प्रमुखाच्या खाती बँकेत जमा करावी व फक्त जमीन, घर, जनावरे (शेळया, मेंढया) यासारख्या कायम स्वरूपी वस्तू खरेदी करण्याकरिता विस्थापित कुटुंबाना सदर रक्कम देण्यात यावी.

## पोलीस आऊट पोस्ट स्थापन करणे -

15. पुनर्वसन गावी कायदा व सुव्यवस्था स्थिती कायम टिकविण्याच्या दृष्टीने पोलीस आऊट पोस्ट (चौकी) उभारणे गरजेचे आहे. त्यायोगे जमातीमधील/गावगावतील भाडण-तंटे यांना प्रतिबंध करता येईल. पुनर्वसित कुटुंबाच्या विकास कार्यक्रमांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यातील अडथळे दूर करण्यातही या यंत्रणेमुळे मोठा आधार मिळू शकेल.

## पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहाय्यकारी यंत्रणा -

16. विस्थापित/बाधित कुटुंबामधूनच शासन व समाज यांचेशी दुवा साधणारी एखादी विश्वासू व्यक्ती "पुनर्वसन सोबती" ( Rehabilitation companion ) म्हणून निवडावयाला हवी. त्याचे काम हे मार्गदर्शक व सल्लागाराचे राहील. त्याचे काम सगे-सोबती यांना खालील बाबतीत सल्ला-मसलत देण्याचे राहील.

अ. नवीन ठिकाणी जागेचे वाटप

ब. स्थलांतर होण्याची तारीख

क. नुकसान भरपाई रक्कम ठरविणे
ड. नुकसान भरपाई/मोबदला रकमेचे वितरण
इ. नवीन गावठाणामध्ये घरांचे प्लॉट वाटप
फ. नवीन गावठाणांत मूलभूत सुविधांची विकासकामे.

**स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेणे -**

17. ज्याअर्थी पुनर्वसन सोबती म्हणून काम करणा-या व्यक्तीच्या काही मर्यादा असतात. तो काही व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ता नाही. अशा कामासाठी तो पूर्ण वेळ देऊ शकेलच असे नाही. त्यासाठी स्वयंसेवी संस्थामधील काही सामाजिक कार्यकर्त्यांची विस्थापितांच्या स्थलांतराची प्रक्रिया सोपी व सुलभ करण्यासाठी मदत घेणे जरूरीचे वाटते.

**जिल्हा पुनर्वसन सल्लासमिती पुनर्गठन -**

18. जिल्हा पुनर्वसन समितीमध्ये भू-सर्वेक्षण विकास यंत्रणेमधील भू-वैज्ञानिक यांचा सदस्य म्हणून समावेश करावा असे वाटते. नवीन गावठाण जागा निवडण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांचा सल्ला मोलाचा ठरेल. कारण जेथे पिण्याच्या पाण्याची सोय मिळण्याची शक्यता नाही ती जागा नवीन गावठाण वसविण्यासाठी निवडता कामा नये म्हणून संदर विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जागा निश्चित करण्याच्या प्रक्रियेमध्ये सदर समितीवर त्यांचे प्रतिनिधीत्व असणे महत्वाचे वाटते.

तसेच विस्थापितांमध्ये आदिवासींचे प्रमाण अधिक असेल तेंव्हा आदिवासी विकास खात्यातील संबंधित प्रकप अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) यांचाही आदिवासींच्या पुनर्वसनान्तर्गत सहभाग जरूरीचा आहे. पुनर्वसित आदिवासी कुटुंबाच्या विकासासाठी राबवावयाच्या योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत निकडीची वाटते. तेंव्हा जिल्हा पुनर्वसन सल्लासमितीवर त्यांचेही प्रतिनिधीत्व अत्यावश्यक आहे.

याशिवाय जिल्हा पुनर्वसन सल्लासमितीमध्ये इतर महत्वाच्या घटकांचा समावेश करण्यात यावा. जेणेकरून पुनर्वसन कार्यक्रम राबविण्यातील अडीअडचणी सुकरतेने सुटतील.

**आदिवासी विकास विभागामार्फत अंशतः पुनर्वसन झालेल्या कुटुंबासाठी योजना राबविणे -**

19. पूर्वीच्या पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पान्तर्गत विस्थापित झालेल्या आदिवासींचे पुनर्वसन सुयोग्यरित्या झालेले नसेल तर नव्याने तरतूद करून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपाययोजना करणे जरूरीचे वाटते.

8 व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अदिवासींच्या आर्थिक अन सामाजिक तसेच सर्वांगिण विकासासाठी विविध योजनांची/कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करवून घेण्याचे व त्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याचे अधिकार आदिवासी विकास विभागास प्राप्त झालेले आहेत. तेंव्हा पूर्वी पूर्ण झालेल्या मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पखाली विस्थापित झालेल्या आदिवासी कुटुंबाचे पुनर्वसन योग्य रितीने झाले नसेल तर त्यासाठी निधीची तरतूद करून आवश्यक त्या योजनांची/कार्यक्रमांची अमलबजावणी संबंधित विभागाकडून करवून घेता येईल. आदिवासी विकास विभागाने अशा अशंतः पुनर्वसन झालेल्या कुटुंबाचा प्रकल्पनिहाय आढावा घेऊन विस्थापितांच्या समस्यांचे टिपण करून त्यावर उपाययोजना करावी असे सुचवावेसे वाटते.

**पाटबंधारे विभाग व शेती-विभाग या दोहोंचा विकास कामातील सहभाग व समन्वय साधणे -**

**गाव-सिंचन समिती स्थापना -**

20. दोन्ही विभागातील सहभाग व समन्वय वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे वाटते. पाणी वापरासंबंधी शेतक-यांना/कास्तकारांना मार्गदर्शन शेती-विभागातील संबंधित निरिक्षण अधिका-यांनी पार पाडायला हवे. जादा पाणी वापराचा पिकांवर कसा विपरीत व अनिष्ट परिणाम होतो याचे "प्रात्यक्षिकातून शिक्षण" शेतकरीबंधूना विशेषतः आदिवासींना द्यायला हवे. त्यामुळे सध्या होणारा पाण्याचा अपव्यय टळू शकेल. सध्या शेतातील पिकासाठी अधिकाअधिक पाणी वापरण्याचा कल बदलू शकेल त्यासाठी "गाव-सिंचन समिती" ची स्थापना करून लाभधारकांच्या अयोग्य पाणी वापरास आळा घालता येईल.

**इतर शासकीय विभागांचा पुनर्वसनामध्ये सहभाग - अनिवार्य**

21. जिल्हयातील रोजगार विनिमय केंद्रे, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, समाज कल्याण विभाग यांचेकडून प्रकल्पग्रस्त विस्थापितांना पुनर्वसन कार्यक्रमान्तर्गत नोकरी रोजगार उपलब्धतेसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे.
तेंव्हा पुनर्वसन कार्यक्रमान्तर्गत या विभागातील सहभाग जोडण्यात आला पाहिजे. त्यामुळे पुनर्वसन कार्यक्रमातील अमंलबजावणीमधील विविध दुवे सांधण्यास मदत होईल. सध्या पुनर्वसन कार्यक्रमांशी यांचा काही संबंध येत नाही. शासनाच्या विविध विभागाचे सहकार्य व समन्वय विस्थापित घटकांचे पुनर्वसन जलद गतीने घडवून आणण्यासाठी अनिवार्य आहे असे सुचवावेसे वाटते.

**महसूल प्रशासनाने प्रकल्पग्रस्त विस्थापितांना देऊ केलेल्या सूट/सवलती तशाच चालू ठेवणे -**

22. पुनर्वसन कार्यक्रम अमलबजावणीन्तर्गत महसूल विभागाने प्रकल्पग्रस्तांना काही सवलती/सूट देऊ

केलेल्या आहेत. त्यामध्ये सर्वसाधारणपणे खालील सवलतींचा अंतर्भाव दिसतो.

1. जुन्या घराचे सामान
2. नवीन गावठणात घरासाठी लोखंडी/सिमेंट पत्रे पुरवठा
3. प्रकल्पान्तर्गत संपादित केलेली शेत जमीन प्रकल्प कार्यान्वित होऊन ती जलमय होईपर्यंत कसण्यास परवानगी (काही अटींच्या अधीन राहून)
4. नवीन गावठाणात घराचे सामान वाहतूक खर्च/व्यवस्था करण्यात येते.

सदर सवलती प्रकल्पग्रस्त कुटुंबांना पुढेही चालू ठेवण्यात याव्यात असे सुचवावेसे वाटते.

परंतु ज्या विस्थापितांना त्यांचे घर सामान नवीन गावठणात हलविण्यासाठी वाहतूक व्यवस्था शासनामार्फत पुरविण्यात आलेली नसेल त्यांना त्यापोटी झालेला खर्च अदा करण्याची तरतूद करण्यात यावी, जेणेकरून गरीब व आर्थिक हलाखीत असणा-या विस्थापित कुटुंबाना आर्थिक भूर्दंड पडणार नाही. कारण आर्थिक हलाखीच्या कात्रीत सापडलेल्या विस्थापित आदिवासी कुटुंबांना हा खर्च बोजा पेलवत नाही तेंव्हा सदर वाहतूक खर्च देणे क्रमप्राप्त आहे.

## नवीन पुनर्वसित गावठाणामध्ये पायाभूत सुविधा पूर्ति व स्थलांतर -

23. नवीन पुनर्वसित गावठाणामध्ये पायाभूत सुविधांची पूर्णपणे व्यवस्था केल्याशिवाय आदिवासी विस्थापित कुटुंबांना त्यांच्या मूळ ठिकाणाहून स्थलांतर करू नये. पायाभूत सुविधांच्या अभावी नवीन गावठणात पुनर्वसितांना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

24. प्रकल्पग्रस्त आदिवासी कुटुंबांना पुनर्वसन कार्यक्रमान्तर्गत शेत जमिनीचे वाटप तसेच चराऊ जमीन वाटप (कुरण) विस्थापितांच्या समाधानाइतपत करायला हवे.

## नवीन निवडलेल्या जागेबाबत पसंती अजमाविणे -

25. प्रकल्पान्तर्गत विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी निवडलेल्या नवीन जागेबाबत विस्थापित कुटुंबांची पसंती अजमाविणे गरजेचे वाटते त्यामुळे पुनर्वसनासाठी निवडलेल्या जागेबाबत नंतर प्रश्न उद्‌भवणार नाहीत.

## धरणग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र वाटप -

26. प्रकल्पान्तर्गत विस्थापित झालेल्या कुटुंबातील व्यक्तींना प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्याकरिता काही सबबी सांगण्याची गरज नाही. सदर प्रमाणपत्र सहजरित्या वितरित करण्याची जबाबदारी महसूल विभागाने सुकर व सुलभरित्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन प्रक्रियेतील महत्वपूर्ण घटक म्हणून पार पाडायला हवी असे सुचवावेसे वाटते.

**शासनाच्या इतर विभागात रोजगारसंधीची उपलब्धता -**

27. प्रकल्पग्रस्त विस्थापितांच्या कुटुंबातील व्यक्तीला सध्या केवळ सिंचन प्रकल्पान्तर्गत आस्थापनेवर रोजगार संधी उपलब्ध करुन देण्यात येते. परंतु सदर आस्थापनेवरील मर्यादित पदांची संख्या विचारात घेता प्रकल्पग्रस्तांना त्या विभागात रोजगार संधी उपलब्ध होऊ शकत नाहीत. तरी अशा परिस्थितीत प्रकल्प-बाधितांना शासनाच्या इतर विभागातील आस्थापनेवरील पदावर नोक-या उपलब्ध करुन देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सुचवावेसे वाटते. त्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णयाव्दारे उपाययोजना करावी व शासनाच्या विविध विभागामध्ये रिक्त पदावर प्रकल्पग्रस्तांना नोकरी, रोजगार संधी प्राधान्येकरुन उपलब्ध होतील याकडे लक्ष पुरविण्याची गरज आहे असे सुचवावेसे वाटते.

**ईप्सित उद्दिष्टांकरिता लोकांचा सहभाग -**

28. विकासात्मक संशोधन अभ्यास अहवालांच्या परिक्षणातून निदर्शनास येते की, जर मानवी संबंध/सहभाग नियोजन तथा व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये मान्य केला नाही, त्याची दखल घेतली गेली नाही तर तांत्रिक दृष्टया प्रकल्प कितीही परिपूर्ण असला तरी अपेक्षित परिणाम/फलीत साध्य करु शकेल असे सांगता येत नाही.

अनुभवाअंती असे दिसून आहे की, कितीही चांगल्या उद्देशयाने आसलेल्या प्रकल्पांनी ईप्सित उद्दिष्टांच्या अगदी उलट परिणाम साधलेला आहे. कारण त्यामधील सामाजिक अन् सांस्कृतिक घटकांना त्यांचे योग्य स्थान/योग्य मान देण्यात आलेला नव्हता. तेंव्हा प्रकल्पाशी संबंधित लोक व त्यांची सामाजिक व्यवस्था यासंबंधीच्या संशोधनाव्दारे समाजशास्त्रज्ञ निर्विवादपणे निर्वाळा देतील की, विकास प्रकल्पामध्ये कोणत्या घटकांचा सहभाग असायला हवा. लोकांचा सहभाग घेऊन त्यांना ख-या अर्थाने मदत करण्याची नितांत गरज आहे.

अशा परीस्थितीत करंजवण व हरणबारी सिंचन प्रकल्पान्तर्गत विस्थापित कुटुंबाचा पुनर्वसनात सहभाग नोंदविण्यात आलेला दिसून येत नाही. इतका कालावधी लोटूनही प्रकल्पान्तर्गत मूलभूत सुविधा - रस्ते, पाणी, वीज, स्वच्छतागृहे, सार्वजनिक आरोग्य सुविधा इ. बाबींची पूर्तता होऊ शकलेली नाही. विस्थापितांमधील काहींना प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त प्रमाणपत्र मिळालेले नाही. स्थानिक नेतृत्व लोकांच्या प्रश्नासंबंधी उदासीन दिसून येते. म्हणूनच "आधी पुनर्वसन मगच धरण" ह्या घोषवाक्यातून लोक (प्रकल्पग्रस्त) आपल्या तीव्र भावना व्यक्त करीत आहेत.

....

## प्रकरण 10 वे

### आदर्श पुनर्वसन योजना/कार्यक्रम नियोजन

प्रकल्प बाधित तथा विस्थापित कुटुंबाचे पुनर्वसन हे अत्यंत गुंतागुंतीचे व जिकीरीचे काम आहे हे मान्य करायला हवे. त्यासाठी काटेकोरपणे नियोजन हवे आणि सदर कार्यक्रमाचा विचारपूर्वक आराखडा (गाव/कुटुंब यांचेसाठी) ज्याप्रमाणे एखाद्या औद्योगिक प्रकल्पासाठी तयार करतो त्याप्रमाणे व्हायला हवा. ज्यांचे भवितव्य त्यामध्ये अडकले आहे, धोक्यात आहे त्या विस्थापितांचा त्यामध्ये सहभाग तर अगदी आवश्यक आहे. याशिवाय प्रत्येक गाव, प्रत्येक कुटुंब, त्याची मालमत्ता, उपजीविकेची साधने, त्यांचा कल, त्यांचे पुनर्वसनासाठी योग्य जागेचा शोध/निवड इ. बाबींवरील बिनचूक माहिती संकलित करायला हवी. कारण विस्थापित कुटुंबे स्वतःहून पुनर्वसनासाठीच्या जागेचा/जमिनीचा शोध लावू शकत नाहीत. बिगर शासकीय स्वयंसेवी संस्थाकडून पुनर्वसन कार्यक्रमाचा आराखडा धन्यवादपूर्वककरित्या करून घ्यायला हवा. शेत मजुरांच्या पुनर्वसनासाठी त्यांची इच्छा व त्यांना पुनर्वसित करावयाच्या जागेचा विकास ही त्या नियोजन कार्यक्रमाची महत्वाची अंगे असली पाहीजेत.

पुनर्वसन कार्यक्रमान्तर्गत सध्या समाविष्ट केलेल्या अत्यावश्यक बाबींसह अधिक बाबींचाही प्राधान्याने विचार व्हायला हवा. अत्यावश्यक बाबींमध्ये समाविष्ट करावयाच्या आणखी काही बाबी खालील प्रमाणे सांगता येतील.

1. विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी नवीन गावठाण करिता जागा.

2. नवीन गावठाणात सार्वजनिक सुविधांची सोय

3. जमीन वाटपासाठी पर्यायी शेत जमिनीची निवड

4. प्रकल्प बाधीत कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी गरज पडल्यास इतर सोयी/सुविधा.

5. विस्थापितांच्या आर्थिक पुनर्वसनान्तर्गत -

   अ. कायमस्वरुपी उत्पन्न मिळण्यासाठी साधन

   ब. पुनर्वसनाच्या सुरवातीच्या काळात आर्थिक सहाय्य योजना

6. मिश्र समूह-गटांमध्ये पुनर्वसन करण्यासाठी त्यांचे त्यांचे जमाती समूहांची निवड.

7. जमाती-जमातीमध्ये जातीय सलोखा ठेवण्यासाठी गाव-पातळीवर समन्वय समिती.

8. पुनर्वसनाचे काम योजनेबरहुकूम झाले किंवा नाही यासाठी देखरेख सल्लागार समिती.

9. विस्थापित आदिवासींचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी विविध योजनांची कार्यवाही.

10. सामाजिक मागासलेपण कमी करण्यासाठी शिक्षणाचा प्रभावी-प्रचार - त्यासाठी शैक्षणिक सोयी/सुविधांमध्ये लक्षणिय वाढ तसेच लोकांच्यामध्ये कौशल्य-कसब निर्मिती करण्याच्या कामास प्राधान्य देणे आवश्यक

11. दळणवळण सुविधांची अग्रक्रमाने सोय (गावातील अंतर्गत रस्ते डांबरीकरणयुक्त).

12. धरणाच्या पाण्याचा लाभ मिळवून देण्यासाठी खास योजना (त्यामध्ये लघु पाटबंधारे योजनांसह)

13. विस्थापितांना वनोपन सहजपणे उपलब्ध करून देण्याबाबत कार्यक्रम -

1. रोपवाटिका विकासाद्वारे रोपे पुरविणे.

2. वृक्ष-संवर्धन दिंडी आयोजन.

3. वृक्ष लागवडीचा धडक कार्यक्रम.

14. शेती सुधार प्रकल्प (शेती विकास) अंतर्गत -

अ. जमीन सपाटीकरण.

ब. सुधारित शेती पध्दतीसंबंधी मार्गदर्शन.

क. सुधारित बी/बियाणे, खते यांचे वाटप व प्रत्यक्ष वापरासाठी मार्गदर्शन.

15. शेत मजुरांसाठी विशिष्ट कार्यक्रम -

1. कौशल्य प्रशिक्षण वर्ग.

2. सहकारी तत्वावर लघुउद्योगधंदे.

३· स्थानिक कारखाने, उद्योगामध्ये रोजगारांसाठी सक्तीची भरती·

४· स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण व आर्थिक मदत योजना·

पुनर्वसनाचा आदर्श कार्यक्रम विस्थापितांचे" मन वळवून" तसेच त्यांच्या "कलाप्रमाणे" या तत्वावर आधारित असला पाहिजे· दुस-या शब्दात सांगायचे झाले तर प्रकल्पासंबंधी विधायक तसेच फायदेशीर बाबींसंबंधी सर्व माहिती शिक्षणाद्वारे, जाणीव करून देऊन प्रकल्पग्रस्तांना देण्याची नितांत गरज आहे असे वाटते· कारण प्रकल्पग्रस्तांची मानसिक तयारी घडवून आणली पाहिजे· आणखी असे की, प्रकल्पाची आखणी करताना विस्थापितांचे मत क्वचितच विचारात घेतले जाते· विस्थापितांना विश्वासात घेणे व तसा प्रयत्न करणे आवश्यक आहे·

प्रकल्पान्तर्गत विस्थापित कुटुंबांची जमीन संपादनापूर्वी भूमि अभिलेख कागदपत्रे अद्यावत केली पाहिजेत· योग्य व्यक्तीला नुकसान भरपाई/मोबदला देण्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्वाची आहे· ही प्राधान्य बाब समजण्यात यावी·

पुनर्वसनाच्या संधीकाळात विस्थापितांना त्यांचे मूळ गाव ओपर्यंत जलमय होत नाही तोपर्यंत तेथील मूळ साधने/संपत्ती याचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी·

पुनर्वसनाच्या कामातील एक महत्वाचे अंग म्हणजे विस्थापितांना पर्यायी उत्पन्न मिळवून देणारा रोजगार पुरविणे होय· त्यासाठी प्रशिक्षण आणि कसब/ कौशल्यवृध्दी तथा निर्मिती करणे अत्यंत महत्वपूर्ण आहे· कारण पुष्कळसे लोक त्यांच्या शेती उत्पन्नापासून मिळणा-या मूळ उपजीविकेपासून वंचित केले जातात·

शासनप्रणीत सर्व रोजगार योजना विस्थापित लोकांना उपलब्ध असायला हव्यात· त्यासाठी प्रकल्पामध्ये निरनिराळी कामे करणारे कंत्राटदार व प्रकल्प प्रशासन यांचेमध्ये करार करायला हवा जेणेकरून प्रकल्प बाधितांना कायमस्वरूपी रोजगार सातत्याने पुरविण्यात येईल· दुसरे असे की, आदिवासींच्या प्रवृत्तीला मावेल अशा प्रकारचे उद्योगधंदे शोधून काढण्याची गरज आहे· तशा प्रकारच्या उद्योगधंद्याचे/व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन नवीन जागेमध्ये त्यायोगे त्यांना कुटुंबांचे उत्पन्न वाढविणे शक्य होईल· परिणामतः पुनर्वसन प्रक्रियेतील अडसर कमी होतील·

आदिवासी किंवा ग्रामीण लोक यांचे सामाजिक विश्व अत्यंत मर्यादित किंवा सीमित असते· त्यांचे नातेवाईक,सगेसोयरे त्यांचे घराचे परिघामध्येच वास्तव्य करीत असतात· लांब, दूरच्या अंतरावर नातेवाईक/मित्र सोडून पुनर्वसन करणे ते पसंत करीत नाहीत· तेंव्हा पुनर्वसन कार्यक्रमामध्ये असा आग्रह धरला पाहिजे की, आदिवासींचा गट जो एकमेकांना चांगल्याप्रकारे परिचित आहे अशांचे एकत्रित स्थलांतर केले पाहिजे· त्यासाठी सबंध गावच दुस-या एका ठिकाणी स्थलांतरित केले पाहिजे· परिणामतः त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक वातावरण बदल विरहित राहील· त्यामुळे मानसिक भरण-


पोषणाचा लाभ निश्चितपणे मिळू शकेल.


नवीन ठिकाणी पुनर्वसित केलेल्या लोकांच्या सहभागातून सामाजिक वनीकरणाचे कार्यक्रम हाती घेण्यात यावेत. त्यामध्ये जलदगतीने वाढणा-या झाडांच्या जाती निवडून वनसंपत्ती वाढविता येईल. त्यामुळे विस्थापित कुटुंबांना जळण, वैरण आणि फळफळावळ यांचा लाभ सहज मिळू शकेल.

सुनियोजित पुनर्वसनासाठी आदर्श पुनर्वसन कार्यक्रमान्तर्गत समाविष्ट बाबी महत्वपूर्ण ठराव्यात याठिकाणी एक गोष्ट नमूद करायला हवी की आदिवासी विस्थापितांच्या योग्य व परिणामकारक पुनर्वसनाशिवाय आदिवासींचा विकास हे मूळ सूत्र प्रत्यक्षात उतरविता येणार नाही. प्रकल्पान्तर्गत विस्थापितांचे पुनर्वसन (गावं तथा कुटुंब पातळीवरील) कशा प्रकारे करण्यात येईल त्यावरच प्रकल्पाचे भविष्यकालीन भवितव्य अवलंबून असते म्हणून विस्थापितांचे प्रकल्प-बाधीतांचे आदर्श पुनर्वसन हेच ध्येय असले पाहिजे आणि हाच ध्यास सर्व संबंधितांनी घेतला पाहिजे.


विस्थापित व पुनर्वसन प्रक्रियेचे स्थूल स्वरुप व पुनर्वसन कार्यक्रमान्तर्गत विविध संकल्पनांचे सादरीकरण खाली दर्शविल्याप्रमाणे :

# आदर्श पुनर्वसन संकल्पना





## विस्थापन व पुनर्वसन
## प्रकिया-अंतिम स्वरुप



## REFEREMCES

1. Tribals Rehabilitation and Development by Alexander Prasad - M.P.Jahagirdar - p.-93

2. Tribal issues - a non conventional approach. by Nacti Mahanti - p. 26

3. Tribal Research Bulletin - T.R.I. Pune
Vol.VIII No.1 Sept.85,p.13
Vol.IX No.11 March,87 - p.21-25

4. Tribal Research Bulletin, T.R.I.Pune
Vol.XII No.1, Sept.92 - p.4

5. पाटबंधारे योजना विषयक माहिती, नाशिक पाटबंधारे विभाग, जून 1993, पान 4,5,20,21.

....

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रपत्र - 1

कुटुंबपत्रक

[विस्थापित झालेल्या कुटुंबांकरिता]

चौक - १ ओळख तपशील

१. जिल्हा - - - - - - - - - - २. ए.आ.वि.प्र. - - - - - - - -

३. तालुका - - - - - - - - - - ४. गांव - - - - - - - - - - -

५. कोणत्या सिंचन प्रकल्पाखाली ॠ विस्थापित झाला आहात?
सिंचन प्रकल्पाचे नांव.................................

चौक.-२ कुटुंबाची माहिती

१. कुटुंब प्रमुखाचे नांव - - - - - - - - - - - - - - - - -

२. वय (वर्षे) - - - - - - - ३. जमात - - - - - - - - - -

४. सध्याचे वास्तव्याचे ठिकाण : गांव - - - - - तालुका - - - - - - -
जिल्हा - - - - - - -

५. कुटुंबाची माहिती :-

| अ.क्र. | कुटुंबातील व्यक्तीचे नाव | स्त्री/पु. | कुटुंब प्रमुखाशी नाते | शिक्षण | व्यवसाय | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

६. विस्थापित होण्यापूर्वीचे ठिकाण : गांव - - - - - - - - -
तालुका - - - - - - -
जिल्हा - - - - - -

७. त्यावेळचा व्यवसाय : शेती [ ] मोलमजुरी [ ]
इतर [ ]
मासिक उत्पन्न (रू.)- - - - - - - - -

चौक ३ कुटूंबाची शेतजमीन

१. त्यावेळची स्वत:ची जमीन : एकर गुंठे
अ. बागायती - - - - - - - - - - - - - -
ब. जिरायती - - - - - - - - - - - - - -
क. इतर - - - - - - - - - - - - - -
एकूण - - - - - - - - - - - - - -

२. शेतात विहिरी होत्या काय? होय / नाही
असल्यास : किती? .................... अंदाजे किंमत - - - - - -

चौक ४ - कुटूंबातील साधन संपत्ती

१. पशुधन - - - - - - - - - - - - - - - - - - - -
२. शेतीची अवजारे - - - - - - - - - - - - - - - - -
३. इतर साधने - - - - - - - - - - - - - - - - -
४. कुटूंबाच्या मालकीचे घर प्रकार अंदाजे किंमत [रू.]
मूळगांवात
१. - - - - - - - - - - - -
२. - - - - - - - - - - - -
३. - - - - - - - - - - - -
४. - - - - - - - - - - - -

## चौक-५ सिंचन प्रकल्पाचा परिणाम

१] प्रकल्पामुळे बाधित व बुडीत क्षेत्र [हे]/ ए.गुंठे
जमीन - - - - - - - - - - - - -

२] विस्थापित झाल्यानंतर जमीनीच्या बदल्यात जमीन मिळाली काय? होय / नाही

अ. मिळाली असल्या किती? १] बागायती एकर........गुंठे.........
२] जिरायती एकर - - - - गुंठे - - - -

कोठे : गांव :- - - - - - -
तालुका :- - - - -
जिल्हा :- - - - -

ब. जमीन मिळाली नसल्यास किती रुपये मोबदला मिळाला रु......................-

३] घराबाबत मोबदला रक्कम मिळाली का? होय / नाही

अ. मिळाली असल्यास केता? [ रु. ] .............

ब. मोबदला रक्कम योग्य आहे किंवा नाही.............

क. नसल्यास त्याची कारणे ............................
............................
............................
............................

४] मूळच्या गावात गोठा होता काय? होय / नाही

अ. असल्यास अंदाजे किंमत [रु].............................

ब. त्याची मोबदला रक्कम मिळाली का? होय / नाही

क. मोबदला रक्कम किती मिळाली [रु.]..................

ड. नसल्यास त्याची कारणे..............................

५] जमिनीत झाडे होती काय? होय / नाही

अ. असल्यास किती व कोणती अंदाजे किंमत ....................

ब. गवताचे क्षेत्र..........एकर................गुंठे

वार्षिक उत्पन्न [रु. ]......................

क. झाडांची भरपाई रक्कम मिळाली का? होय/नाही
मिळाली असल्यास रक्कम रुपये..............................

## चौक–६ पुनर्वसन कार्यक्रम

१. घराची जागा/गांव आपल्या इच्छेप्रमाणे मिळाले का? होय / नाही
नसाल्यास ते निवडण्यासाठी कोणी उद्युक्त केले? १....................
२....................
३....................

२. घराकरता जागा मिळाली का? होय / नाही

३. आपणांस घराची जागा किती/केव्हा देण्यात आली?
क्षेत्रफळ................
कालावधी : ३ महिन्यांत – – – – – – –
६ महिन्यात – – – – – – –
१ वर्षात – – – – – – –

४. जर तुम्हास घराची जागा देण्यात आली नसेल तर
त्याची कारणे : १.....................................
२.....................................
३.....................................

५. पुनर्वसन अधिकारी तथा योजना अंमलबजावणी अधिकारी यांच्याकडून योजना राबविण्याबाबत आपला अनुभव विशद करा.
– – – – – – – – – – – – – – – –
– – – – – – – – – – – – – – – –
– – – – – – – – – – – – – – – –
– – – – – – – – – – – – – – – –

६. पुनर्वसन कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्या संबंधात आपण काही सूचना करू इच्छिता ? होय / नाही.
असल्यास त्याचा तपशिल : – –
– – – – – – – – – – – – – – – –
– – – – – – – – – – – – – – – –
– – – – – – – – – – – – – – – –
– – – – – – – – – – – – – – – –

ठिकाण : – – – – –

अन्वेषकाचे नांव: – – – – – – – –
स्वाक्षरी : – – – – – – – –

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

प्रपत्र - 2

[योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यासाठी]

१. जिल्हा - - - - - - - - - - - तालुका - - - - - - - - - -

२. प्रकल्पाचे नांव - - - - - - - - - - - - - - - - - - -

गांव - - - - - तालुका - - - - जिल्हा - - - - -

३. प्रकल्प राबविणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव - - - - - - - - - -

हुद्दा - - - - - - - -

४. प्रकल्पाची वैशिष्ठ्ये ........................................

..............................................

..............................................

५. प्रकल्पांतर्गत पुनर्वसन कार्यक्रमाचे स्वरुप.........................

..............................................

..............................................

६. प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या कुटूंबाची माहिती

| | एकूण | आदिवासी | बाधित एकूण क्षेत्र [हे] | बाधित आदिवासी क्षेत्र [हे] |
|---|---|---|---|---|
| १] खातेदार | - - | - - - - - | - - - - - | - - - - - - |
| २] कुटूंबे | - - | - - - - | - - - - - | - - - - - - |

७. प्रकल्पांतर्गत विस्थापित झालेल्या कुटूंबापैकी किती कुटूंबाचे पुनर्वसन करण्यात आले?

एकूण - - - - - पैकी आदिवासी - - - - -

८. किती कुटूंबाचे पुनर्वसन करावयाचे बाकी आहे? १] एकूण - - - -

२] पैकी आदिवासी - - - -

९. विस्थापितांपैकी आधित किती खातेदारांना जमीन वाटप केले
संख्या.................
क्षेत्र [हे]..................

१०. पुर्नवसन कार्यक्रमामध्ये सर्वसाधारण येणा-या अडचणी...................

– – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – – –

११. पुनर्वसन कार्यक्रम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना करायला हवी असे आपणांस वाटते?

– – – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – – –

– – – – – – – – – – – – – – –

अंमलबजावणी अधिका-याची – – – –
स्वाक्षरी – – – – – –

दिनांक : – – – –